# १

# राजकीय समाजशास्त्र

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे.

१.२ प्रस्तवना.

१.३ विषय विवेचन.

१.४ राजकीय समाजशास्त्र अर्थ व व्याख्या.

१.५ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप

१.६ राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय

१.७ राजकीय समाजशास्त्राचे दृष्टीकोन.

१.७.१. वेबरचा दृष्टीकोन

१.७.२ मार्क्सवादी दृष्टीकोन

१.७.३ वर्तनवादी दृष्टिकोन.

१.८ सारांश

१.९ आपली प्रगती तपासा

१.१० अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ सूची

## १.१ उद्दिष्टे:

राजकीय समाजशास्त्र या घटकाचा अभ्यास केल्यानंतर पुढील बाबी स्पष्ट होतील.

१) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ व स्वरूप आपल्याला समजेल.

२) राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय लक्षात येईल

३) राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टिकोनांचा अभ्यास लक्षात घेता येईल.

४) राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती समजेल.

## १.२ प्रस्तावना:

समाजशास्त्र हे मानवी समाज जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. म्हणजेच मानवाच्या सामाजिक संबंधांचा मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करते. मानवी वर्तन हे समाजशास्त्राच्या अभ्यासाचे प्रमुख क्षेत्र आहे. समाजशास्त्र हे समाज व व्यक्ती वर्तनाशी संबंधित आहे. त्यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास समाजशास्त्र करते, तर राज्यशास्त्र हे समाजाच्या राजकीय क्षेत्राचाच फक्त अभ्यास करते. आणि राजकीय समाजशास्त्र या दोन्हींचा अभ्यास करते.

munotes.in

थोडक्यात राज्यशास्त्र राजकीय संघटनांचा अभ्यास करते, व त्याचे राजकीय स्पष्टीकरण देते. तर राजकीय समाजशास्त्र राजकीय प्रश्नांची मूळ, सामाजिक रचनेत शोधण्याचा प्रयत्न करते. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप पाहून, नेमके त्यामध्ये कोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो, हे समजून घेण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय आणि व्याप्ती बाबत सविस्तर स्पष्टीकरण पाहणार आहोत. तसेच राजकीय समाजशास्त्र ही शाखा कशी असते व त्याचा विकास कसा, होत गेला हे देखील अभ्यासणार आहोत.

## १.३ विषय विवेचन:

या अध्ययन घटकात तुम्ही राजकीय समाजशास्त्र म्हणजे काय, हे समजून घेणार आहात. त्यामध्ये प्रामुख्याने राजकीय समाजशास्त्राचा अर्थ समाजशास्त्राशी केलेल्या व्याख्यानुसार समजून घेणार आहोत. त्याचबरोबर राजकीय समाजशास्त्र विषयक वेगवेगळे दृष्टिकोन समजून घेणार आहोत. राजकीय समाजशास्त्रात नेमक्या कोणकोणत्या बाबींचा अभ्यास केला जातो याचे आकलन होण्यासाठी त्याचा अभ्यास विषय व व्याप्ती पाहणार आहोत. या प्रकरणात तीन उपघटकानुसार राजकीय समाजशास्त्र विषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आलेले आहे.

## १.४ राजकीय समाजशास्त्र अर्थ व व्याख्या:

राजकीय समाजशास्त्राचा अर्थ विविध समाजशास्त्रज्ञांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे त्यामधील काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे

**एस.एम. लीपसेट**:

"समाज आणि राज्यव्यवस्था यातील व सामाजिक रचना आणि राजकीय संस्था यातील परस्पर संबंधाच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र असे म्हणता येईल"

**प्रा. ए.के. मुखोपाध्याय:**

**"**राजकीय समाजशास्त्र म्हणजे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्परांवर वैचारिक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रभाव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथांकडे सामाजिक संदर्भातून पाहण्यात येते".

**रश व अल्थॉफ**:

"राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजकारण व समाज राजकीय व सामाजिक रचना आणि राजकीय सामाजिक वर्तणूक यातील संबंध अभ्यासणारे शास्त्र होय राजकीय समाजशास्त्र म्हणजे समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांना जोडणारा सिद्धांतिक पूल होय".

**ससीमन**:

"राजकीय समस्यासह हे राजकीय गोष्टींचा एक स्वतंत्र सामाजिक घटक म्हणून अभ्यास करणारे शास्त्र आहे"

**डाऊझे**:

"समाजशास्त्राच्या चौकटीत केलेला राजकीय वर्तणुकीचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय".

वरील व्याख्यावरून राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजकीय घडामोडींचे आणि सत्ता संबंधाचे समाजातील संबंधित पायाभूत सामाजिक संबंध आणि प्रक्रियांच्या आधारे विश्लेषण व आकलन होय. राज्यशास्त्र राजकीय घटनांचा अभ्यास करते व त्याचे राजकीय स्पष्टीकरण देते. तर राजकीय समाजशास्त्र राजकीय प्रश्नांची मूळ सामाजिक रचनेत शोधण्याचा प्रयत्न करते. राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप अधिक व्यापक आहे मात्र राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात अभ्यासक्रमात एक वाक्यता नाही त्यांनी मांडलेल्या मतांमध्ये विरोधाभास आहे. राजकीय समाजशास्त्राचे वेगळेपण स्पष्ट करताना बेंडीकस व लिपसेट हे 'दि फिल्ड ऑफ सोशियॉलॉजी' या पुस्तकात लिहितात की, "राज्यशास्त्र अभ्यासाची सुरुवात राज्यापासून करते व त्याचा राज्यावर काय परिणाम होतो इथपर्यंत येते तर राजकीय समाजशास्त्र हे समाजापासून अभ्यासाला सुरुवात करते व त्याचा राज्यावर काय परिणाम होतो इथपर्यंत ते पोहोचते". थोडक्यात, राजकीय समाजशास्त्र राज्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करत नाही तर समाजाच्या संदर्भात राज्याचा अभ्यास करते असेही मत लिपसेट यांनी व्यक्त केले आहे.

## १.५ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप:

राज्यशास्त्र समाजशास्त्राचा एक भाग आहे. शैक्षणिक दृष्ट्या तो विषय स्वतंत्रपणे विकसित झालेला आहे. समाजशास्त्रामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर विकसित झालेला आहे. कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, मोस्का या समस्यास्त्रज्ञांनी राजकीय अभ्यासकांना प्रभावित केले.'राजकीय समाजशास्त्र' हा एक नवीन अभ्यास विषय उदयाला येत गेला. राज्याचा विचार करणारे राज्यशास्त्र, व समाजाचा विचार करणारे समाजशास्त्र, या दोन्हींचा एकत्रित विचार करणारे राजकीय समाजशास्त्र, असे सामान्य दृष्टिकोनातून त्याचे स्पष्टीकरण देता येईल.प्राचीन काळी राज्य आणि समाज यात फरक केला जात नसे. मध्ययुगात प्रादेशिक सार्वभौमत्व, राज्यसत्ता अस्तित्वात आली. त्यानुसार धर्म, वंश, जन्म या गोष्टींना सामाजिक एकात्मतेचा आधार समजू लागले. राज्याबाबत विविध विचार मांडले गेले. त्यामध्ये प्रामुख्याने राज्याबाबत आदर्शवादी भूमिका ही वेगळी मांडणी, तर राज्यच नको असे आराज्यवादी म्हणू लागले. राज्य म्हणजे भांडवलदारांचे बटिक असे मार्क्स यांनी मत मांडले. राज्य आणि समाज या स्वतंत्र गोष्टी असून, राज्याशिवाय समाज अस्तित्वात राहू शकेल. अशी भूमिका कार्ल मार्क्स आणि आराज्यवादी विचारवंतांनी मांडली. तर व्हान स्टीन आणि मॅक्स वेबर यांच्या विचारातूनही राज्य आणि समाज या दोन भिन्न गोष्टी असल्याचे स्पष्ट केले गेले आहे. काहींनी दोन्हीतील फरक सांगितला. तर काहींनी त्यातील परस्परावलंबित्व सांगितले. परंतु हळूहळू राजकीय घटना आणि राजकीय संस्था यामागील आशय अभ्यासाकांच्या लक्षात येऊ लागला. आधुनिक काळात राज्य आणि समाज यातील भेद स्पष्ट झाले आहे. राज्य व समाज यातील घटक संस्था, व्यक्ती, व्यक्तीचा समाजावरील प्रभाव, समाजाचा व्यक्तीवरील प्रभाव, त्यांचे सामाजिक संबंध, त्यांच्या निर्माण होणाऱ्या अंतरक्रिया यातून नवीन ज्ञान शाखेची गरज भासू लागली.

राजकीय संस्था, राजकीय व्यवस्था, राजकीय नेता वगैरे ज्या पद्धतीने काम करतात, ते कसे आहे हे दाखविण्याचे काम समाजशास्त्र करते. समाजशास्त्र राज्यशास्त्राला अभ्यास करण्यासाठी आवश्यक ती सामाजिक स्थिती व तिच्या स्वरूपाची माहिती देते. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना समाजशास्त्राचा मोठा उपयोग होतो. कारण समाजशास्त्र त्यांना समाजाच्या वर्तनाची, वृत्तींची माहिती पुरविते. ज्याप्रमाणे राजकीय संस्थांच्या अंतरंगाचा व

त्यांच्या वर्तणुकी मागील सामाजिक संदर्भाचा अभ्यास महत्त्वाचा मानला जाऊ लागला. त्याप्रमाणे व्यक्तीच्या राजकीय वर्तणुकीचा अभ्यासही समाजशास्त्रज्ञ महत्वाचा मानू लागले. मानवाच्या सामाजिक संबंधांच्या मागे व्यक्ती व समाज आधारभूत असतात. ही नवीन जाणीव निर्माण झाली.

थोडक्यात राजकीय रचना किंवा संघटना आणि त्यामधील किंवा, त्यावर प्रभाव टाकणारे सामाजिक घटक यातील परस्पर संबंधाची जी जाणीव निर्माण झाली त्यातूनच राजकीय समाजशास्त्र पुढे विकसित होत गेलं.

## १.६ राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय

राजकीय समाजशास्त्रात जो अभ्यास अभिप्रेत आहे, त्यानुसार त्याचा अभ्यास विषय अधिक स्पष्ट होईल, आशा काही महत्त्वाच्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.

**१) राज्य व समाज यांच्या अभ्यासावर भर:**

राजकीय समाजशास्त्र, राज्य आणि समाज दोन्ही गोष्टींचा एकत्रित म्हणजे त्यांच्या परस्पर संबंधांचा, यांच्या परिणामांचा अभ्यास करते.याबाबत बेंडिक्स व लिपसेट म्हणतात की, राज्यशास्त्रात राज्याचा व राज्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात येतो, परंतु इथे राजकीय समाजशास्त्र, समाजाचा अभ्यास करून त्याचा राज्यावर काय परिणाम होऊ शकतो हे निदर्शनास आणून देते.

**२) राजकीय संस्था व इतर संस्थांचा अभ्यास:**

मानवी जीवनामध्ये विविध प्रकारच्या सामाजिक संस्था आहेत,अर्थसंस्था, राज्यसंस्था, शिक्षण संस्था, कुटुंब संस्था, विवाह संस्था, अशा विविध सामाजिक संस्था आहेत. त्यापैकी राजकीय संस्था ही एक संस्था आहे. लीपसेट म्हणतात की, राज्य व समाज असा फरक करून कोणाचे महत्त्व किंवा, वर्चस्व मोठे हे सांगणे चुकीचे आहे.कारण व्यक्तीसाठी किंबहुना समाजासाठी सर्व सामाजिक संस्था या परस्परांना पूरक आहेत. परस्परांशी संबंधित एकमेकावर अवलंबून आहेत. आणि राजकीय संस्था तर सामाजिक संस्थांच्या वरचे कवच आहे. त्यामुळे सर्वसामाजिक संस्थांचे संबंध हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे. आणि राजकीय संस्था व इतर सामाजिक संस्था हा राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

**३) सत्ता वाटप व सत्ताकार्यवाहीचा अभ्यास:**

राजकीय समाजशास्त्र ही केवळ समाजशास्त्र ची शाखा नाही, किंवा केवळ राज्यशास्त्राची ही शाखा नाही, असे मत मांडले गेले. अर्थात राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय राज्यशास्त्रीयच असतो. कारण राज्याप्रमाणे राजकीय समाजशास्त्र सत्तावाटप व सत्ता कार्यवाहीचा अभ्यास करते. मात्र असे करत असताना सामाजिक संदर्भाचा विचार करूनच कार्य केले जाते.

### ४) संघटनांच्या औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही विभागांचा अभ्यास:

राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय हा संघटनांच्या औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही विभागांचा आहे. शासन, नोकरशाही, विधिव्यवस्था, हितसंबंधी गट, मतदार या सर्वांशी संबंधित अभ्यास औपचारिक व अनौपचारिक रित्या केला जातो. व हा अभ्यास संघटनात्मक दृष्टिकोनाचा असतो.

थोडक्यात, राजकीय समाजशास्त्राचा मुख्य उद्देश हा सामाजिक, मनोविज्ञानिक व आर्थिक क्षेत्राशी संबंधित अशी परिस्थिती निर्माण करने आहे की, ज्यामुळे राजकीय लोकशाही भक्कम होईल. राजकीय समाजशास्त्राचा मुख्य उद्देश हा, राजकीय व्यवस्थेतील स्थैर्य कोणत्या गोष्टीमुळे टिकून राहते, किंवा कोणत्या गोष्टींमुळे धोक्यात येते, याचा देखील अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. सत्ता, अधिकार व प्रभाव यामागे कोणते सामाजिक आधार असतात. सनदशीररित्या ही व्यवस्थेच्या स्थिरतेसाठी कशी महत्त्वाची असते, याचाही अभ्यास केला जातो. म्हणजेच राजकीय वर्तणुकीतील गुंतागुंत समजून घेण्याच्या दृष्टीने राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास निश्चित उपयोगी पडतो.

## १.७) राजकीय समाजशास्त्राचे दृष्टिकोन:

समाजशास्त्र हे सामाजिक घडामोडींचा अभ्यास करीत असल्यामुळे, राजकीय संस्था आणि त्यामागील सामाजिक आशय अभ्यासण्यासाठी, राजकीय समाजशास्त्राची निर्मिती झाली. आधुनिक काळामध्ये जगाची वाढती लोकसंख्या, लोकशाहीचा विकास इत्यादी कारणांमुळे जगातील संपूर्ण देशांमध्ये निवडणुका, राजकीय पक्ष, प्रचार मोहिमा, प्रतिनिधिक  संस्था यांचे महत्त्व वाढत आहे. वैज्ञानिक विकास आणि औद्योगिक प्रगती यामुळे लोकांना रिकामा वेळ आज मोठ्या प्रमाणात मिळू लागला आहे. शिक्षणाच्या आणि दळणवळणाच्या सोयीसुविधात झपाट्याने वाढ झाली. दळणवळणाच्या क्रांतीमुळे लोकांना विविध क्षेत्रातील माहिती घरबसल्या मिळू लागली. या जाणीव जागृतीमुळे लोकांचा शासनाकडे, स्वतःकडे आणि समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. ज्ञानाच्या नव-नवीन सीमा निर्माण झाल्यामुळे नव-नवीन विचार दृष्टिकोनाचा उगम झाला. वाढत्या दळणवळणामुळे प्रादेशिक अलगपणा संपुष्टात येऊन राष्ट्रव्यापी आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या जाणीवा निर्माण झाल्या. त्यामुळे राज्यशास्त्रज्ञांना आणि समाजशास्त्रज्ञांना नव-नवीन अभ्यास विषय मिळू लागली. बदललेल्या किंवा बदलत चाललेल्या भौतिक परिस्थितीचे समाज व्यवस्थेवर झालेले, परिणाम अभ्यासण्याचे कार्य संख्याशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र या अभ्यासाकांनी केले. राज्यशास्त्राने याबाबतीत प्रामुख्याने समाजशास्त्र, मानसशास्त्र व संख्याशास्त्र यांची मदत घेतली. व त्यांच्या अभ्यास पद्धती आणि दृष्टिकोन यांचे योग्य व आवश्यक तेथे अनुकरण करून, नव-नवीन आचरण पद्धतीचे अवलोकन व विश्लेषण करण्यास सुरुवात केली. व त्यामधून राजकीय समाजशास्त्रात समाजातील विविध दृष्टिकोनाचा अभ्यास केला जाऊ लागला. उदाहरणार्थ वेबरचा दृष्टिकोन, मार्क्सवादी दृष्टिकोन, वर्तनवादी दृष्टिकोन, सामाजिक व्यवस्था दृष्टिकोन इत्यादी.

या पैकी या प्रकरणात आपण खालील तीन दृष्टिकोन अभ्यासणार आहोत.

१.१ वेबर चा दृष्टिकोन

१.२ मार्क्सवादी दृष्टिकोन

१.३ वर्तनवादी दृष्टिकोन

१.७.१ **वेबरचा दृष्टिकोन:**

१८६४ ते १९२० हा मॅक्सवेबरचा कालावधी होता. मॅक्सचे बालपण जर्मनीत गेले. त्याचे शिक्षण हिंडलबर्ग कोटिंग जेन आणि बर्लिन विद्यापीठांमध्ये झाले. त्यांने कायद्याचा अभ्यास केला. त्याचबरोबर इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी विषयात देखील तो पारंगत होता. त्यानंतर तो अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम करू लागला. मॅक्सवेबर हा राजसत्तावादी, उदारमतवादी होता. तरीही तो जनतेबद्दल निराशावादी होता. त्याने वैयक्तिक नेतृत्वाचा पुरस्कार केलेला होता. मॅक्सवेबरने ऐतिहासिक ज्ञान आणि समाजशास्त्रीय अनुभव यांचा मध्य गाठण्याचा प्रयत्न केला आहे. मॅक्सवेबर वर कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव आहे. सर्व सिद्धांताचे प्रतिपादन हे संपूर्ण समाजाला विचारात घेऊन केलेले असल्यामुळे, सामाजिक उत्क्रांतीच्या सिद्धांताला आणि उपयोगिता वादाला वेबरचा विरोध होता. वेबरनी समाजशास्त्रीय विश्लेषणात महत्त्वाचा घटक म्हणून व्यक्तिगत कृतीला महत्त्व दिले आहे. तसेच व्यावहारिक आणि अभ्यास पद्धतीच्या आधारावर उपयोगिता वादाला विरोध केला. मार्क्स, मार्क्सवादी, उपयोगितावादी आणि इतिहासवादी दृष्टिकोनांना वेबरचा प्रमुख विरोध मूल्यविरहित समाजशास्त्र निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून होता.

**समाजशास्त्राचा अभ्यास:**

समाजशास्त्राच्या अभ्यासात विविध सामाजिक कृतीला वेबर प्राधान्य देतो. त्याच्यामते सामाजिक कृतीच्या स्पष्टीकरणातून तिचा बोध करून घेणारे, आणि त्या आधारे त्या कृतीची दिशा आणि परिणाम समजून घेण्यास मदत करण्याचा प्रयत्न करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. समाजशास्त्राला शास्त्र बनविण्यासाठी त्यांने खालील बाबी सांगितल्या आहेत.

क) वेगवेगळ्या सांस्कृतिक तत्वातील आंतरक्रियांचे शास्त्रशुद्ध विवेचन.

ख) मूल्यविरहित विश्लेषणावर भर देणे.

ग) व्यक्तीच्या सामाजिक जीवनातील मूलभूत प्रक्रिया मधील घटनाक्रमांचा आणि त्या घडणाऱ्या क्रियांचा सकारण अभ्यास करणे.

घ) आदर्श विरहित आधारावर मानवी संबंधांच्या ऐतिहासिक विकासातील गोष्टींचा अभ्यास करणे.

च) समाजात 'काय असावे' या गोष्टीचा विचार करू नये. तर 'काय आहे' यावर लक्ष द्यावे. समाज विषयक शास्त्रांमध्ये शास्त्रशुद्ध पद्धतींचा वापर सुरू करण्याचे सर्व श्रेय मॅक्स वेबरलाच दिले जाते. विज्ञानातील अभ्यास पद्धतीचा उपयोग सामाजिक तत्वे आणि प्रक्रियांच्या अभ्यासात करता येऊ शकतो. असे वेबरने सांगितले आहे.

**सामाजिक क्रिया**

सामाजिक कृतीमध्ये मानवाच्या वर्तणुकीचा अंतर्भाव होतो. कृती करणाऱ्या व्यक्तींना किंवा समूहांना व्यक्तिशः शब्दाचा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे इतर व्यक्तींच्या वर्तुनूकीची दखल घेतली जाते. आणि कृतीला एक प्रकारचे विशिष्ट वळण मिळते. प्रत्येक कृती सामाजिक असतेच असे नाही. तर काही असामाजिक ही असू शकतात.

वेबरच्या मते, फक्त अनुकरणातून झालेल्या क्रिया सामाजिक ठरत नाहीत. त्याकरिता सामाजिक क्रीयांचे खालील चार प्रकार पडलेले आहेत.

क) प्रभावात्मक :ही सामाजिक क्रिया व्यक्तींच्या भावनांवर आधारित असते.

ख) तर्कयुक्त: विशिष्ट उद्दिष्टांसाठी विचारपूर्वक केलेली क्रिया.

ग) पारंपारिक: या सामाजिक क्रिया रुढी, चालिरीती परंपरातून स्वीकारल्या जातात.

घ) मूल्यमापनात्मक:

ही सामाजिक क्रिया धार्मिक, नैतिक, कलात्मक आधारावर अवलंबून असते. आणि कोणत्याही तर्कयुक्त कारणांशिवाय होऊ शकते.

**मॅक्स वेबरची बौद्धिक भूमिका**:

मॅक्स वेबर ने शासकीय यंत्रणेचे जे विश्लेषण केले. त्यात शासन आणि समाज यात फरक केला. त्याच्यामते समाजात स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी व्यक्ती समूह निर्माण करतात. व त्यात हितसंबंध निर्माण होत असतात. या समूहांचा सत्तेच्या वितरणावर परिणाम होतो. परंतु नोकरशाहीच्या विकासावर त्यांचा परिणाम होत नाही. मात्र शासनाच्या अस्तित्वामुळे हितसंबंधांचे एकत्रीकरण होते, असेही नाही. मॅक्स वेबर चा हा दृष्टिकोन तीन वेगवेगळ्या परंतु परस्पर संबंधित विचार प्रभावातून निर्माण झालेला आहे.

ते म्हणजे,

क) या विचारानुसार समाज ही शासनाची निर्मिती आहे किंवा, त्याचे एक अंग आहे. मॅकियाव्हेली, मॉटेस्क्यू व हेगेल हे या विचाराचे प्रणेते असून, या विचार प्रणालीचा शासनाच्या स्वतंत्र कृती करण्याच्या क्षमतेवर विश्वास होता. मॅक्सवेबरच्या मते, शासक व अधिकारी हे लोकांच्या भावना अपेक्षा आणि परिस्थिती लक्षात घेऊन, सामाजिक संबंधांना वळण देत असतात. या विचारप्रणालीतून प्रभुत्वावर गुंतागुंतीची सामाजिक रचना म्हणून दिलेला भर निर्माण झालेला आहे. ही संरचना सामाजिक संबंध व आदर्श विषयक कल्पना तसेच वैध अशा बळाचा वापर यावर आधारित असते.

ख) दुसरा दृष्टिकोन हा १७ व्या १८ व्या शतकांमध्ये प्रचलित होता. व्हाल्टेयर, सेंट सायमन व मार्क्स यांनी या विचारांचा प्रसार केला. या विचारांमध्ये मानवी समाजाच्या प्रगतीला सरकार (political system) हा अडथळा असल्याचे मानले जाते.

munotes.in

ही विचारसरणी उदारमतवादाला जवळची आहे.आर्थिक आणि सामाजिक उपसंरचना यांच्या अभ्यासामुळे शासन व्यवस्था समजावून घेता येते. या विचारवंतांनी राजकीय संस्थांना अवलंबित चल असे मानले. या विचार प्रणालीमध्ये सामाजिक व आर्थिक घटकांचे त्यांना प्राथमिक संच म्हणून विश्लेषण केले. त्यातून समाजाचे स्थैर्य कशावर अवलंबून आहे याचा पत्ता लागू शकेल. असा त्यांचा विश्वास होता. मॅक्सवेबर सामाजिक घटकांची प्राथमिक एकक म्हणून त्यावर आधारित विश्लेषण मान्य करतो. परंतु समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय विश्लेषणात त्यांचे परस्परात स्पष्टीकरण करणे त्याला पटले नाही. त्यांने आपले लक्ष घटनेचा निर्वाचित अर्थ लावण्यावर केंद्रित केले. अशा रीतीने त्याने कायद्याचा आधार घेतला. या दृष्टिकोनाचे लक्ष व्यक्ती, घटनेचा व स्वतःच्या वर्तनाचा काय अर्थ लावते याकडे असते. अशा निर्वाचनात्मक अर्थाचे विश्लेषण करताना वेबर एकीकडे समान हितसंबंधातून निर्माण झालेले संबंध व दुसरीकडे न्याय, औपचारिक संघटन, व्यवस्था यावरील सर्वसामान्य विश्वशातून निर्माण झालेले सामाजिक संबंध यात फरक करतो. अशाप्रकारे समाज आणि राज्यसंस्था यांना अंशतः स्वतंत्र विचारांची कृतीक्षेत्र मानणारे विश्लेषणाला वेबरने वर्तनात्मक पाया घालून दिला.

वर्तमान स्थितीत शासन आणि समाज हे परस्परावलंबी बनलेले आहे. १७ व्या शतकापासून शासन उमरावशाहीकडून लोकशाही पद्धतीकडे वळत आहे. तसेच समाज आणि शासन यांच्यातील फारकतीचे अनेक स्रोत आहेत. परंतु हेगेलच्या तत्त्वज्ञानात व उपयुक्ततावादी लेखनात या फारकतीचा उगम आहे. हेगेलने अर्थशास्त्रज्ञांची प्रत्यक्षानुसार प्रतिमा व बाजारपेठेचे मूल्यमापन यांचा स्वीकार केला. परंतु त्यात त्याला अडचण दिसली. ती म्हणजे सुबत्तेचा अभाव व साधनसंपत्तीच्या मर्यादी पलीकडे वाढलेली लोकसंख्या होय. त्यामुळे त्याला यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीत सरकारी हस्तक्षेप स्पृहनीय वाटतो. किंवा आवश्यक वाटतो. त्याच्यामते "सुसंघटित सरकार व स्वयं नियंत्रित मुक्त बाजारपेठेचे अस्तित्व हे शेवटी लोकांच्या आत्मनिष्ठ प्रवृत्तीवरच अवलंबून असते" हेगलच्या आदर्श समाज व्यवस्थेत व्यक्ती व शासन हे परस्परांना आधार देतात.

munotes.in

### १.७.२ मार्क्सवादी दृष्टीकोन:

कार्ल मार्क्स या जर्मन विचारवंताने सामाजिक शास्त्रांचा सूक्ष्म विचार केला होता. हेगेलचा 'विरोध विकास' सूत्रांचा अवलंब त्याने केला होता. भौतिक इतिहासाची वाटचाल ही वस्तुस्थिती(थेसिस), विरोधी स्थिती(अँटी थेसिस) व परिजत स्थिती(सिंथेसिस) अशा सूत्राने विकसित होत असते, असे कार्ल मार्क्स ने मांडले. यालाच 'डायलेक्टिकल मटेरियालिझम' किंवा विरोध विकासधिष्टीत भौतिक वाद असे संबोधले जाते. मार्क्सच्या मते मानवाच्या ऐतिहासिक विकासमागील प्रेरक शक्तीचे रूपांतर आर्थिक रचनात होते. प्रत्येक देशाच्या त्या त्या कालच्या सामाजिक राजकीय व वैधानिक रचना मुख्यतः आर्थिक व्यवस्थेवर आधारलेले असते. असे अनुमान त्यांनी काढले. राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टीने कार्ल मार्क्सचे विचार पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) विरोधाशिवाय विकास होत नाही:भांडवलदार मजूर यांचे संबंध विरोधाचेच असल्यामुळे वर्ग संघर्ष निर्माण झाला. भांडवलदारी नष्ट करण्यासाठी कामगारांना राजसत्ता हाशील करण्याची प्रेरणा बळावली. शोषण रोहित समाजाचे स्वप्न रंगविले.

२) राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टीने मार्क्सने मांडलेला मुख्य विचार म्हणजे, सामाजिक शास्त्रे परस्परासंबंधी असतात. ती स्वतंत्र शास्त्रे म्हणून परिपूर्ण असत नाहीत. कारण समग्र मानवी व्यवहारांच्या विविध पैलूंचा एकत्रित विचार करणे, राजकीय समाजशास्त्राला अभिप्रेत असते.

३) समाजातील एका भागातील दोष दूर करण्यासाठी दुसऱ्या भागातील साधनसामग्रीचा उपयोग होत असावा. तसे करावे लागते. उदाहरणार्थ वर्ग संघर्ष टाळण्यासाठी राजकीय सत्ता हस्तगत करावी लागते. आणि आर्थिक समता आणण्यासाठी राजकीय व्यवस्थेत क्रांती घडवून आणावी लागते.

**मार्क्सवादी दृष्टिकोनाची अध्ययन पद्धती:**

राजकीय परिवर्तनाचा अभ्यास तीन पातळ्यांवर तीन भिन्न अध्ययन पद्धतीचा अवलंब करून केला जाऊ शकतो. अशी मार्क्सवादी दृष्टिकोनाची मांडणी आहे. राजकीय अन्वेषणाच्या तीन पातळयांच्या पद्धतीशास्त्रीय गरजा भिन्न प्रकारच्या आढळतात. सर्वात वरची पातळी संपूर्ण इतिहास प्रक्रियेचा वेध घेते. कारण मधली पातळी राज्यव्यवस्थेच्या विशिष्ट ऐतिहासिक राज्यावरच कार्याचा शोध घेते. आणि अनुभवनिष्ठ पद्धतींचा अवलंब करून तिला सूक्ष्म पातळीवर (मायक्रो लेव्हल) राजकीय वास्तव अभ्यासता येते.

वरच्या पातळीवरचे अध्ययन करण्यास विचार प्रणालीची स्पष्ट व ठाम बैठक असणे आवश्यक असते. मध्यम व निम्नस्तरीय संशोधन विचार प्रणालीशी तितकासा साक्षात संबंध असत नाही. मध्यम पातळीवरील संशोधने, सामाजिक प्रक्रिया मागील सर्वसाधारण कार्यकारणाचा व तर्कसंगतीचा शोध घेतात. तर अनुभववादी संशोधन मुख्यत्वे तथ्यांचे संकलन, सुबद्ध मांडणी एवढेच करतात. सामाजिक, राजकीय अध्ययनांमध्ये नवी संशोधन तंत्र, गणिती पद्धत, संगणक तंत्रज्ञान, माहिती नियंत्रण शास्त्र वगैरेचे महत्त्व निर्विवाद आहे. तथ्ये गोळा करून साठवणे, राजकीय घडामोडींशी संबंधित तथ्ये तत्काळ व अचूकपणे उपलब्ध करणे, इत्यादी गोष्टी त्यामधून साध्य झाल्या आहेत.

व्यवस्थापक दृष्टिकोन, संख्याशास्त्रीय पद्धती, आशय विश्लेषण, संसूचनात्मक विश्लेषण, तौलनिक अभ्यास ही आधुनिक तंत्रे निश्चित महत्वाचे आहेत. मार्क्सवादी दृष्टिकोन त्यांना मुळीच त्याज्य समजत नाही. फक्त त्यांची भूमिका एवढीच असते की, या सर्व पद्धतीचा समग्रतेने व साक्षेपाने वापर केला जावा. मार्क्सवादी पद्धतीशास्त्राचा व राजकारणाच्या भौतिकवादी सिद्धांताचा विसर न होऊ देता या पद्धती अवलंबण्यात आणल्या जाव्यात.समाजाच्या स्थिती गतीचे स्पष्टीकरण वर्तनवादी व वर्तनवादोत्तर अभ्यासकांना जेवढे देता आले नाही, तेवढे मार्क्सवादाने दिले आहे. सामाजिक परिवर्तनाचे गतीशास्त्र व दिशादर्शन या दृष्टिकोनातून अभ्यासाकांना लाभले आहे. त्यामुळे मानव समाज व इतिहास यांचा अभ्यास करण्यात ते सर्वोत्तम शास्त्र ठरले आहे. तत्कालीन तथ्यांच्या पलीकडे जाण्याची क्षमता, ऐतिहासिक दृष्टीच्या जोडीला स्वप्न पाहण्याचे धारिष्ट आणि ती स्वप्ने

साकार करण्यासाठी लागणारी दीर्घकालीन दूरदृष्टी ही या दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये आहेत. मार्क्सवादाला मर्यादा काहीही असो, पण एक गोष्ट वादातीत आहे की हा दृष्टिकोन 'शास्त्रीय असूनही मानवतावादाने परिपूर्ण आहे. नव्हे, "नव्या माणसाला जन्म देणारी ती सामाजिक कुस आहे".

थोडक्यात, राज्य आणि समाज या स्वतंत्र गोष्टी असून राज्य शिवाय समाज अस्तित्वात राहू शकेल अशी भूमिका कार्ल मार्क्स आणि अराज्यवाद्यांनी घेतली. कार्ल मार्क्सचे राजकीय समाजशास्त्राला व समाजशास्त्राच्या राजकारणाला मोठे योगदान आहे. त्याच्या मते समाजातच व्यक्ती इच्छित गोष्टींची पूर्तता करू शकतो. पण त्यासाठी राज्याची आवश्यकता नाही. राज्याला मार्क्स 'false conciousness' म्हणतो. राज्याने व्यक्तीला गुलामगिरीच्या बेड्यात अडकविले, त्यास मुक्त केले नाही. मार्क्स समाजरचनेला महत्त्व देतो समाजरचनेत झालेला बदल राज्यात व त्याच्या स्वरूपात बदल घडवून आणतो असे मार्क्सचे मत आहे.

### १.७.३ वर्तनवादी दृष्टिकोन:(Behavioral Approach)

वर्तनवादी दृष्टिकोनाला दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले असले, तरी विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातच त्याचा उदय होऊ लागला. ग्राहम वालास यांनी आपल्या 'ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स' या ग्रंथात असे मत मांडले आहे की, राजकारणातील मानवी वर्तनाचा विचार केल्यासच राजकारणाचा खरा अर्थ समजावून घेता येऊ शकेल. म्हणून मानवी वर्तनाच्या संदर्भात राज्यशास्त्राचा अभ्यास करण्यात आला पाहिजे याच सुमारास इ. स. १९०८ मध्ये ऑर्थर बेंट ने 'the process of government' या ग्रंथात राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. त्यानंतर अनेक राज्य शास्त्रज्ञांनी मानवी वर्तनाचा अभ्यास, राजकीय प्रक्रियांचा अभ्यास, तथ्य संशोधन, अनुभवनिष्ठता, शास्त्र शुद्धता इत्यादी मुद्द्यांवर भर दिला. अशा प्रकारे राज्यशास्त्रात वर्तनवादी या नावाने ओळखला जाणारा नवा दृष्टिकोन उदयास आला.

वर्तनवादी दृष्टिकोन राजकारणातील मानवी वर्तनाचा अभ्यास करण्याची गरज स्पष्ट करतो. निरनिराळ्या परिस्थितीत व्यक्तीचे वर्तन कशाप्रकारे होते. यासंबंधीचे नियम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वर्तनवादी दृष्टिकोन करतो. उत्तेजन आणि प्रतिसाद या मानवशास्त्रीय सूत्रावर वर्तनवाद आधारित असला तरी तारिक प्रत्यक्षवाद हा आणखी एक वर्तनवादाचा मूलभूत अधार मानला जातो. म्हणून रॉबर्ट ढाल यांनी असे म्हटले आहे की, "वर्तनवाद ही बौद्धिक असंतोषाची चळवळ आहे". वर्तनवाद असे सांगतो की, मानवी वर्तनाशी निगडित अशी विश्लेषणाचे काही मूलभूत घटक असतात की, ज्यातून सामाजीकरण साध्य करणे शक्य असते. शासन संस्थेचा संपूर्ण व्यवहार मानवाच्या निरीक्षण केलेल्या किंवा करता येण्यासारख्या वर्तनाच्या संदर्भात अभ्यासण्याचे ध्येय वर्तनवाद ठेवतो. तो नैसर्गिक शास्त्राच्या नमुन्यावर मानवी वर्तन समजावून घेण्याचा, त्याचे स्पष्टीकरण करण्याचा आणि त्यासंबंधी भविष्य कथन करण्याचा प्रयत्न करतो.

वर्तनवादी दृष्टीकोनाने एक अभ्यास विषय म्हणून राज्यशास्त्राची उद्दिष्टे, व्याप्ती, अध्ययन पद्धती या तिन्ही अंगांनी फेरचना करण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय घडामोडीचे जवळून व सूक्ष्म निरीक्षण करणे आणि मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी सामाजिक शास्त्रांच्या सिद्धांत पद्धती, निष्कर्ष व दृष्टिकोन यांच्या जवळ राजकीय समाजशास्त्राला घेऊन

जाणे, त्याला अनुभवनिष्ठ असे समृद्ध करणे, असे प्रयत्न वर्तनवादी अभ्यासकांनी केलेले आहेत. संपूर्ण शासन व्यवहार निरीक्षित किंवा, निरीक्षणमय मानवी वर्तनाच्या परिभाषेत मांडणे हे त्यांचे साध्य होते.

**वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ:**

वर्तनवादी दृष्टिकोनाच्या अर्थाबाबत सर्व विचारवंतांमध्ये एकमत नाही. अनेक विचारवंतांनी या दृष्टिकोनाला एक मनोवृत्ती मानले. तर काही विचारवंत यास एक निश्चित विचार, सिद्धांत आणि कार्यपद्धती मानतात.

थोडक्यात, या दृष्टिकोनामध्ये अनुभव, व्यवहार आणि मानसिक अभिप्रेरणा इत्यादी सामाजिक आणि मानसशास्त्रीय सिद्धांतांचा प्रयोग केला जातो. तसेच त्यास अनुभववादाचा पर्याय समजले जाते.

**व्याख्या:**

अनेक विचारवंतांनी वर्तनवादी दृष्टिकोनाच्या व्याख्या सांगितल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे पाहता येतात.

१) **सायमन**: "राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये प्रशासकीय व्यवहार हे व्यवहार मूलक विज्ञानाचे अंग आहे. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये व्यक्तिगत आणि सामूहिक मानवी व्यवहाराचा किंवा वर्तनाचा समावेश झाला पाहिजे".

२) **एम क्यू सिल्वी :**

"वर्तनवादी दृष्टिकोन हा नैसर्गिक शास्त्राने प्रभावित आहे. या दृष्टिकोनाची अशी मान्यता आहे की, सामाजिक शास्त्र आणि नैसर्गिक शास्त्रात नियम आणि सिद्धांताची निर्मिती करत असताना, अनुभवात ऐतिहासिक आधार, सांकेतिक दृष्टिकोन आणि व्यक्तिगत अनुभवाला प्राथमिकता दिली जाते".

३) **डेविड इस्टन:**

"वर्तनवादी विचारसरणी ही संस्थेच्या नियमित प्रक्रियेत सत्याला महत्त्व देते. कारण हा दृष्टिकोन विशुद्ध वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करतो. क्षेत्रीय निरीक्षण, प्रयोगशाळा तसेच सामूहिक अध्ययन इत्यादी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. हा दृष्टिकोन परिणामकारकतेवर अधिक भर देतो. अर्थात संख्येच्या आधारावर गणना केली जाते. अशा प्रकारे एका विषयाची दुसऱ्या विषयासोबत एकीकरण, समन्वय आणि सामंजस्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो".

थोडक्यात मानवाच्या एकंदर वर्तनाचा उदा. व्यक्तीचा राग, प्रेम, सहकार्य, संघर्ष इत्यादी विविध मानसिक प्रवृत्तीचा अभ्यास करणे होय.

**वर्तनवादी अभ्यासाच्या पद्धती** :

प्रामुख्याने वर्तनवादी अभ्यासाच्या मुख्यत्वे दोन पद्धती सांगितल्या जातात.

munotes.in

**१)** मानसशास्त्रीय पद्धती:

मानसशास्त्रीय पद्धतीने मानवी व्यवहार, मानवी व्यवहार वर्तनाचा विविध अंगाने अभ्यास करता येतो. व्यक्ती आणि समूहाचे आपापसातील संबंध समजून घेऊन, अनौपचारिक संबंधाची जोपासना करण्यास मदत होते. आज व्यावसायिक आणि औद्योगिक संघटनात अशा संबंधाचा फार मोठा लाभ झाला आहे.

**२)** परिणाम मापन पद्धती:

परिणाम मापन पद्धतीमध्ये तथ्यांचे आणि परिणामांचे सांख्यिकी पद्धतीने मापन केले जाते. अलीकडे निवडणुकांचे अंदाज वर्तवण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जात आहे. सामाजिक क्षेत्रात किंवा प्रशासनात जनमत आजमावण्यासाठी ही पद्धत महत्त्वाची ठरते.

थोडक्यात वर्तनवादात मानवी व्यवहार, अनुभव, वर्तन यांनाच महत्त्व आहे, असे नाही तर विविध मानवी व्यवहार विविध परिस्थितीत कसे बदलतात याचाही अभ्यास केला जातो. म्हणजेच वर्तनवादामुळे वैधानिक स्वरूपाचे निष्कर्ष काढण्यास मदत होते. वर्तनवादी विचारसरणीतून प्रशासकीय प्रक्रियांचा अभ्यास या गोष्टीवर सायमन अधिक भर देतात. आज सायमनचा हा वर्तनवाद व्यवहारवाद बनलेला आहे.

**वर्तनवादाचे तात्विक आधार किंवा गृहीते**:

डेविड इस्टन यांने वर्तनवादी दृष्टिकोनाचा पाया घातला,असे मानले जाते. त्यांनी या दृष्टिकोनाची पुढील आठ गृहीते किंवा तात्विक आधार किंवा हेतू सांगितले आहेत.

**१)** **वारंवारता**:

माणसाच्या राजकीय वर्तनामध्ये वारंवारता हवी असते. नाही ती असतेच आणि अनेक वेळा राजकीय वर्तन, असंख्य व्यक्तीच्या बाबतीत सारखे दिसून येते. याविषयीचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास, मतदान वर्तनाचे देता येईल. एकाच पक्षात सातत्याने मतदान करणाऱ्या अनेक व्यक्ती असतात. अशा व्यक्तीच्या राजकीय वर्तनाचा एक आकृतीबंध तयार झालेला असतो. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेला उचलून धरणाऱ्या पक्षाला अलीकडे जास्त प्रसिद्धी लोक देत असलेले दिसते. तर कर्नाटक राज्यातील बेळगाव या गावी मराठीला प्राधान्य देणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण पक्षाला, तेथील मतदार बहुमताने महानगरपालिकेवर निवडून देतात.

थोडक्यात सामाजिक शास्त्रांमधील नियमितता आणि नैसर्गिक शास्त्रामधील नियमितता यात फरक पडतोच. राज्यशास्त्रज्ञ फारतर चल घटकांची सूक्ष्म नोंद करण्याचा प्रयत्न करतात. आणि केवळ वर्णनात्मक दृष्टिकोन न स्वीकारता चिकित्सक दृष्टिकोन स्वीकारतात.

थोडक्यात, माणसाच्या वर्तनात लक्षात येण्याइतपत स्पष्ट अशी वारंवारता किंवा नियमितता आढळते. तिच्या आधारे मानवी वर्तनाचे स्पष्टीकरण करता येते. तसेच

भावी वर्तनाबद्दल भाकितही वर्तवणे शक्य असते. स्पष्टीकरण व भाकीतकथन करता येणे, या कोणत्याही शास्त्राच्या मुख्य कसोट्या असतात. मतदार वर्तनाच्या अभ्यासावरून असे आढळते की, मतदारांचा सामाजिक, आर्थिक दर्जा, व्यावसायिक, जातीय प्रतिष्ठा इत्यादी गोष्टींच्या आधारे एक आकृतीबंध तयार होतो. त्याआधारे मतदारवर्तनाचे स्पष्टीकरण करू शकतो.

**२) पडताळा**:

ज्ञानाची, नियमांची आणि सिद्धांताची वैधता तपासता आली पाहिजे, असा वर्तनवाद्यांचा आग्रह आहे. त्यामुळे वर्तनवाद्यांनी शास्त्रीयत्वाला वर्तनवादाचा आत्मा मानला आहे. वैधता तपासण्यासाठी नियमांमध्ये प्रयोग क्षमता हवी. अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ म्हणतात, राज्यशास्त्राचा प्राथमिक संबंध निरीक्षण क्षम घटकांचा असतो. परंतु परंपरावादी याला असा आक्षेप घेतात की, मानवी वर्तनातील निरीक्षण क्षम घटना संख्येने अल्प असतात. व राजकीय घटनांची समज येण्यासाठी निरीक्षण घटनांच्या पलीकडे जावे लागते. राजकीय घटना जशा घडतात त्या स्थितीत त्याचा अभ्यास केला पाहिजे. ही गोष्ट वर्तनवादी कधीही नाकारत नाहीत.

थोडक्यात संशोधनाच्या संदर्भात करावयाच्या सर्व विधानांना अनुभव सिद्ध पुराव्याचे आजार असलेच पाहिजेत. प्रत्येक विधानाचा पडताळा, अनुभव निष्ठ निकषांवर घेता आला पाहिजे. ज्ञान, नियम व सिद्धांत यांची वैधता निरीक्षण क्षम प्रयोगाने सिद्ध झाली पाहिजे.

**३) अध्ययन तंत्रे:**

राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास शास्त्र म्हणून करावयाचा असेल तर, जी अध्ययनतंत्रे नैसर्गिक शास्त्रामध्ये वापरली जाते, तिचाही उपयोग राजकीय समाजशास्त्रात करावयास हवा. वैज्ञानिक पद्धतीचा जितका जास्त वापर केला जाईल आणि जितकी संख्यात्मक विस्तारित होईल तितकी, वैयक्तिक मूल्यांना मुरड घालावी लागते. नैसर्गिक शास्त्रांमध्ये जी काटेकोर साधने वापरली जातात, त्यांचा उपयोग राज्यशास्त्रात करून घेतला पाहिजे असे वर्तनवादी म्हणतात.

**४) परिमाणन** :

वर्तनवादात घटना निरीक्षण असल्या की त्यांचे संख्यात्मिकरण करता येते. संख्यात्मक पद्धतीमुळे राजकीय गुंतागुंत वाढलेल्या परिस्थितीत अचूक माहिती मिळवता येते. परंतु परिमाणतेस परंपरावादी विरोध करतांना म्हणतात की, ज्या गोष्टी संख्येच्या स्वरूपात मांडता येत नाही, त्या संख्येच्या स्वरूपात मांडण्याचा अट्टाहास तरी का? परंतु वर्तनवादी या प्रश्नाचे खंडन करून, ते म्हणतात संशोधन पद्धतीत संख्याशास्त्रीय माहिती गोळा करणे, कठीण आहे. असे असले तरी, ती माहिती कितपत विश्वासार्ह मानावी हा प्रश्न देखील निर्माण होईल. त्यामुळे या पद्धतीने संशोधनाची विश्वासार्हता वाढेल.

munotes.in

**५) मूल्यतटस्थता**:

कोणत्याही संशोधनात मूल्य वापरावी का नाही याविषयी खूप वाद असलेला दिसतो. कारण मूल्य आणि वस्तुस्थिती हे दोन्ही एकमेकांपासून वेगळे असले तरी अल्प प्रमाणात त्या दोघांचाही वापर करता येईल. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय इत्यादी मूल्य म्हणून सांगणे सोपे आहे. परंतु त्यांच्या संबंधित वस्तुनिष्ठ संशोधन करणे कठीण आहे. कोणत्याही संशोधनाचा विचार करताना संशोधकांनी आपली मूल्य दूर ठेवली पाहिजेत. मूल्यांचा संबंध अनेकदा नीतीशी येतो. आदर्शाशी येतो. प्रयोगजन्य संशोधनात मूल्य अडथळा ठरत असतात.

**६) प्रमेय मांडणी:**

प्रत्येक संशोधनात काही नियम असतात पद्धती आणि साधने किंवा तंत्रे असतात. तथ्य संकलन, विश्लेषण, स्पष्टीकरण, भविष्य कथन अशा पायऱ्या वापरून पद्धतशीरपणे संशोधन केले जावे. संशोधनाला सिद्धांताची जोड मिळायला हवी. त्याशिवाय संशोधन अर्थपूर्ण होणार नाही. मात्र वर्तनवादी दृष्टिकोनातील या सिद्धांताचे स्वरूप अभिजात परंपरेतील चिंतन पर सिद्धांता पेक्षा मूलतः निराळे असते. या सिद्धांताचे स्वरूप कार्यकारणात्मक स्वरूपाचे असते. नीट मांडलेल्या व तर्काने परस्परांशी जोडल्या गेलेल्या अशा संकल्पनांच्या आधारे उभी केलेली प्रमेय असे त्यांचे स्वरूप असते.

**७) विशुद्धशास्त्र**:

वर्तनवादी आपल्या दृष्टीकोनास शास्त्रशुद्ध रूप देत असतात. ते म्हणतात काटेकोर संशोधन हे शास्त्रीय स्वरूप निर्माण करण्यास साधन म्हणून वापरता येते. परंतु परंपरावादी म्हणतात, जोपर्यंत राजकीय सिद्धांताचा उपयोग राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी होत नाही. तोपर्यंत त्या सिद्धांतांना काहीही किंमत नाही.

थोडक्यात संशोधन हे विशुद्ध शास्त्र आहे. त्याचा उपयोग सामाजिक, राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी झालाच पाहिजे. असा आग्रह धरणे चुकीचे आहे.

**८) एकत्रीकरण**:

राजकीय सिद्धांत काटेकोरपणे व्हावयाची असतील, त्यांच्यात परिपक्वता यावयाची असेल, तर ती सर्वसाधारण पातळीवर न्यावयाचे असतील, तर इतर सामाजिक शास्त्रांचा उपयोग राज्यशास्त्राने मोठ्या प्रमाणावर करून घेतला पाहिजे. डेविड इस्टनच्या मते, जेव्हा आपण मान्य करतो की, माणूस सामाजिक प्राणी आहे. तेव्हा तो आर्थिक, राजकीय, मानसशास्त्रीय आणि सांस्कृतिक प्राणी ही असतो. त्यांची एखादी कृती जर निर्वात प्रदेशांमध्ये इतर कोणत्याही कृतीशी संबंध न ठेवता अभ्यासावयाची असेल, तर तिचे आकलन आपल्याला कधीच होणार नाही. म्हणून राज्यशास्त्राला इतर सामाजिक शास्त्राशी नेहमी संपर्क करायचा असतो.

थोडक्यात राजकीय संशोधन परिपक्व व आणि बिनचूक व्हावयाचे असेल, तर अन्य सामाजिक शस्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग राज्यशास्त्राच्या अभ्यासाकांनी करून घ्यावा. सारांश रूपाने सायमन ने म्हटल्याप्रमाणे पारंपारिक विचारसरणी वर्णनात्मक आहे. तर वर्तनवादी विचारसरणी ही विश्लेषणात्मक आहे. परंपरावादी दृष्टिकोन आदर्शवादाची चर्चा करतो. त्याला मानवी व्यवहाराची जोड नसते, तर वर्तनवाद प्रत्यक्ष अनुभव, प्रयोग निरीक्षण इत्यादी गोष्टींना महत्त्व देतो.

## १.८ सारांश

राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास करताना राज्य आणि समाज या दोन घटकाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. एकंदरीतच राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात मॅक्स वेबर, वर्तनवादी दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टिकोन हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

## १.९ आपली प्रगती तपासा

१) राजकीय समाजशास्त्र म्हणजे काय स्पष्ट करा.

२) मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

३) वर्तनवादाचे तात्विक आधार स्पष्ट करा.

munotes.in

## १.१० अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ सूची


१) Barry, Nooman, An Introduction to Modern Political Theory, Macmilan, Londaon, 1981

२) D. P. Gauba, An Introduction to political theory, Macmillans, India, 2013

३) Bealey, frank, The Balckwell Dictionary of political science, Black kleel, 1999,

४) घांगरेकर. चि. ग., राज्यशास्त्राची मूलतत्त्वे, श्री मंगेश प्रकाशन, महाराष्ट्र, १९९९.


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# २

# मूलभूत संकल्पना

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ सत्ता

२.४ अधिमान्यता

२.५ धुरिणत्व

२.६ विद्यापीठीय प्रश्न

२.७ संदर्भग्रंथ

## २.१ उद्दिष्टये

सत्ता अधिमान्यता, धुरिणत्व या संकल्पना समजून घेून समाजातील त्याचे उपयोजन समजून घेणे.

## २.२ प्रस्तावना

सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता, धुरिणत्व या राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहेत. त्याशिवाय राज्यशास्त्राची कल्पनाच करू शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात आपण सत्ता, सत्तेची वैशिष्टये, प्रकार, मूलस्त्रोत तसेच अधिमान्यतेची संकल्पना. तिचे पैलू आणि धुरिणत्वाची संकल्पना समजून घेणार आहोत. धुरिणत्वाची संकल्पना समजून घेत असताना इटालियन व मार्क्सवादी विचारवंत ॲन्तिनियो ग्राम्शीचे विचार समजून घेणार आहोत.

## २.३ सत्ता

सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्राचा केंद्रबिंदू मानली जाते. संपूर्ण राजकारण हे सत्तेभोवतीच फिरत असते. मॅकियाव्हॅलीच्या काळापासून अनेक अभ्यासकांनी सत्ता संकल्पनेला मध्यवर्ती राजकीय संकल्पना मानली आहे. आधुनिक वर्तनवादी अभ्यासक या संकल्पनेला राज्यशास्त्राची गुरुकिल्ली मानतात. राज्यशास्त्र म्हणजे सत्तासंबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र अशी या विचारवंतांची धारणा आहे.

लारचेल आणि कालान यांच्या मते सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्रातील सर्वात मूळ संकल्पना असून राजकीय संबंध हे मूलत: सत्ता संबंधच असतात.

### २.३.१ सत्तेची व्याख्या –

सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे दुसऱ्यावर प्रभाव – वर्चस्व गाजविण्याची क्षमता होय.

१) **बर्टान्डू रसेल –** "सत्ता म्हणजे अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता होय."

munotes.in

२) **रॉबर्ट डहाल –** "सत्ता म्हणजे एकाची दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता होय."

३) **आर.एच.टॉनी –** "सत्ता म्हणजे व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तीचे वा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून होऊ शकतात. अशी क्षमता होय."

४) **डेव्हिड ईस्टन –** "एक व्यक्ती किंवा गट स्वत:च्या इच्छेनुसार इतरांच्या कृती निर्धारित करतो तेव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय."

वरील व्याख्यांवरून सत्तेची काही वैशिष्टये स्पष्ट करता येतील.

१) **संबंधात्मक –** अनेकदा व्यक्तीच्या मालकीकडे असलेल्या साधने, पैसा, सामर्थ्य, गुण म्हणजे सत्ता होय असे वाटते. परंतु सत्ता एकटया माणसापाशी कधीच नसते. कारण ती कोणावर तरी असावी लागते. म्हणजेच ती संबंधात्मक असते.

२) **वर्तनात्मक –** सत्ता वर्तनात्मक असते. सत्ताग्राहकाच्या वर्तनातून ती व्यक्त होत असते. एखाद्याजवळ मोठे पाशवी सामर्थ्य असेल व दुसऱ्याजवळ गडगंज संपत्ती असेल तर दोघांपैकी कोणाची सत्ता मोठी हे आपण कसे ठरवणार. परंतु दोघांपैकी कोणाच्या इच्छेवरून किती लोक आपले वर्तन बदलतात यावरून सत्तेचे मोजमाप केले जाते.

३) **प्रसंगानुरूप –** सत्ता प्रसंगानुरूप असते. स्थळ-काल परिस्थितीनुसार तिचे स्वरूप बदलते. एकाच व्यक्तीची सत्ता भिन्न प्रसंगात कमी-अधिक असते. पदामुळे जी सत्ता व्यक्तीला लाभते ती सत्ता पदावर नसताना व्यक्ती वापरू शकत नाही.

४) **मर्यादाशील –** सत्ताधारक सत्ताग्राहकावर जी सत्ता गाजवतो ती मर्यादाशील असते. म्हणजेच सत्ताधारकाच्या सत्तेवर नेहमीच मर्यादा पडतात.


उदा. एका मर्यादेपलीकडे लष्करप्रमुख सैनिकांना आज्ञापालन करण्यास भाग पाडू शकत नाही. त्याने तसे केल्यास सैनिक उठाव करू शकतात.

शासनदेखील विशिष्ट मर्यादा ओलांडून नागरिकांवर कर लादू शकत नाही. शासनाने तसे केल्याचा प्रयत्न केल्यास लोक प्रतिकार करतात.

५) **सत्तेचे स्वरूप भिन्न असते –** सत्ता ही सामाजिक – राजकीय – आर्थिक – नैतिक कोणत्याही स्वरुपाची असू शकते. उदा. राजकारण्यांकडे राजकीय सत्ता असते. श्रीमंतांकडे आर्थिक सत्ता असते. तर स्वामी, अध्यात्मिक गुरू यांच्याकडे नैतिक सत्ता असते.

### २.३.४ सत्तेचे प्रकार –

सत्तेचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात.




munotes.in

१) **राजकीय सत्ता (Political Power) -** राज्याची आणि शासनाची असलेली सत्ता म्हणजे राजकीय सत्ता. राजकीय सत्ता आपल्याला कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ या तीन अंगामध्ये आढळते. कायदेमंडळाला कायदेनिर्मितीची, कार्यकारी मंडळाला ते कायदे राबविण्याची आणि न्यायमंडळाला विधिमंडळाने बनवलेले कायदे घटनेला अनुसरून आहे किंवा नाही. तसेच कायदा मोडणाऱ्याला शिक्षा करण्याची सत्ता असते. तसेच राज्यात विविध प्रशासकीय अधिकारी, पोलीस, सैन्यदल, राजकीय नेते इ. जवळही राजकीय सत्ता असते.

२) **आर्थिक सत्ता (Economic Power) –** आर्थिक सत्ता म्हणजे धनसंपदा, उत्पादन व वितरणाची साधने इ. मालकीच्या बळावर निर्धन लोक वा राष्ट्रातील परिस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याची क्षमता होय. आर्थिक सत्ता राजकीय सत्तेवर मोठा प्रभाव गाजवते.

उदा. आधुनिक लोकशाही राज्यात भांडवलदार, उद्योजक, व्यापारी घराणी शासनाच्या सार्वजनिक धोरणे आणि निर्णयांवर प्रभाव गाजवित असतात. परिणामी सरकारला त्यांच्या हिताला अनुसरून निर्णय घ्यावे लागतात.

३) **वैचारिक सत्ता (Ideological Power) –** वैचारिक सत्ता राजकीय सत्तेला एक गूढ आधार प्राप्त करून देते. वैचारिक सत्ता म्हणजे एखाद्या विचारप्रणालीच्या आधारे लोकांवर प्रभाव पाडणे. वैचारिक सत्ता शासनाला लोकांची अधिमान्यता प्राप्त करून देत असते. राजकीय विचारप्रणाली शासकवर्गाच्या सत्तेला अधिक बळकट बनवते. लोक मनापासून शासनाच्या धोरण, निर्णयांना पाठींबा देतात.

आज जगात वेगवेळ्या विचारप्रणाली अस्तित्वात आहे. आणि त्यांचा प्रभाव जनसामान्यावर पडत असतो.

उदा. मार्क्सवाद, गांधीवाद, उदारमतवाद, सर्वकषवाद

### २.३.३ सत्तेचे मूलस्त्रोत (Sources of Power) –

हेरॉल्ड लॉसवेल आणि काप्लान यांनी Power & Society या ग्रंथात सर्वोच्च दंडसत्तेने ठरवलेले धोरण म्हणजे निर्णय व निर्णय घेण्याच्या कृतीत सहभाग म्हणजे सत्ता असे म्हटले आहे.

परंतु सत्तेचे विविध मूलस्त्रोत असतात. त्यातून सत्ता कशी निर्माण होते? हे दिसून येते.

सत्तेचे काही मूलस्त्रोत खालीलप्रमाणे –

१) **दंडाधिकार –** दंडाधिकार हा सत्तेचा मूलस्त्रोत असतो. ज्याच्याकडे सत्ता असते त्याला ती मोडणाऱ्याला शिक्षा करण्याचाही अधिकार असतो.

२) **रूढी – परंपरा -** रूढी-परंपरा यादेखील सत्तेचा महत्वाचा मूलस्त्रोत आहे. त्या रूढी-परंपरांतून सत्तेचा उगम होत असतो.

उदा. समाजात वरिष्ठ जातीत जन्मात आलेले. धार्मिक परंपरेने रूढ असलेले. शिक्षण-संस्कार ई. बाबतीत समृद्ध असलेले लोक समाजातील इतर दुर्बल घटकांवर आपली सत्ता गाजवित असतात. आचार-परंपरेच्या बाबतीतही लोकांचे इतरांवर वर्चस्व असते.

३) **आर्थिक स्थिती / उत्पादनाची साधने –** आर्थिक क्षेत्रात उत्पादनसांधनांच्या मालकीवरून सत्ता ठरत असते. ज्या वर्गाच्या हातात उत्पादनसाधनांची मालकी एकवटलेली असते तो वर्ग श्रमिक वर्गावर आपले वर्चस्व गाजवत असतो.

उदा. जमिनदारांचे कुळांवर असलेले आर्थिक वर्चस्व.

४) **राजकीय सत्ता –** राजकीय सत्ता हे सत्तेचे सर्वात महत्वाचे व प्रभावी स्वरूप आहे. समाजातील शासनाच्या ठिकाणी राजकीय सत्ता एकवटलेली असते. प्रामुख्याने शासनाला कायदेनिर्मिती कायद्याची अंमलबजावणी व कायदाभंग करणाऱ्याला शिक्षा करण्याचा अधिकार असतो. राजकीय सत्ता प्रामुख्याने राजकर्ते, प्रशासनकीय अधिकारी यांच्या हातात असते.

५) **राज्यसंस्था –** सत्ता प्राप्तीच्या खेळात राज्यसंस्था हे महत्वाचे प्यादे आहे. कारण एकतर राज्यसंस्थेच्या जवळ अफाट साधनसामग्री असते आणि दूसरे म्हणजे सक्ती करण्याचा अधिकार केवळ राज्यसंस्थेला असतो. दंडसत्ता ही राज्याच्या ठायी असते. सत्तेचे बहुतेक राजकारण राज्यसंस्थेभोवती केंद्रित होत असते.

याशिवाय धर्म, कायदा ही देखील सत्तेचे मूलस्त्रोत मानली जातात.

## २.४ अधिमान्यता

राजकीय सिद्धांत आणि विश्लेषणात अधिमान्यता ही एक महत्वाची संकल्पना मानली जाते. सत्तासंबंध केवळ अधिबलनांच्या प्रत्यस वापरावर अवलंबून असले तर ते तात्कालिक राहतात. त्या संबंधात स्थैर्य व सातत्य असल्याशिवाय ते सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन ठरू शकणार नाही. सत्ताधारकांच्या सत्तेच्या पाठीमागे दंड शक्तीचा आधार असणे आवश्यक आहे. तितकेच सत्ताग्राहकांच्या मनामध्ये सत्तेविषयी रास्तपणाची व औचित्याची भावना असणे सत्ता टिकवण्यासाठी आवश्यक असते. या भावनेतून सत्ताधारकाच्या सत्तेला जी संमती प्राप्त होते तिला अधिमान्यता असे म्हणतात.

लोकांच्या अंतरंगात सत्ताधीशांना एक सुप्त पाठींबा असतो. समाजाच्या अंतर्मनाने त्या राज्यकर्त्यांच्या स्वीकार केलेला असतो. त्या पाठींब्याला अधिमान्यता असे म्हणतात.

थोडक्यात राज्यकर्ते आणि शासित दोघांनाही एकमेकांच्या संमतीची गरज असते. एकमेकांना एकमेकांची संमती मिळून देणारी शक्ती म्हणजे अधिमान्यता होय.

उदा. शासनाने केलेले कायदे लोक भीतीपोटी पाळत नाही तर ते कायदे जनहितासाठी बनवलेले असल्यामुळे लोक त्यांचे पालन स्वेच्छेने करतात. तेव्हा त्या शासनाला, कायद्यांना अधिमान्यता प्राप्त होते.

अधिमान्यतेचा संबंध सत्ता वापरण्याच्या क्षमतेपेक्षा सत्ता वापण्याच्या अधिकाराशी असतो. त्यात सत्ताधारकाच्या आज्ञा करण्याच्या अधिकारा इतकेच सत्ताग्राहकाच्या आज्ञापालनाच्या अधिकाराला महत्व असते. सत्ताधारकाच्या आज्ञेला सत्ताग्राहकाची अधिमान्यतेची जोड मिळते तेव्हा त्यातून अधिसत्तेचा उदय होतो.

### २.४.१ अधिमान्यता – ऐतिहासिक उत्पत्ती –

अधिमान्यता हा शब्द सर्वप्रथम १८१५ च्या व्हिएन्ना कॉंग्रेस मध्ये वापरला गेला. नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपियन राष्ट्रांनी एकत्र येऊन अधिमान्यतेचे तत्व स्वीकारले. त्यांच्या मते नेपोलियनजवळ सैनिक शक्ती होती. परंतु समाजाच्या अंतर्मनाचा त्याला पाठिंबा नव्हता व नव्याने अस्तित्वात आलेल्या राष्ट्रांना जनतेच्या अंतर्मनाचा पाठींबा होता. म्हणून ती प्रभावीपणे कार्य करू शकली. अधिमान्यता प्राप्त झाल्यानंतर कायद्याला नवा अर्थ प्राप्त होतो. त्याचा मुक्तपणे स्वीकार केला जातो.

### २.४.२ अधिमान्यतेचे पैलू –

अधिमान्यतेचे दोन पैलू आहेत.

१) **नैतिक पैलू –** समाजमानाचा पाठिंबा असल्यामुळे काद्यांना व राज्यकर्त्यांच्या वृत्तींना आधार मिळतो. नैतिक पैलू अधिक आधारभूत असल्याने महत्वाचा ठरतो.

२) **राजकीय पैलू –** राज्यसत्तेला पाठींबा असल्यामुळे कायद्यात प्रभावीपणा निर्माण होतो.

### २.४.३ आधिमान्यता मिळण्याचे मार्ग

दंडशक्तीचा वापर करण्यापेक्षा अधिमान्यतेच्या आधारावर सत्ता चालवणे कमी खर्चाचे, कमी कष्टाचे व अधिक प्रभावी ठरू शकते. तरी अधिमान्यता टिकवण्यासाठी राज्यकर्त्यांना बरेच प्रयत्न करावे लागतात. अधिमान्यता मिळवण्याचे मार्ग खालील प्रमाणे –

१) **विचारप्रणालीतून अधिमान्यता –**

सत्ताधारक विचारांच्या आधारे मूल्यांची विशिष्ट आदर्श चौकट लोकांसमोर उभी करतात या विचारांना स्पष्ट, सुसंगत, आभिव्यक्त स्वरूप प्राप्त होते तेव्हा त्याला विचारप्रणाली असे म्हणतात. विचारप्रणालीमध्ये भावनिक क्षमता प्रचंड असल्यामुळे लोक स्वत:चे विचार बाजुला ठेवून राज्यकर्त्यांच्या आज्ञांचे पालन करतात. तेव्हा सत्ताधारकांच्या सत्तेला अधिमान्यता प्राप्त होते.

परंतु जेव्हा सत्ताधारक जनहिताचा विचार न करता स्वातंत्र्य क्षमता ही मूल्ये पायदळी तुडवतात तेव्हा त्यांची अधिमान्यता धोक्यात येऊ शकते. तसेच शासनाच्या विचारप्रणालीला शह देऊ शकणारी नवी विचारप्रणाली समाजात उद्यास येऊ शकते. विचार प्रणालीच्या संघर्षामुळे समाजात अस्थैर्य माजून अधिसत्ता कोसळण्याचा धोका असतो.

**२) विश्वास-साधनांच्या आधारे अधिमान्यता –**

अधिसत्तेवर लोकांचा विश्वास आणि श्रद्धा असते आणि तीच अधिसत्तेच्या कृतींना व निर्णयांना अधिमान्यता मिळवून देत असते. या विश्वासाचा सत्ताधारकाने मांडण्याचा प्रयत्न केला तर लोकांचा सत्ताधारकावरील विश्वास उडतो व ते सत्ताधारकाच्या सत्तेला संमती देत नाही. रूढी, परंपरा, व्यक्तीमत्व, राजपद ही अधिमान्यतेच्या विश्वासाची साधने आहेत.

## २.४.४ अधिमान्यतेची वैशिष्टये

**१) सारलक्षी अधिमान्यता आणि कार्यपध्दतीलक्षी अधिमान्यता –**

राज्यकर्त्यांची निवड कशी झाली आहे? तो आपले निर्णय कशाप्रकारे घेतो व राबवतो यापेक्षा त्याच्या कृतीच्या व निर्णयांच्या गुणवत्तेच्या आधारे त्याच्या सत्तेची अधिमान्यता निर्धातिर झालेली असते. तेव्हा त्या अधिमान्यतेला सारलक्षी अधिमान्यता म्हणतात.

उदा. कोणताही राज्यकर्ता स्व-स्वार्थासाठी सार्वजनिक हिताचा बळी देऊन आपली सत्ता वापरतो तेव्हा त्याची सत्ता अनधिमान्य ठरते व तो जुलमी ठरतो. प्लेटोच्या तत्वज्ञ राजाच्या संकल्पनेत ही अभिमान्यता व्यक्त होते.

कार्यपद्धती लक्षी अधिमान्यतेस राज्यकर्त्यांची निवडणूक पद्धती व त्यांची निर्णयपद्धती संविधानला, वैधानिक नियमांवर आधारित असते. राज्यकर्त्यांच्या विशिष्ट कृतीचा निर्णय कोणत्या पद्धतीने घेण्यात आला यावर त्यांची अधिमान्यता अवलंबून असते.

उदा. इंग्लडमध्ये सत्ता जसजशी राजाकडून ससंदेकडे संक्रमित झाली व संसदेचे लोकशाहीकरण होते गेले तसतशी सारलक्षी अधिमान्यतेची जागा कार्यपद्धतीलक्षी अधिमान्यतेने घेतली संसदेने केलेला कोणताही कायदा सांविधानिक व अधिकृत ठरू लागला.

**२) अधिमान्यता पंरपराजन्य असते –**

अधिसत्तेला प्रमाण मानून तिच्या इच्छेनुसार वागले पाहिजे. हा विचार राज्यशास्त्रीय विचारात बराच काळ केला जात असे. अधिमान्यतेची सर्व विचारसाधने परंपराजन्य आहेत. परंपरेतून व विशिष्ट परिस्थितीत ती निर्माण होतात व सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून माणसे ती शिकतात. जन्माला येताना ती त्या धारणा घेऊन आलेली नसतात. व्यक्तीचे स्थान जन्मावरून नव्हे तर गुण, कर्तबागरीवरून ठरते.

**३) अधिमान्यता वरून खाली आणि खालून वर –**

रोमन साम्राज्याच्या काळात अधिसत्तेला विरोध करणे पाप समजले जाई. म्हणजे अधिसत्तेची अधिमान्यता वरून खाली येणारी होती.

आता शासितांकडून शासकांकडे म्हणजे खालून वर अधिमान्यता जाते हे सर्वमान्य झाले आहे. अशा अधिमान्यतेत काही अटींच्या पूर्ततेसाठी अधिसत्तेला काही अधिकार दिलेले असतात. अधिसत्तेने ठरवून दिल्याप्रमाणे त्या कार्यपद्धती नुसार आपले कार्य पार पाडावे. त्यांनी तसे केले तरच त्यांची अधिमान्यता टिकून राहते. अन्यथा ती कोसळण्याचा संभव असतो.

वरून खाली येणाऱ्या अधिमान्यतेत राज्यकर्त्यांची अधिसत्ता सर्वसाधारण होती. म्हणजे सर्व क्षेत्रे तिच्या अधिकारकक्षे खाली होती. परंतु खालून वर जाणार अधिसत्ता त्यांचे अधिकारक्षेत्र विशिष्ट क्षेत्रापुरते सीमित करते. त्या क्षेत्राबाहेर जाऊन कृती केल्यास त्या कृतींना अधिमान्यता मिळू शकत नाही.

**४) अधिमान्यता आणि सामाजीकरण –**

अधिसत्तेला मान्यता देण्याची प्रवृत्ती जन्मसिद्ध नसते. तर ती समाजीकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्ती शिकतात. कुटुंब शाळा महाविद्यालये, विद्यापीठे, मित्र मंडळी, राजकीय पक्षासारखे, राजकीय समूह यांच्या द्वारे सामाजीकरण घडून येते. व्यक्ती अधिसत्तेला शरण जातात. तिला जबाबदार मानून तिच्यात स्वत: सहभागी होतात अधिसत्तेविषयीच्या श्रद्धा, भावनांना समाजीकरणाची प्रक्रिया आकार देते.

### २.४.५ अधिमान्यता टिकविणारे घटक –

१) संपत्ती

२) प्रचारसाधने

३) कार्यकर्त्यांची फौज

४) समाजातील जास्तीत जास्त घटकांचा पाठींबा

### २.४.६ आधिमान्यतेच्या मर्यादा –

१) अधिमान्यता ही सर्व राजकीय समाजात आवश्यक असली तरी विविध राजकीय व्यवस्थेत ती विविध स्वरूपात प्रकट होते. उदा. अमेरिकेसारख्या अध्यक्षय लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष काँग्रेस व न्यायपालिका अशा तीन्ही अंगातून तिचा आविष्कार होतो. अध्यक्षाला विधीमंडळाइतेकच अधिकार असले तरी दोघांच्या कार्यावर न्यायमंडळाचे नियंत्रण असते. अमेरिकन समाजातील अधिमान्यता या तीन्ही अंगातून मर्यादित स्वरूपात प्रकट होते.

२) संसदीय लोकशाहीत कार्यकारी सत्ता कायदेमंडळास जबाबदार असते. न्यायमंडळाला दोन्ही शासनाच्या अंगावर देखरेख ठेवण्याचे कार्य करावे लागते. अशा शासनव्यस्थेत वृत्तपत्रे आणि त्यांच्या टिकेला महत्व प्राप्त होते.

३) ज्या ठिकाणी लिखीत संविधान अस्तित्वात असते तेथे शासनाच्या अधिसत्तेवर न्यायालयाच्या मर्यादा पडतात.

munotes.in

४) वंशपरंपरागत शासनव्यसवस्थेत कायदा, विधीमंडळ, न्यायसत्तेचा फारसा प्रभाव पडत नाही तर वंशपरंपरेने व अभिजनसत्तेच्या वळणाने राजकीय सत्ता चालवली जाते व अधिमान्यतेला महत्व राहत नाही. नागरिकांची निष्ठा विशिष्ट वंशाप्रती किंवा व्यक्तीप्रती असल्याने लोकशाही नावापुरती असतेच. काय म्हटले जाते? यापेक्षा कोण म्हणते यावर भर असतो.

## २.५ धुरिणत्व (Hegemony)

सत्ता, अधिसत्ता, आधिमान्यता या मूलभूत राजकीय संकल्पनाप्रमाणे 'धुरिणत्व' ही संकल्पना राज्यशास्त्राच्या अभ्यासात महत्वाची मानली जाते.

वास्तविक पाहता धुरिणत्व ही संकल्पना नवमार्क्सवादी इटालिय विचारवंत ॲन्तितियो ग्राम्शी (१८९१-१९३७) या विचारवंताच्या लेखनात येते.

मार्क्सवादी राहूनही मार्क्सवादी विचाराला वेगळे वळण देण्याचा मूळ विचारात मोलाची भर घालून लेनिन-स्टॉलिनच्या मार्गापासून वेगळी वाट शोधण्याचा प्रयन्त करणाऱ्या विचारवंतामध्ये ग्राम्शीचे स्थान अग्रेसर आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मार्क्सवादी आणि जगातल्या राजकीय परिस्थितीची मीमांसा करून त्याने आपले विचार मांडले.

ग्राम्शी हा मानवतावादी विचारवंत होता. तो मुसोलिनीचा समकालीन होता. निरंकुश शासन, फॉसिझमला त्याने पूर्ण शक्तिशाली विरोध केला. लोकशाहीवर त्याचा विश्वास होता म्हणूनच त्याने कामगारांच्या लोकशाही पद्धतीच्या चळवळीचे समर्थन केले ग्राम्शी अशा एका समाजाची कल्पना करतो की, जो स्वयंचलित असेल त्यात दमन, शोषण, बलप्रयोग होणार नाही.

आपल्या विचारांची पद्धतशीर आणि सविस्तर मांडणी करण्याची संधी त्याला मिळाली नाही आपल्या तत्वज्ञानात ऐतिहासिक भौतिकवाद, धुरिणत्व आणि विचारवंताची भूमिका या विषयावर आपले विचार छोटया-छोटया टिपा, लेख यामधून मांडले. त्याने आपल्या विवेचनात विचारवंताना महत्वाचे स्थान दिले आहे.

ग्राम्शीने धुरिणत्वाचा सिद्धांत मांडला. त्याच्या मते, राजकीय सत्ता संपादन करण्यासांठी व ती टिकवून धरण्यासाठी विचारांच्या मदतीने प्रस्थापित केलेले सांस्कृतिक वर्चस्व महत्वाचे असते.

'The Modern Prince, 'Prison Notebooks' या ग्रंथात त्याने आपले विचार मांडले आहेत.

### २.५.१ प्रमुत्व किंवा धुरिणत्वाची संकल्पना (Hegemony)

ग्राम्शीच्या राजकीय विचारांमध्ये धुरिणत्वाच्या संकल्पनेला अनन्यसाधारण स्थान आहे. धुरिणत्व ही खास ग्राम्शीची देणगी म्हणावी लागेल. वर्चस्व राखणाऱ्या गटाचे विचारप्रणाली विषयक वर्चस्व म्हणजे 'धुरिणत्व' होय.

**वर्चस्व आणि धुरिणत्व –**

ग्राम्शीने वर्चस्व आणि धुरिणत्व यामध्ये भेद केला आहे. अधिशास्ता वर्ग कठोरपणे दुसऱ्या वर्गावर गुलामगिरी लादतो व आपले अधिशासन स्थिर करतो अशावेळी तेथे वर्चस्व नांदत असते. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांनी काळ्यांवर प्रस्थापित केलेले वर्चस्व हे या प्रकारात मोडते.

मात्र जेव्हा वर्चस्व कठोरपणे व आदेशात्मक पद्धतीने न लादता चातुर्याने व सर्वसंमतीचे वातावरण निर्माण करून लादले जाते तेव्हा तेथे धुरिणत्व असते. तेथे गुलामगिरी लादली जात नाही; पण अप्रत्यक्षपणे संमती लादली जाते.

**धुरिणत्वाची कार्यप्रणाली –**

ग्राम्शीच्या मते, सत्ताधारी वर्ग हे केवळ आर्थिक-सामाजिक वर्चस्व प्रस्थापित करूनच आपले प्रभूत्व टिकवित नाहीतर खरे प्रभूत्व ते वैचारिक स्तरावर प्रस्थापित करीत असतात. वैचारिक वर्चस्व हे सांस्कृतिक वर्चस्वातून निर्माण होते. म्हणून संस्कृती व साहित्य यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपले राजकीय आणि आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी कामगारवर्गाने संस्कृती व साहित्य यांच्या मार्गाने समाजावर वैचारिक प्रभूत्व प्रस्थापित केले पाहिजे. कारण प्रत्येक राज्यकर्ता वर्ग आपली नैतिक, राजकीय आणि सांस्कृतिक मूल्ये इतर वर्गास स्वीकारायला सांगून आपले प्रभूत्व प्रस्थापित करीत असतो. म्हणजेच या प्रक्रियेत तो सांस्कृतिक धुरिणत्व आपल्याकडे ठेवतो. अशा धुरिणत्वामध्ये तत्वज्ञान, नीती, कायदे थोडक्यात संस्कृती हे सर्वांचे म्हणून मिरवले जात असले तरी ती वरिष्ठ वर्गाचे धुरिणत्व करते. ते दृढ करण्याचा प्रयत्न करते. या प्रक्रियेत शासित वर्ग शासक वर्गाच्या प्रभूत्वाला मनोमन मान्यता देतो. असे शासन किंवा प्रभूत्व स्थिर होते. जे शासकीय दमनाने शक्य होत नाही ते सांस्कृतिक संस्करणाने साध्य होते. ग्राम्शीच्या मते, सत्ताधीश वर्गाची प्रभूत्व – प्रस्थापना म्हणजे एका नवीन जीवनदर्शनाची निर्मितीच असते.

सत्ताधीश वर्ग कटाक्षाने त्याची जीवनदृष्टी एका समूहाची नसून ती सर्व समाजाची आहे हे पटवून देतो. प्रभुत्व प्रस्थापित करण्याचे विविध मार्ग असतात. मंदिरे, मठ, विद्यापीठे, प्रतिष्ठाने यांचे समाजातील माहात्म्य वरिष्ठ वर्गाचे धुरिणत्व रूजविण्याची प्रक्रिया पार पाडीत असतात. सामाजिक संस्था, पुराणे, मिथके, कला, साहित्य यांच्या माध्यमातून वरिष्ठ वर्गाची मूल्ये व विचारप्रणाली सर्व समाजाची मूल्ये व विचारप्रणाली म्हणून संयुक्त स्वरूपात कार्यरत होतात.

धुरिणत्वाची संकल्पना द्वंद्वात्मक पद्धतीने प्रगट होते. तिला काही काळानंतर प्रतिधुरिणत्वाला (Counter Hegemony) तोंड द्यावे लागते. शेवटी एक नवीन धुरिणत्व म्हणजेच ग्राम्शीने म्हटल्याप्रमाणे एक नवी जीवनदृष्टी उद्याला येते. त्यावेळी सामाजिक – राजकीय सत्तांतर होत असते.

**२.५.२ बुद्धिजीवींची संकल्पना (Intellectuals) :**

ग्राम्शीच्या मते, वैचारिक प्रभूत्व प्रस्थापित करण्यासाठी विचारवंताचे कार्य मोलाचे असते. कारण कोणत्याही समाजात समाज प्रतिबद्ध विचारवंत राजकीय कृतीतून सिद्धांताला वळण

देत असतो व सिद्धांताच्या प्रकाशात कृती करीत असतो. हे कार्य तो विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीत, द्वंद्वात्मक विकासाच्या प्रवाहात स्वत:ला स्थापन करून करतो. त्यातून तो आपल्या जाणिवेच्या कक्षा वाढवतो, समाजाच्या स्थिती व गतीच्या संदर्भात इतिहासाला एक नवे वळर देण्याचा तो प्रयत्न करतो कारण तो कार्यकर्ता तत्वज्ञ असतो.

ग्राम्शीच्या मत, विचारवंतांचे दोन प्रकार असतात – १) पारंपारिक विचारवंत उदा. मध्ययुगातील धर्मगुरु. २) जैविक किंवा समाज प्रतिबद्ध (Organic) विचारवंत

पारंपारिक विचारवंत स्वत:ला परिस्थितीपासून अलग करतात आणि आपण स्वतंत्र व स्वायत्त आहोत असे मानतात. पण मूलत: ते यशास्थितीवादी असतात. ते कोणत्याही गटाशी निष्ठेने बांधलेले नसतात.

याउलट जैविक गटातील बुद्धिजीवींची कोणत्यातरी गटाशी सेंद्रिय जवळीक असते. समाजाशी जवळचे संबंध असणारे विचारवंत हे परिवर्तन इच्छुक असणाऱ्या वर्गाशी बांधील असतात. क्रांतिकारी वर्गाच्या क्रांतिकारी कृतीत त्यांचा सहभाग असतो. त्या आधारे ते क्रांतिकारी कृतीचे सिद्धांतन करून जनतेच्या जाणीवांचा विकास व विस्तार करीत असतात. त्या वर्गाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जाणिवा प्रगल्भ करतात. ग्राम्सीच्या मते, आतापर्यंत दडपल्या गेलेल्या वर्गानी स्वत:चे प्रभूत्व निर्माण केलेले नाही. पण हे कार्य तो वर्ग स्वत:च्या विचारवंतांच्या मदतीने करु शकेल.

आतापर्यंत विचारवंत व बहुजनसमाज यांच्या विचारात नेहमीच अंतर पडत आलेले आहे. ग्राम्शीच्या मते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे युरोपातील प्रबोधनाची चळवळ धर्मसुधारणेची चळवळ ही जनतेची चळवळ होती, तर पुरुज्जीवनाची मानवतावादी चळवळ ही विचारवंतांची चळवळ होती. ही मानवतावादी चळवळ बौद्धिकदृष्ट्या जास्त विकसित असली तरी ती सामाजिकदृष्ट्या प्रतिगामी होती. कारण तिच्यात समाजपरिवर्तनाची बीजे नव्हती. उलट बौद्धिकदृष्ट्या अविकसित असणारी धर्मसुधारणेची चळवळ पुरोगामी होती. त्या चळवळीत दिनदलित आपल्या मुक्तीचा मार्ग शोधीत होते. ग्राम्शीच्या मतानुसार, या दोघांतील अंतर प्रतिबद्ध विचारवंत कमी करू शकतात. स्थित्यंतरकारी गटासाठी प्रतिवर्चस्वाची सामग्री उभारू शकतात. कारण त्यातूनच त्यांना समाजपरिवर्तनाला साह्यभूत अशी मूल्य व्यवस्था निर्माण करता येईल. समाजातील जो घटक वर्गीय शक्तींच्या संघर्षात मध्यस्थाचे कार्य पार पाडीत असतो. त्यास ग्राम्शीने 'बुद्धिजीवी' म्हटले. हा सज घटक समाजातील तणाव कमी करीत असतो.

### २.५.३ नागरी समाज (Civil Society) –

नागरी समाजाविषयीच्या ग्राम्शीच्या विचारांवर थोडयाफार प्रमाणात चिद्ववादी विचारवंत हेगलेचा प्रभाव पडलेला आहे. त्याने मांडलेले नागरी समाजाविषयीचे विचार धुरिणत्वाच्या सिद्धांताप्रमाणे अत्यंत मोलाचे ठरतात.

धुरिणत्वाच्या सिद्धांतानुसार आधुनिक भांडवली समाजाच्या बलस्थानाचा प्रमुख स्त्रोत म्हणजे सत्ताधारी वर्गाचे धुरिणत्व, जे त्याच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक (Spiritual & Cultural Supermacy) सर्वोच्चतेतून व्यक्त होते. हा वर्ग नागरी समाजातील संस्थाच्या माध्यमातून जनसामान्यत: आपली मूल्यव्यवस्था रूजवतो. ग्राम्शीने भांडवली समाजाच्या

संस्कृतीतील प्रभूत्वाच्या संरचनांचा शोध घेण्याचा विशेष प्रयत्न केला आहे. त्याने भांडवली समाजातील इमल्याची दोन भागात विभागणी केली आहे.

**१) राजकीय समाज (Political Society) –**


राज्य आपले प्रभूत्व प्रस्थापित करण्यासाठी बलप्रयोगाचा अवलंब करते. शासनाची संपूर्ण चौकट याअंतर्गत मांडते. राज्याच्या दमनकारी संरचनाचा (Coercion Structures) यामध्ये अंतर्भाव होतो.

**२) नागरी समाज (Civil Society) –**

जो आपले प्रभूत्व स्थापन करण्यासाठी समाजाच्या संमतीचा आधार घेत असतो. त्या समाजाचा पायाशी जवळचा संबंध असून, तो सापेक्षता स्वायत्तही असतो.

यात कुटुंबसंस्था, शाळा आणि धार्मिक संस्थांचा समावेश होतो. याच्याशी संबंधित संरचनास अधिमान्यतेच्या संरचना मानल्या जातात. ग्राम्शीने आपल्या विश्लेषणात या संरचनांना विशेष महत्व दिले आहे.

ग्राम्शीची भांडवली समाजाची रचना खालील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




ग्राम्शीच्या मते, नागरी समाजातील कुटुंब, शाळा, धर्म या संस्था व्यक्तीला समाज व्यवहाराच्या नियमांशी परिचय करून देतात. आणि त्यांच्यावर हे बिंबवण्याचा प्रयत्न केला जातो की, त्यांनी शासकवर्गाप्रती सन्मानाची भावना जोपासली पाहिजे. या संरचना भांडवली समाजाच्या गतिनियमास समाजमान्यता (Legitmacy) प्राप्त करून देतात, ज्यामुळे समाजातील अन्यायदेखील न्यायासारखे भासायला लागेल म्हणून या संरचनास अधिमान्यतेच्या रचना (Structure of Legitimation) संबोधणे स्वाभाविक ठरते. भांडवली समाज स्थैयासाठी या संरचनांवर अवलंबून राहतो. जेव्हा

नागरी समाज असहमती अथवा मतभेदांचे नियंत्रण अथवा दमन करण्यात विफल ठरतो तेव्हा राज्यसंस्थेला दमन करण्यासाठी बलप्रयोगाची आवश्यकता वाटते. या सर्व विश्लेषणाचा अर्थ असा आहे की, साम्यवादी चळवळ भांडवली राज्य नष्ट करण्यापुरतीच मर्यादित राहता कामा नये तर मूल्ये आणि विचारांच्या क्षेत्रातील भांडवलशाहीच्या वैचारिक धुरिणात्वाचा अंत करण्यासाठी देखील तिला तत्पर राहावे लागेल.

ग्राम्शीच्या मते, भांडवलशाहीच्या विनाशातून समाजवाद उद्याला येईल, असा आशावाद बाळगणे निरर्थक ठरेल. त्याने मार्क्सवादी विचारवंतांना हे समजावण्याचा प्रयत्न केला की, त्यांना अर्थशास्त्राच्या मायाजालातून बाहेर पडून संस्कृती, साहित्य, नैतिक आणि वादविवादाच्या क्षेत्रात भांडवलशाहीशी झगडा सुरू ठेवावा लागेल. क्रांतिकारकांना सर्वप्रथम नागरी समाजाच्या संस्थांमध्ये शिरून जनजाणिवेत (Mass Consiousness) परिवर्तन घडवून आणावे लागेल.

## २.६ विद्यापीठीय प्रश्न

१) सत्ता म्हणजे काय? सत्तेची वैशिष्टये स्पष्ट करा

२) सत्ता म्हणजे काय? सत्तेचे मूलस्त्रोत सांगा

३) सत्तेचे प्रकार स्पष्ट करा

४) अधिमान्यता म्हणजे काय? अधिमान्यतेची वैशिष्टये स्पष्ट करा.

५) अधिमान्यतेचे पैलू स्पष्ट करा.

६) धुरिणत्वाची संकल्पना स्पष्ट करा.

## २.७ संदर्भग्रंथ

१) राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण – भा. ल. भोळे, पिपळपुरे प्रकाशन

२) आधुनिक राजकीय विश्लेषण – ता. र. इनामदार, आसीम वकिल

३) आधुनिक राजकीय विश्लेषण – दि. का. गर्दे, वि. मा. बाचल

❄❄❄❄❄❄❄



munotes.in

# ३ (१)

# स्तरीकरण (अभिजन; वर्ग)

**घटक रचना :**


३.१.१. उद्दिष्टये

३.१.२. प्रास्ताविक

३.१.३. विषय विवेचन

३.१.३.१. राजकीय अभिजन

३.१.३.२. विल्फ्रेडो पॅरेटोचा अभिजन सिद्धांत

३.१.३.३. सी.राईट मिल्स्चा अभिजन सिद्धांत

३.१.३.४. गिटानो मोस्काचा अभिजन सिद्धांत

३.१.४ सारांश

३.१.५ आपली प्रगती तपासा

३.१.६ संदर्भ ग्रंथसुची


## ३.१.१. उद्दिष्टये :

**स्तरीकरण** या घटकाच्या अभ्यासानंतर पुढील बाबी स्पष्ट् होतील.

१. राजकीय अभिजनाचा अर्थ व प्रकार समजून घेता येईल.

२. विल्फ्रेडो पॅरेटोचा अभिजन सिद्धांत स्पष्ट् होईल.

३. सी.राईट मिल्स्चा अभिजन सिद्धांत स्पष्ट होईल.

४. गिटानो मोस्काचा अभिजन सिद्धांत स्पष्ट होईल.

## ३.१.२. प्रास्ताविक :

सर्वसाधरणपणे १७ व्या शतकात 'राजकीय अभिजन' ही संकल्पना राज्यशास्त्रामध्ये वापरली जाऊ लागली. अभिजन म्हणजे त्या-त्या क्षेत्रातील श्रेष्ठ व्यक्ती असा अर्थ सुरुवातील अभिप्रेत असला तरी त्या विषयीचे अर्थ विवेचन पुढील प्रमाणे करता येईल. **Elite** हा शब्द Eligere या शब्दापासून विकसित झालेला आहे. या शब्दाचा अर्थ 'पसंतीनुसार निवड' (Selection by choice) दुसऱ्या शब्दात काही लोकांची निवड' नेतृत्व (Leadership) यासाठी अभिजन शब्द वापरला जातो.

## ३.१.३. विषय विवेचन :

**'राजकीय अभिजन'** म्हणजे काय ? या विविध विसणविध विचारवंतानी पुढील विवेचन केलेले आहे.

१) **टी.बी.बोटमोरे** : "समाजात कितीही स्थित्यंतरे झाली तरी ते समाजात प्रभावी व वरच्या स्थानावर असतात त्यांना राजकीय अभिजन म्हणतात."

२) **सी.टी.मिल्स** : "समाजातील सर्वोत्कृष्ट वर्ग ज्यांच्या जवळ पैसा, शक्ती, प्रतिष्ठा, असते व जो स्वत:ची इच्छा, कितीही विरोध झाला तरी इतरांवर लादण्यात यशस्वी होतो असतो, असा वर्ग राजकीय अभिजन असतो."

३) **गिटानो मोस्का** : "मागासलेल्या किंवा पूर्णत:विकसित समाजात दोन वर्ग असतात. शासक व शाशित, पैकी शासक हा राजकीय अभिजन असतो."

४) **डी.एच.कोल** : "समाजाच्या प्रत्येक स्तरावर अधिसत्ता निर्माण करणारा आणि ती बाळगणारा असा समूह म्हणजे राजकीय अभिजन होय."

५) **डॉ.राम आहुजा** : "राजकीय व्यवस्थेत जी राजकीय संरचना असते, त्या संरचनेच्या वरच्या पदावर ज्या प्रभावी शक्तिशाली व्यक्ती असतात त्या राजकीय अभिजन असतात."

### ३.१.३.१. राजकीय अभिजन :

थोडक्यात राजकीय अभिजनाच्या सिद्धांतानुसार "जनतेवर नेहमीच अभिजनांचे राज्य असते." व्यक्ती-व्यक्तीत असमानता ही नैसर्गिक आहे. त्यामुळेच ही बाब जागतिक आहे. म्हणूनच सर्व काळात सर्व देशात अभिजन सत्ता, पाहावयास मिळते. काही व्यवस्थेत अभिजनांची संख्या अतिशय कमी असते, तर त्या तुलनेत काही व्यवस्थेत जास्त असते.

'राजकीय अभिजन' व सत्ता विभाजन या विषयी अनेक विचारवंतांचे सिद्धांत पुढीलप्रमाणे पाहता येतील.

### ३.१.३.२. विल्फ्रेडो पॅरेटोचा अभिजन सिद्धांत :

समाजाचे शास्त्र तर्क व प्रयोग यावरच आधारलेले असले पाहिजे, असा आग्रह धरणारा व तर्कशुद्ध विचार,तथ्याचे निरीक्षण आणि प्रयोगात्मक पडताळा हेच समाजशास्त्राच्या सिद्धांताचे आधारस्तंभ असले पाहिजेत, असे मूलभूत विचार मांडणारा समाजशास्त्र म्हणजे विलफ्रेडो पॅरेतो हा होय. युरोपात प्रबोधन युगाला सुरुवात झाली आणि त्याचा परिणाम सामाजिक विचारांवर पडू लागला. विलफ्रेडो पॅरेतो या काळातच आपले संशोधन जगापुढे मांडतो आहे. त्यामुळे त्या काळाच्या विचारांचा प्रभाव त्याच्या विचारावर असणे नैसर्गिकच आहे. डार्विनवादी काँत, सिमाँ, इटालियन विचारवंत मॅकिव्हॅली यांचा प्रभाव पॅरेतोच्या विचारांवर दिसतो.

'बळी तो कान पिळी' हाच मानव समाजातील मूलभूत न्याय आहे. पॅरेतोच्या काळापर्यंत याच विचारांनी पकड मानवी स्वभावाविषयी इटालियन लोकांवर होती. 'समाजातील अल्पसंख्य पण बलदंड समाज बहुजन समाजावर कशी सत्ता गाजवतो व ती त्याला कशी गती प्राप्त होते' हाच त्याच सामाजिक चिंतनातील प्रमुख विचार होता. हाच विचार त्याच्या सर्व सिद्धांत व दृष्टिकोनाचा आधार होतो. मानवी वर्तनाचे उगमस्त्रोत शोधतांना त्याच्या इटालीयन परंपरेची स्पष्ट छाप दिसून येते. माणसाचा मूळ स्वभाव कसा आहे. अल्पसंख्य लोक बहुसंख्याकांवर सत्ता का गाजवतात या इटालियन परंपरेतील प्रश्नाचा विचार करतांना त्याने 'अभिजन' सिद्धांत मांडला.

**अभिजनांचे वर्ग :**

पॅरेतो अभिजनांचे दोन वर्ग आहेत असे सांगतो –

१ ) शासक अभिजन : समाजातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींचा समावेश या वर्गात हा वर्ग सत्ताधीश असतो. या वर्गातील व्यक्ती बुद्धिमान, चतूर, कुशल, समर्थ असतात. याच गुणांमुळे ते वरच्या पदावर आसनस्थ झालेले असतात व समाजात सत्ता गाजवत असतात.

२) अशासक अभिजन : या अभिजन वर्गाला सत्ताहीन अभिजन किंवा सामान्य अभिजन असेही म्हणतात. या वर्गातील अभिजनात शासक अभिजनांपेक्षा कमी कर्तृत्व असते. या अभिजन वर्गाचा राजकारण व अर्थकारण यावर विशेष प्रभाव नसतो. या प्रकारच्या अभिजन वर्गात सेनाधिकारी, व्यापारी, धार्मिक क्षेत्रातील वरिष्ठ व्यक्तीं इ. समावेश होतो.

**अभिजनाच्या अभिसरणाची प्रक्रिया :**

अभिजन वर्गाचे पतन अथवा सामान्य वर्गाचे अभिजन वर्गात रुपांतर होणे ही प्रक्रिया प्रत्येक समाजात नेहमीच चालू असते. त्यालाच पॅरेतोने 'अभिसरण प्रक्रिया' किंवा 'सामाजिक गतिमानतेची प्रक्रिया' असे संबोधले आहे. अशा अभिसरा प्रक्रियेमुळे ज्यांच्या अधिकारांना अथवा प्रतिष्ठांना धोका निर्माण होतो अशा व्यक्ती अभिसरण प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी प्रसंगी बळाचा अथवा सामर्थ्यांचा वापर करतात. परंतु या बाबीमुळे अभिजनांचे मान्य नसते. अशा वृत्तीचा सामान्यांकडून निषेध केला जातो. त्यांचे श्रेष्ठीजनत्व संपुष्ठात आणण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ 'अभिजन वर्ग हा स्वत्:च्या नाशाला स्वत:च कारणीभूत ठरतो या पार्श्वभूमीवर पॅरेतोने म्हटले आहे की "इतिहास हा कुलीन लोकांचे कब्रस्थान (स्मशान) असतो." या संदर्भात पॅरेतोने घराणेशाही, भारतीय समाजातील जाती, प्रथा इ.उदाहरणे दिली आहेत.

**अभिजनांचे गुण व कौशल्य :**

समाजात सुरवातीच्या काळात उच्च पदावर येणाऱ्या व्यक्ती या गुणवान असतात. त्या स्व्त:च्या गुणाच्या जोरावर उच्च पदावर आलेल्या असतात. साहजिकच त्यांच्याकडून अशा उच्चपदांची प्रतिष्ठा जोपासण्याचा काटेकोर प्रयत्न केला जातो. परंतु कालांतराने अशी पदे आनुवंशिक होतात. व्यक्तीच्या अंगी असलेले गुण हळुहळु कमी होतात. त्याजागी येण्याचा

कनिष्ठ वर्गाकडून प्रयत्न केला जातो. विशेष म्हणजे शासक किंवा अशासक अभिजनांकडून कनिष्ठ् वर्गातील गुणी व्यक्तींना किंवा त्यांच्या गुणांना डावलण्याचा प्रयत्न् झाला किंवा त्यांना उच्चपदे भूषविण्यास विरोध; तर समाजाचा समतोल बिघडेल. कनिष्ठ वर्गातील गुणसंपन्न व्यक्ती संघर्ष मार्गाचा अवलंब करतील. सर्व बळानिशी अभिजनांची मिरासदारी संपवतील व शेवटी अपात्र अभिजनांच्या ऐवजी पात्र असे अभिजन येतील.

**ठळक वैशिष्टये :**

१) पॅरेतोने प्रारंभी उच्च व कनिष्ठ अशा दोन वर्गात विभाजन केले व बुद्धी, चारित्र्य व कौशल्य या आधारावर गुणांनी संपन्न व्यक्तींना अभिजन वर्ग मानले

२) अभिजन वर्गात नेहमी अभिसरणाची प्रक्रिया होत असते. गुणाच्या आधारावर अशा वर्गाचे पतन झाले की, कनिष्ठ वर्गातून अभिजन वर्ग तयार होतो. गुणांच्या आधारावर ही जी प्रक्रिया होते त्यास तो 'उर्ध्वगामी व अधोगामी वक्र' असे संबोधतो.

३) अभिजन वर्गातील परिवर्तनता लक्षात घेऊन तो स्पष्ट करतो की, अभिजन वर्ग जेंव्हा कनिष्ठ वर्गाला नियंत्रीत करण्याची शक्ती गमावतो. तेंव्हा कनिष्ठ वर्गातून आलेले लोक अभिजन वर्गाची जागा भरुन काढतात.

४) पॅरेतची सिद्धांत लक्षात घेता भारतात वर्तमानात राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात 'श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रिया' सुरु असल्याचे आढळून येते.

**पॅरेतोच्या सिद्धांताचे मूल्यमापन :**

पॅरेतोच्या अभिजन अभिसरण सिद्धांत हा समाजशास्त्रातील एक महत्वपूर्ण सिद्धांत मानला जातो, असे असले तरी त्याची 'अभिजन' ही संकल्पना संदिग्ध स्वरुपाची वाटते. त्याचप्रमाणे तो शास्त्रीय सत्य आणि सामाजिक उपयुक्तता यांच्यात मूलभूत विरोध आहे असे मानतो. हे जर खरे असले म्हणजे उपयुक्त आहे. ते शास्त्रीय नाही किंवा उपयुक्त असेल, त्यात भ्रम असेल तर प्रत्येकजन स्वत:च्या मनाला येईल त्याला सत्य मानेल किंवा स्वत:च्या संदर्भात त्याची उपयुक्तता ठरवेल. अशा उलट सुलट विधानांमुळे पॅरेतोच्या विचारात स्पष्ट राजकीय पाठ मिळत नाही, अशी टिका त्याच्या विचारावर केली जाते.

**३.१.३.३. सी.राईट मिल्स्चा अभिजन सिद्धांत :**

अमेरिकन समाजव्यवस्था व राजकीय अभ्यासातून सी.राईट मिल्स यांनी सत्ता विभाजनाच्या 'अभिजन' सिद्धांताविषयी खालील विवेचन केलेले आहे.

**तीन प्रमुख अभिजन :**

समाजातील आर्थिक सत्ता, सामाजिक सत्ता राजकीय सत्ता या प्रामुख्याने परस्परांच्या शक्तीच्या अनुरोधाने कार्यरत होतात. या तीन सत्तामधील परस्परांची शक्ती परस्पर संबंधीत असते व त्यानुसार समाजात या तीन प्रकारच्या सत्ता उपोभगणारे तीन वर्ग अस्तित्वात असतात. हे तीन वर्गच अमेरिकन समाजात सत्ता उपभोगतात. ते वर्ग पुढीलप्रमाणे –

१ ) लष्करी (सेनापतींच्या वर्ग)

२) औद्योगिक (विविध औद्योगिक संस्थांचे मालक)

३) राजकीय (राजकीय नेते)

मिल्स यांच्या मते, वरील तिन्ही प्रकारचे गट प्रतिष्ठा संपन्न असतात. हे गट अमेरिकेतील उच्च वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. हेच ती वर्ग शासक वर्गाची निर्मितीही करतात व त्यांचा सामाजिक स्तर सारखाच असतो. या तिन्ही गटांना स्वतंत्रपणे आपआपली कार्ये पार पाडावी लागतात. लष्करी गटामध्ये विविध विभागाचे प्रमुख, सेनापती यांचा समावेश होतो. औद्योगिक स्वरुपाच्या गटामध्ये श्रीमंत व्यक्ती व उत्पादन व साधनांची मालकी असणारे लोक असतात तर राजकीय गटामध्ये राजकीय सत्ता व राजकीय हुकुम गाजविणारे हुकुमशहा असतात. हे तिन्ही प्रकारचे संपन्न लोक सर्व प्रकारच्या सत्ता आपल्याकडे केंद्रीत करतात व आपल्या मतानुसार सत्ता गाजवत असतात.

**तीन वर्गाचे सहसंबंध :**

लष्करी, औद्योगिक व राजकीय वर्ग हे जसे सामाजिक स्तरावर असतात, त्याचप्रमाणे ते एकमेकांशी परस्परसंबंधीत असतात. त्यांचे व्यक्तीगत व कौटुंबिक पातळीवरचे संबंध असतात. या तिन्ही क्षेत्रातील प्रमुख एकत्र येवून विनियमाद्वारे निर्णय घेतात. याद्वारे एक प्रकारे ते हुकुमच प्रस्थापित करीत

असतात. यानंतर अभिजन वर्गाचा दुसरा स्तर असतो. त्यात व्यापारी, दबाग गट, व्यावसाईक, राजकारणी व आर्थिक मजबूत स्थिती असणारा वर्ग असतो.

**आर्थिक व्यवस्था आणि अभिजन :**

मिल्स यांच्या 'अभिजना' च्या सिद्धांतात आर्थिक तत्वाला अधिक महत्त्व देतो. त्याच्या मते अभिजन हा 'राजकीय आर्थिक' स्थिती दर्शविणारा आहे. तर 'शासक' हा राजकीय स्थिती दर्शविणारा आहे. 'शासक वर्गाचा' या दृष्टिकोनातून अर्थ असा होतो की, एक आर्थिक वर्ग राजकीय दृष्टिकोनातून शासन करीत आहे. या विषयी मिल्स म्हणतो की, "आर्थिकदृष्टया बलवान असणारेच खरे सत्ताधीश असतात व असे लोक राष्ट्रीय (सत्ताधाऱ्यांना ) पुढाऱ्यांना सत्तेचे मुख्याधिकारी मानतात." म्हणूनच मिल्स यांच्यासाठी 'शक्तिशाली अभिजन वर्ग' (Power Elite Class) अशी संकल्पना वापरतो. याच आधारावर तो लष्करी, औद्योगिक व राजकीय लोकांचा शक्तीशाली अभिजन वर्गात समावेश करतो.

**लोकशाही : अभिजन आणि नोकरशाही :**

आधुनिक लोकशाही राष्ट्राच्या नोकरशाही प्रवृत्तीद्वारे वरील विचारप्रवाह निर्माण होत असतात आणि प्रस्थापित होत असतात. मिल्सच्या विचारानुसार, नोकरशाही वर्गाच्या अधिष्ठानांमुळे त्यांच्यामध्ये सत्ताविषयी चळवळ निर्माण होते. ती चळवळ समाजातल्या विविध वर्गा अंतर्गत विचारात घ्यावी लागते. सत्ता विभाजनाच्या अभिजन सिद्धांतानुसार सामान्य समाजव्यवस्था आणि भांडवलशाही राष्ट्रांत प्रतिष्ठीतांचा सत्ता गट अधिक प्रभावी असतो.

मिल्सने कार्लमार्कसच्या वर्ग संघर्षाचे समर्थन काही प्रमाणात केले असले तरी त्याच्या मते, वर्ग संघर्ष हा आधुनिक नोकरशाहीच्या अधिकार परंपराभोवती फिरत असतो. आधुनिक नोकरशाही ही अवैयक्तिक स्वरुपाची औपचारिक संबंध असणारी व कायदेशीर प्रमाणकांना महत्व देणारी असते. अशा स्वरुपाच्या नोकरशाहीतील व्यक्तीकडून कामाची अपेक्षा व्यक्त केली जाते. ती अपेक्षा पूर्ण करतीलच असे नाही. या प्रक्रियेत व्यक्तीला अवैयक्तिक स्थान प्राप्त होते, अशा प्रक्रियेत नोकरशाहीच्या अधिकार परंपरेत संघर्ष निर्माण होतो.

**सिद्धांताचे मूल्यमापन :**

सी.राईट मिल्स यांने मांडलेला सिद्धांत हा अमेरिकन समाजाला गृहीत धरुन मांडलेला असल्याने त्याच्या सर्वव्यापकतेविषयी स्पष्टीकरण करताना मर्यादा पडतात. त्याप्रमाणेच त्याच्या विचारांवरही काही प्रमाणात मर्यादा पडतात. 'काही विशिष्ट प्रजातींच्या हातात सत्ता केंद्रीत होते' हा विचार बहुवादी विचारसरणीच्या विचारवंतांना मान्य नाही. त्यांच्या मते, समाजात जे नकारवादी गट असतात. त्यांच्याच सत्तेची स्पर्धा चालू असते आणि या कार्यात त्यांना कधी यश प्राप्त होते. अशा वेळी मिल्सचा सिद्धांत एकांगी वाटतो.

सी. राईट मिल्सने हा सिद्धांत मांडत असतांना अमेरिकेतील उच्च किंवा मध्यम वर्गाचे विश्लेषण करणे हा हेतू दिसतो, त्या अर्थाने या सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट होतात. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये सत्ता केंद्रे व त्यातील अभिजन वर्ग बदलत आहेत अशा वेळा मिल्सने मांडलेले आर्थिक तत्व व समाजातील लष्करी, व्यापारी व राजकीय गटाविषयीचे विवेचन जशास तसे लागू होत असतांना दिसत नाही.

**३.१.३.४. गिटानो मोस्काचा अभिजन सिद्धांत :**

'मानवी समाजाच्या इतिहासात व्यक्तीचे हित जपण्याच्या दृष्टीने निर्माण झालेली सर्वात उत्तम पद्धती म्हणजे लोकशाही होय, लोकशाहीवादी अभिजन हे व्यक्तीस्वातंत्र्याला सर्वात कमी धोकादायक असतात' अशा स्वरुपाचे महत्वपूर्ण विचार मांडणारा विचारवंत गिटानो मोस्काने आपल्या 'The Ruling Class (१ ९३९) या ग्रंथाद्वारे सत्ता विभाजनाच्या अभिजनवादी सिद्धांत प्रतिपादन केला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पुर्वार्धात या इटालियन विचारवंतानें 'राजकीय अभिजन' संकल्पनेला खऱ्या अर्थाने सैद्धांतिक स्वरूप प्राप्त करून दिले.

इटालियन विचारवंत विलफ्रेडो पॅरेतो प्रामणेच गिटानो मोस्कानेही राजकारण आणि लोकशाही यांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय पद्धतीवर भर दिला. पॅरेतो हा सामाजिक विश्लेषणात रस घेतांना दिसतो, तो सर्व सामाजिक प्रश्नांचा एकत्रित अभ्यास केला पाहिजे अशी भूमिका घेतो; तर गिटानो मोस्काला राजकीय विश्लेषणात रस दिसतो. मोस्का हा 'लोकांचे शासन' हा पारंपारिक लोकशाहीचा सिद्धांत नाकारतो आणि लोकशाहीच्या राजकीय व्यवस्थेची अभिजन वर्गाला अनुसरुन मांडणी करतो. गिटानो मोस्कानो अभिजन वर्ग व त्यांच्या विषयीचा सत्ता सिद्धांत याविषयी अतिशय महत्वपूर्ण विवेचन केले आहे. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**राजकीय व्यवस्थेतील वर्ग :**

गिटानो मोस्का त्याच्या 'शासक वर्ग' या शिर्षकाखाली लिहिलेल्या ग्रंथामध्ये 'अभिजन वर्गा' चा सिद्धांत मांडतो व त्यामध्ये तो सर्व राजकीय व्यवस्थेत दोनच वर्ग असतात, असे प्रतिपादन करतात. ते वर्ग पुढीलप्रमाणे होत-

(A) शासक वर्ग (Rulinh Class) : शासक वर्ग हा सत्तेत असतो त्याच्या जवळ शक्ती निर्धारण करणारे घटक एकवटलेले असतात. हा वर्ग बहुसंख्यांकावर राज्य करत असतो. त्याच तो सर्वोच्च पदावर असणारा व्यक्ती समूह असतो.

अभिजन वर्गाची वैशिष्टये :

१ ) अभिजन वर्ग हा संघटित स्वरूपाचा असतो.

२) अभिजन वर्ग हा श्रेष्ठ व विशेष गुणसंपन्न बसतो.

३) बुद्धिजीवी व कुशल वर्गातूनच राजकीय अभिजन निवडले जातात.

४) राजकीय अभिजन हे अल्पसंख्यांक असतात.

५) समाज नियंत्रीत करण्याची शक्ती अभिजन वर्गाकडे असते.

६) राजकीय अभिजन वर्ग हा साधने व सुविधांचा उपभोग घेत असतो.

७) अभिजन वर्गाकउे विशेष अधिकार असतात.

८) अभिजन वर्ग

हा चपळ व सतर्क असतो व साधनांचा योग्य् वापर करून सत्ता टिकवत असतो.

(B) शासीत वर्ग (Ruled Class) : शासीत वर्ग हा बहुसंख्यांक असतो. तो सत्तेमध्ये अतिशय मर्यादित अर्थाने सहभागी असतो. तो स्वत:च्या नव्हे तर शासक वर्गाच्या तंत्राने काम करत असतो. हा वर्ग शासक वर्गाने दिलेल्या कायदेशीर किंवा बेकायदेशीर आज्ञा पाळत असतो.

**अभिजनाच्या श्रेष्ठत्वाचे आधार :**

१ ) अभिजन वर्ग हा अतिश्रीमंत वर्ग असतो त्याची संपत्ती हा त्याच्या अभिजन होण्यासाठी आधारभूत घटक बनतो.

२) अभिजन वर्गाच्या हातामध्ये लष्करी शक्ती असते. प्रसंगी स्वत: सत्ता टिकविण्यासाठी ते त्याचा उपयोग करत असतात.

३) धर्म हा अभिजन वर्गासाठी सहाय्यभूत घटक असतो. मुख्यत: धर्माने श्रेष्ठ् मानलेले लोकच अभिजन असतात.

४) अभिजन वर्ग हा उच्च शिक्षित, बुद्धिमान असतो, तोच त्याच्या अभिजन बनण्यासाठीचा महत्वाचा आधार बनतो.

५) अभिजन वर्ग हा त्याची सत्ता टिकविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत असतात.

**अनियंत्रीत सत्ता आणि दंड :**

सर्वच अभिजन वर्ग आपले (सत्ता) टिकावी यासाठी प्रयत्नशील असतात. ते यासाठी वारसा हक्क, विचारधारा व बळाचा वापर करु शकतात. ते गरजेनुरुप दबावासाठी हिंसक बंड किंवा संघर्षाचा ही मार्ग स्वीकारु शकतात. तरी सुद्धा कोणत्याही अभिजन वर्ग कायम सत्ताधारी राहत नाही. सत्तेच्या अनियंत्रीत वापरामुळे अभिजन वर्ग आळशी, कमजोर, ऐश आरामी बनतो. त्यामुळे हुशार लोक, उद्योगी लाके बंड करतात आणि त्याच्या हातातून सत्ता हिसकावून घेतात. प्रत्येक सत्ताधारी हा आपली सत्ता स्थिर ठेवण्यासाठी 'राजकीय सुत्रा' चा वापर करीत असतो.

**अभिजनाची राजकीय भरती :**

मोस्काच्या मते, सत्तेच्या प्रवाहावरच राजकीय भरती अवलंबून असते. एकाधिकार तत्त्व असेल तर तेथे श्रीमंत, महाजन, सामंत वर्णी राजकीय भरतीत लागते. मात्र उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत उदारमतवादी तत्व असेल तर तेथे राजकीय भरती मुक्त असते. सर्वांसाठी खुली असते. अभिजन वर्ग हा चतुर असल्याने तो त्याच वर्गातील नवीन सदस्यांपैकी गुणवान बुद्धिमानांची भरती करीत असतो.

**सिद्धांताचे महत्व :**

२० व्या शतकाच्या प्रारंभी मोस्का यांनी मांडलेला सत्ता विभाजनाचा अभिजन सिद्धांत हा राजकीय अभ्यासकांसाठी एक अमूल्य् असा सिद्धांत आहे. कोणतीही राजकीय व्यवस्था असो अशा व्यवस्थेतील अभिजन सिद्धांतामध्ये अनेक अर्थाने साम्य असले तरी एक राजकीय विश्लेषण म्हणून मोस्काच्या सिद्धांताचे विशेष योगदान आहे. मोस्काने प्रतिपादीत केलेले राजकीय व्यवस्थेतील शासक व शासीत यांच्या विषयीचे विवेचन आजही लागू पडते. यावरुनच या सिद्धांताचे महत्व लक्षात येते.

## ३.१.३.४ सारांश :

थोडक्यात राजकीय अभिजन संदर्भात विविध विचारवंताची मत वेगवेगळे आहेत. परंतु त्यातून शेवटी निष्कर्ष निघतो की, जनतेवर नेहमीच अभिजनांचे राज्य् असते व त्यांची संख्या अल्पप्रमाणात असते.

## ३.१.३.५ आपली प्रगती तपासा :

१ . राजकीय अभिजनाचा अर्थ व स्वरुप स्पष्ट् करा ?



munotes.in

२. विल्फ्रेडो पॅरेटोचा अभिजनचा सिद्धांत स्पष्ट् करा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

३. सी.राईटस मिल्सचा अभिजनाचा सिद्धांत स्पष्ट् करा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ३.१.३.६ संदर्भ ग्रंथ सूची :


१ . कुलकर्णी बी.वाय. -राजकीय समाजशास्त्र, विदयाप्रकाशन, नागपूर

२. बी.बी.पाटील- राजकीय संकल्पना, फडके प्रकाशन, पूणे

३. ढोबळे रमेश – प्रमुख राजकीय विचारप्रणाली,विदयाबुक पब्लिकेशन, औरंगाबाद

४. इनामदार पुराणीक- राजकीय समाजशास्त्र कार्टीनेंटल प्रकाशन, पुणे.


munotes.in

# ३ (२)

# स्तरीकरण (जात)

**घटक रचना :**

३.२.० उदिष्टये

३.२.१ .प्रास्तावीक

३.२.३. विषय विवेचन

३.२.३.१ . जातीचा अर्थ

३.२.३.२. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीच्या श्रेष्ठत्वाची प्रक्रिया

३.२.३.३. महाराष्ट्रातील प्रमख जातीसमुह

३.२.३.४. श्रेष्ठत्व जातीसमुह

३.२.३.५. मराठा कुणबी जातीसमुह

३.२.३.६. इतर मागास जातीचे राजकारण

३.२.३.७. कनिष्ठ जातीचे राजकारण :

## ३.२.० उदिष्टये :

**राजकीय स्तरीकरण या घटकाच्या अभ्यासातून पुढील बाबी स्पष्ट् होईल .**

१ . जातीच्या अर्थाचे स्वरूप स्पष्ट होईल.

२. महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीच्या श्रेष्ठत्वाची प्रक्रियेचे स्वरूप समजेल.

३. महाराष्ट्रातील प्रमुख जातीसमुहाचे प्रकार समजेल.

## ३.२.१ . प्रास्तावीक :

**'जात'** या घटकात आपण महाराष्ट्रातील राजकारणात जातीचे महत्व अभ्यासावर आहोत, महाराष्ट्रातील प्रमुख जातीसुह, महाराष्ट्राच्या राजकारणात जातीच्या श्रेष्ठत्वाची प्रक्रिया, मराठा कुणबी जातीसमुह, श्रेष्ठत्व जाती समुह, इतर मागास जातीचे राजकारण व कनिष्ठ राजकारण इ. बाबींचा अध्ययन सदरील घटकात करण्यात येईल.

## ३.२.३. विषय विवेचन :

भारतीय समाजाचे अध्ययन करीत असताना जाती व्यवस्थेचा विचार करणे आवश्यक आहे, कारण त्याशिवाय ग्रामीण शहरी जीवनातील सामाजिक, आर्थिक राजकीय, सांस्कृतिक अंगाना व त्यांच्यातील संबंधाच्या स्वरूपात जाणून घेता येणार नाही.

भारतात पांरपारिक वर्ण व्यवस्थेच्या परिभाषेत महाराष्ट्र सदयस्थितीत उच्च श्रेष्ठीजन ब्राम्हण वर्णांच्या आहेत. मराठा जाती स्वत: तील श्रेष्ठत्व क्षत्रियरुपी मानेतो, हा समाज कनिष्ठ् जातीसमुह वैश्य व शुद्र इ. वर्णात समाविष्ठ केल्या जातात. तर अनुसूचित जाती व जमाती भटक्या विमुक्त जाती इ. आहेत.

### ३.२.३.१ जातीचा अर्थ :

**जाती** हा शब्द 'जन' या संस्कृत धातू पासून बनला असून त्याचा अर्थ, 'जन्म' असा होतो. एकुण जाती म्हणजे जन्माने प्राप्त होणारी समुह सदस्यता.

'जाती' साठी 'Caste' हा इंग्रजी प्रतिशब्द् वापतरता. हा शब्द् 'Casta' म्हणजे 'वंश' या पोर्तुगिज भाषेतील शब्दापासून तयार झाला आहे; त्याचा अर्थ जन्माने मिळणारा व वंशानमुक्रमे चालणारा समुह असा होतो.

### ३.२.३.२ महाराष्ट्राच्या राजकारणात जातीच्या श्रेष्ठत्वाची प्रक्रिया :

महाराष्ट्राच्या राजकारणातून जातीचा सलोखा यामध्ये परिस्थिजन्य् स्थितीत बराच बदल होत आहे. वेळेनुसार राजकीय समीकरणे व सलोख्यात बदल होताना दिसत आहे. महाराष्ट्राच्या निर्मिती वेळी जास्तीत जास्त संख्या महाराष्ट्रात मराठयांची होती. त्यामुळे त्यांचे राजकीय वर्चस्व् होते. तसेच काळानुसार इतर बहुजन समाजात शैक्षणिक व आर्थिक सक्षमीकरण झाल्याकारणाने राजकारणात त्यांचा उदय झाला.

पळशीकरांच्या मते जाती-जातीतील संघर्ष याचे वर्ग संघर्षात परिवर्तन झाले त्याचेच परिणाम मराठा व अन्य् कनिष्ठ् जाती, हिंदु धर्मामध्ये प्रमुख मानल्या जातात. तसेच काळानुरूप, दलित समाजाचे राजकीय क्षेत्र उदय झालेला दूिसन येतो.

### सारांश :

महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीचे स्थान महत्वपूर्ण आहे. कारण त्यांचा परिणाम राजकीय समीकरणावर होताना दिसतो. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक राजकीय पक्ष आपले वर्चस्व टिकविण्यासाठी जातीच्या संख्याबळाचा आधार घेताना दिसतो.

### आपली प्रगती तपासा :

१. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीचे स्थान स्पष्ट करा ?

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

munotes.in

२. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीच्या श्रेष्ठत्व प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा ?

___

___

___

___

### ३.२.३.३ महाराष्ट्रातील प्रमख जातीसमुह :

महाराष्ट्रात असंख्य जाती, उपजाती, आहेत, त्यांचा वर्गीकरण अभ्यास खालीलप्रमाणे आहे.

१ . उच्च वर्णीय - ब्राम्हण, गोंड, सारस्वत, कायस्थ, चांद्रसेनीय, पाठारे, प्रभु इ.

२. मध्यम वर्णीय : मराठा, राजपुत, लेवा पाटील इ.

३. कनिष्ठ् जाती : कुणी मराठा व इतर २०० पेक्षा जास्त जाती यात आहेत.

४. अनुसूचित जाती – नवबौद्ध, दलित (अ.जा.) महार मांग इ. यात ५९ जाती आहेत.

५. अनुसुचित जमाती – यात ४९ आदिवासी, अतिदुर्गम भाग इ वास्तव करणारा अ.जमातीचा समावेश होतो.

६. अल्पसंख्य : जैन, बौद्ध, पारशी ख्रिश्चन, मुस्लीम इ.चा धार्मिक अल्पसंख्यांक गटात समावेश होता.

७. इरत जाती-जमाती : यात उत्तर भारतीय, तमिळी, तेलगु, इ. अमराठी गटाचा समावेश होतो.

### ३.२.३.४ श्रेष्ठत्व जातीसमुह :

सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम.एन. श्रीनिवास याची श्रेष्ठत्व असलेल्या प्रभुत्व जाती समुहाची संकल्पना समजावून घणे आवश्यक आहे.

एम.एन. श्रीनिवास यांनी 'कास्ट इन मॉडर्न इंडिया ॲण्ड अदर' या ग्रंथात जातीनिष्ठ भारतीय राजकारणाचे विश्लेषण करताना श्रेष्ठत्व असलेल्या जाती समुहाची संकल्पना विशद केली आहे. त्यांच्या मते 'स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही व सार्वत्रिक प्रौढ मताधिकारास स्वीकार करण्यात आल्याने जातीसमुहाच्या संख्या सामर्थ्याला विशेष महत्व प्राप्त झाले. संख्या सामर्थ्य व राजकारणातील याचा प्रभाव यातील संबंध विशद करताना एम.एन. श्रीनिवास यांनी Dominist Cast या संकल्पनेची रचना केली आहे. महाराष्ट्रात मराठा कुणबी जाती समुहाला प्रभावी म्हणता येईल.

### ३.२.३.५ मराठा कुणबी जातीसमुह :

**१९३१** च्या जणगणनेनुसार मराठी भाषिक प्रदेशात मराठी/मराठा कुणबी जाती समुहाची संख्या एकणु लोकसंख्येच्या ४०% टक्के हुन अधिक होती. पश्चिम महाराष्ट्रात व कोकणात त्याची टक्केवारी ४१% मराठवाडयात ३०% व विदर्भात २७% आहे. यापैकी ९६ कुळी वतनदार मराठे स्वत:ला क्षेत्रीय समजतात तर इतर 'मराठे' कुणबी या सदरात (ओ.बी.सी) या गटात मोडतात. विशेष बाब महाराष्ट्राच्या मतदानाच्या सुचीत 'कुणबी' जातीचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक व आर्थिक स्थरीकरण स्थरावर जरी मराठा/कुणबी जातीसमूह वेगळे असले तरी राजकारणात सत्ता प्राप्तीच्या प्रक्रियेत त्याची यूती असल्याने त्या जाती समुहाना मराठा/कुणबी एकत्रीकरण अशा प्रकारे ओळखले जाते.

### ३.२.३.६ इतर मागास जातीचे राजकारण :

इतर मागास जातीचे राजकारण हे संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होईपर्यत महाराष्ट्राच्या जातीय राजकारणात ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर ही भीतीही ब्राम्हण जाती व दलित जाती वगळता तसेच इतर सर्व जाती वगळता उरलेल्या सर्व जाती स्वत:ला बहुजन समाजाचा भाग समजत असे. त्यात शुद्र व अतिशुद्र या उभयताच्या समावेश केला जातो. १ ९५६ साली मराठी भाषिक जनतेचा विरोध डावलून द्विभाषिक मुंबई राज्य लादण्यात आल्याने संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात ब्राम्हणत्तेराची एकजुट टिकली. १ ९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हानांनी बेरीजेचे राजकारण करताना सर्व जाती गटाना सामावून घेण्याचा उदार दृष्टिकोन स्वीकारल्याने मराठयाला वर्चस्वाला बहुजन समाजातील इतर घटकांनी हरकत घेतली नाही. आपणास सत्तेचा पुरेसा वाटा मिळाल नाही, अशी खंत मराठेत्तर जातीच्या नेत्यानी वेळोवेळी व्यक्त केली होती. सत्तारुढ कॉग्रेस पक्षाच्या अंतर्गत राजकारणाचा एक भाग म्हणून 'मराठयाचे खच्चीकरण' करण्यास इंदिरा गांधीनी १९७१ नंतर प्रारंभ केला; या प्रक्रियेत त्यांनी 'मराठेत्तर' जातीची यूती घडवुन आणली व तेव्हापासून इतर मागास जातीचे राजकारण आकार घेऊ लागले.

### ३.२.३.७ कनिष्ठ जातीचे राजकारण :

महाराष्ट्राच्या राजकारणावर उच्च जातीच्या प्रक्रियेचा दिर्घकाळ ठसा होता; परंतु १ ९७१ नंतर केंद्राच्या आशिवार्दाने मराठा वर्चस्वाला कॉग्रेसला अंतर्गत शह देण्याचे प्रयत्न सुरु झाले. महाराष्ट्रातील कॉग्रेस आमदार मंत्री यांच्यातील पाटील/देशमुखाचे प्रमाण कमी होऊन कनिष्ठ जातीच्या प्रतिनीधीची संख्या वाढली, हा बदल प्रतिकात्मकरित्या वरवरचा असला तरी अस्थायी स्वरुपाचा होता; पण त्यातून कनिष्ठ जातीचे पदार्पण झाले. भारतीय जनता पक्षानेही १ ९८२ पासून महाराष्ट्रात कनिष्ठ जातीचे राजकारण करण्यावर लक्ष केंद्रीत केले शहरी मध्यम वर्गीय व ब्राम्हणी पाठींब्यावर राजकारण टिकुन राहणे अवघड आहे. याची जाणीव या पक्षाला आपल्या नव्या अवतारात झाली. तसेच मराठा जाती मध्ये शिरकाव करणे अवघड असल्याचेही लक्षात आले त्यामुळे ग्रामीण भागात कनिष्ठ जातीची पताका खांदयावर घेऊन भाजपाने गेल्या काही दशकात महाराष्ट्रात पाय रोवल्याचे प्रयत्न केले.

शिवसेनेने १ ९८९ सालच्या लोकसभा व १ ९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत भागात जातीच्या उमेदवाराना उमेदवारी देऊन इ. मा. जातींना आवर्जून घेण्याचा प्रयत्न् केला;

त्यामुळे विदर्भ भागात शिवसेना भाजपा युतीला मर्यादीत यश ही मिळाले. तसेच मंडल आयोगाचा अहवाला व त्यांची अंमलबजावणी इ.मुळे कनिष्ठ जातीचे राज्याच्या राजकारणातील स्थान बळकट झाले.

## ३.२.४ सारांश :-

एकंदरीतपणे महराष्ट्राच्या राजकारणात मराठा-कुणबी जातीसमुहाकडे नेतृत्व झुकलेले होते, ते काळानुरुप बदलताना दिसत आहे; त्यामुळे इतर अनुसुचित जाती, जमाती व इ.मा.जा. याचे सुद्धा महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान काही प्रमाणात बळकट होताना दिसत आहे.

## ३.२.५ आपली प्रगती तपासा :

१. महाराष्ट्रातील मराठा कुणबी जातीच्या राजकारणाचे स्वरुप स्पष्ट करा ?

२. महाराष्ट्रातील इतर मागास जातीचे राजकारण स्पष्ट करा ?

३. महाराष्ट्रातील कनिष्ठ् जातीचे राजकारण उदाहरणासह स्पष्ट् करा ?

## ३.२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथसुची :-

१. Rajani Kothari- State Politics In India.

२. Splyer. Risrinivaosam- State in Indian Democracy

३. व्होरा राजेंद्र व सुहास पळशीकर – महाराष्ट्रातील सत्तांतर

४. डॉ.य.दी फडके- २० व्या शतकातील महाराष्ट्र खंड १ ते ६

५. पंडीत नीलनी – जातीवाद व वर्गवाद

६. कुलकर्णी मंगेश – जमातवादाचे महाराष्ट्रातील राजकारण.



munotes.in

# ३ (२)

# स्तरीकरण (लिंग)

**घटक रचना :**

३.३.० उद्दिष्टये

३.३.१. प्रास्ताविक

३.३.२. विषय विवेचन

३.३.२.१. महिलाच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी

३.३.२.२. केंद्रीय मंत्रीमंडळातील महिलाचे प्रतिनिधीत्व

३.३.२.३. निर्णय प्रक्रियेतील महिलाचे योगदान

३.३.२.४. संसदेतील महिलांचा सहभाग

## ३.३.० उद्दिष्टये

स्तरीकरण या घटकातील अभ्यासातून पुढील बाबी स्पष्ट् होतील.

१. लिंगभेदाचा राजकारणावर झालेला परिणाम अभ्यासणे.

२. महिलाची राजकीय सहभाग संकल्पना अध्ययन करणे.

३. भारतीय केंद्रीय मंत्रीमंडळात महिलाच्या प्रतिनिधीचा अभ्यास करणे.

४. भारतीय संसदेतील महिलाचा सहभाग कसा आहे, याचे अध्ययन करणे.

## ३.३.१. प्रास्ताविक :

या घटकात आपण लिंगभेद व राजकारण, महिलाच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी, केंद्रीय मंत्रीमंडळातील महिलाचे प्रतिनिधीत्व्, संसदेतील महिलाचा सहभाग, इ. घटकाचा अभ्यास करणार आहोत.

## ३.३.२. विषय विवेचन

भारतीय राजकारणात स्त्री-पुरुष प्रमाणाचा तुलनात्मक अभ्यास केल्यावर जाणवते की, पुरुष प्रमाणाच्या तुलनेत महिला वर्गाचे राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधीत्व व सहभाग, अल्पप्रमाणात आहे. एकंदरीतपणे निसर्गाने बुद्धी, कौशल्य सर्वांना समान दिलेले असले तरी इतिहास काळापासून तर आजपर्यत पुरूषापेक्षा महिलांना प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले गेले. त्यामुळे स्त्रीयाच्या मुलभूत हक्क बाबत जागृती निर्माण करणे काळाची गरज आहे. कारण गावाच्या ग्रामपंचायतीपासून तर संसदेत महिलांना जास्तीत जास्त प्रतिनिधीत्व देऊन

त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला वाचा पुरेल. तसेच त्यांच्या प्रतिनिधीत्वाच्या कार्यामुळे देश विकासाच्या कार्यात हातभार लाभेल.

### ३.३.२.१. महिलाच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी

महिलाच्या राजकीय सबलीकरणासाठी त्यांचा राजकीय व्यवस्थेत जास्तीत जास्त सहभाग असावा, अस एक मत प्रवाह आधूनिक काळात निर्माण झाला आहे. भारतातील महाराष्ट्र हे औद्योगिक दृष्टया प्रगत राज्य. अनेक सामाजिक आर्थिक व राजकीय चळवळीचा उगम याच महाराष्ट्रातून झाला आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रातून सुरु करुन सर्वांगीण महिला प्रबोधनीय कार्य केले. त्यामूळे राजकीय हक्क व अधिकार जागृती बाबत महाराष्ट्रातील महिला अल्पप्रमाणात जागृत आहे. महाराष्ट्रात महिलाच्या विकासासाठी लढणाऱ्या अनेक संघटना अंतर्गत सक्रिय कार्यकर्त्या महिला देखील आहेत परंतू प्रत्यक्ष राजकारणात व निवडणुकीत (१ ९९१ ,१ ९६६ १ ९९८ व १ ९९९) विविध पक्षाच्या अधिकृत किंवा अपक्ष म्हणून अनुक्रमे ३,२,२ व ४ महिलाचाच लोकसभेत प्रवेश मिळाला आहे. एकंदरित महाराष्ट्राच्या राजकारणात पुरूषापेक्षा महिला वर्गाचे प्रतिनिधीत्व अल्पप्रमाणात असल्याचे दिसून आले.

### ३.३.२.२. केंद्रीय मंत्रीमंडळातील महिलाचे प्रतिनिधीत्व

संपुर्ण २००६ ते २००९ चा विचार करता सरासरी टक्केवारी ही १ ०.२५% एवढीच आहे, याचाच अर्थ असा आहे की, राजकीय सत्तेमध्ये महिलाच्या सहभागाचे प्रमाण हे अतिशय अल्प प्रमाणात आहे.

तक्ता क्र.१

केंद्रीय मंत्रिमंडळातील महिलाचे प्रतिनिधीत्व

| अ. क्र. | मंत्रीमंडळातील पद | महिला | | पुरुष | | एकुण | | महिला एकुण % | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००६ | २००९ | २००६ | २००९ | २००६ | २००९ | २००६ | २००९ |
| १ | कॅबिनेट मंत्री | १ | ३ | २८ | ३० | २९ | ३३ | ३.४५ | ९.०९ |
| २ | राज्यमंत्री | ६ | ५ | ३३ | ४० | ३९ | ४५ | १५.३८ | ११.१ |
| | एकुण | ७ | ८ | ६१ | ७० | ६८ | ७८ | १०.२९ | १०.२५ |

एकंदरीत सन २००६ ते २००९ या काळात केंद्रीय मंत्रीमंडळातील महिलाच्या प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करताना तक्ता क्र.९ च्या सहाय्याने असे दिसून येते की, कॅबिनेट परंतु २००९ मध्ये त्यात वाढ होऊन ०९.९ एवढीच झाली आहे. तर राज्यमंत्री म्हणून

२००६ साली १५.३८% एवढी होती तसेच २००९ मध्ये ती कमी होऊन ११.१ झाली आहे.

### ३.३.२.३. निर्णय प्रक्रियेतील महिलाचे योगदान

१९९९-२००९ या अहवालानुसार लोकसभा व पंचायतराज संस्था इ. या दोन पातळीवर महिलाचे योगदान स्पष्ट् केले आहे. तक्ता क्र.२ वरुन आपल्याला यांचा आढावा घेता येईल.

तक्ता क्र.२

महिलाचा राजकीय सहभाग व निर्णय प्रक्रिया (१९९९-२००९)

| अ.क्र. | भारत/राज्य | लोकसभा (राजकीय निर्णय प्रक्रिया) | | पंचायतराज संस्था | |
|---|---|---|---|---|---|
| | भारत/राज्ये (१९९९) | महिला | पुरुष | महिला | एकुण |
| | | ४९ | ४९४ | ८१३६७८ | ३१.३% |
| | भारत/राज्ये (२००४) | ५९ | ४८६ | - | - |
| | भारत/राज्ये (२००९) | ५९ | ४८६ | १०३८०४५ | ३६.८४% |
| १ | आंध्रप्रदेश | ०५ | ३७ | ७४०१९ | ३३.०४ |
| २ | अरुणाचल प्रदेश | - | ०२ | ३१८३ | ३८.५४ |
| ३ | आसाम | ०२ | १२ | ९९०३ | ३८.९३ |
| ४ | बिहार | ०४ | ३६ | ७०४०० | ५४.१२ |
| ५ | छत्तीसगढ | ०३ | ०८ | ५४१५९ | ३१.७३ |
| ६ | दिल्ली | ०१ | ०६ | - | - |
| ७ | गोवा | - | ०२ | ५३४ | ३४.२५ |
| ८ | गुजरात | ०४ | २२ | ३८०६८ | ३३.२५ |
| ९ | हरियाणा | ०२ | ०८ | २५५०६ | ३६.५४ |
| १० | हिमाचल प्रदेश | - | ०४ | ९५५२ | ३७.८६ |
| ११ | जम्मु-काश्मिर- | - | ०६ | - | - |
| १२ | झारखंड | - | १४ | ०० | ०० |
| १३ | कर्नाटक | ०१ | २७ | ४१२१० | ४२.८९ |
| १४ | केरळ | - | २० | ५६१४ | ३०.३८ |
| १५ | मध्यप्रदेश | ०६ | २३ | १३६१९६ | ३४.३५ |
| १६ | महाराष्ट्र | ०३ | ४५ | ७६५८१ | ३३.३५ |
| १७ | मणिपूर | - | ०२ | ७५८ | ४३.६६ |
| १८ | मेघालय | ०१ | ०२ | - | - |



munotes.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | मिझोराम | - | ०१ | - | - |
| २० | नागालँण्ड् | - | ०१ | - | - |
| २१ | ओडिसा | - | २१ | ३३६३० | ३६.३७ |
| २२ | पंजाब | ०४ | १० | ३१८०९ | ३४.९७ |
| २३ | राजस्थान | ०३ | २२ | ४२४३४ | ३६.३७ |
| २४ | सिक्कीम | - | १ | ३९४ | ३९.९६ |
| २५ | तामिळनाडू | - | ३९ | ३९३६४ | ३३७९ |
| २६ | त्रिपुरा | - | ०२ | १९८६ | ३४.६४ |
| २७ | उत्तरप्रदेश | १३ | ६७ | २९९०२५ | ३८.७५ |
| २८ | उत्तराखंड | - | ०५ | २१५१७ | ३७.४२ |
| २९ | पश्चिम बंगाल | ०७ | ३५ | २१३५१ | ३६.२९ |

### ३.३.२.४. संसदेतील महिलांचा सहभाग

१९५२ ते २००९ पर्यत संसदेतील महिलांचा अभ्यास करतांना असे दिसून आले की, लोकसभेत महिलांचा सहभाग हा सरासरी १० ते ११ टक्के पर्यत आहे. तसेच राज्यसभेतील महिलांचा सहभाग ११ ते १२ टक्के पर्यत आहे.

## ३.४ सारांश :

भारताच्या राजकारणाचा स्त्री-पुरष असा लिंगात्मक अभ्यास केल्यावर जाणवले की, पुरूषापेक्षा महिला वर्गाचे प्रतिनिधीत्व व सहभाग हा अल्प-प्रमाणात आहे, परंतु काळानुरूप शिक्षणाचे वाढते प्रमाण व महिला वर्गातील जागृतीमुळे प्राचीन, मध्ययुगीन काळापेक्षा आधुनिक काळात महिलाचा राजकीय सहभाग वाढले, अशी अपेक्षा ठेवूया.

## ३.५ आपली प्रगती तपासा :

१ . महाराष्ट्रातील महिलाचा राजकीय सहभाग स्पष्ट करा ?

२. केंद्रीय मंत्रीमंडळातील महिलाचे प्रतिनिधीत्व यावर माहिती लिहा ?

munotes.in

३. भारतीय संसदेतील निर्णय प्रक्रियेतील महिलाचे योगदान स्पष्ट करा ?

## ३.६ संदर्भ ग्रंथसुची :


१. डॉ.वैशाली पवार- महिलाच्या सत्ता संघर्षाचा आलेख, डायमंड प्रकाशन, २०१ २.

२. दातार छाया – स्त्री , ग्रंथाली प्रकाशन, पूणे-१९८४

३. पाध्ये कमल- स्त्रीचे समाजातील स्थान व भूमिका, समाजवादी, पूणे.

४. भारत सरकार, निवडणूक आयोग, नवी दिल्ली,

५. १ ५ वी लोकसभा, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली.


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ४ (१)

# सामाजिक आणि राजकीय गतिमानता

## राजकीय संस्कृती: प्रकार आणि प्रभाव पाडणारे घटक

**घटक रचना :**

४.१.१.उद्दिष्टये

४.१.२. प्रास्ताविक

४.१.३. विषय विवेचन

४.१.३.१. राजकीय संस्कृती अर्थ व व्याख्या

४.१.३.२. राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण

४.१.३.३. राजकीय संस्कृतीचे मुलाधार

४.१.३.४. राजकीय संस्कृतीतील बदल  व विकास

४.१. ३.५. राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे माध्यमे

### ४.१.१. उद्दिष्टये :

**'सामाजिक आणि राजकीय गतिमानता'** या घटकाच्या अभ्यासानंतर पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१ . राजकीय संस्कृती अर्थ व स्वरुप समजेल.

२. राजकीय संस्कृतीच्या वर्गीकरणाचे स्वरुप समजेल.

३. राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे माध्यमाची माहिती मिळेल.

### ४.१.२. प्रास्ताविक :

सामाजिक आणि राजकीय गतिमानता अभ्यासतांना राजकीय संस्कृती, राजकीय सामाजीकरण आणि राजकीय सहभाग या घटकांचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येक समाजाची स्वत:ची अशी एक राजकीय संस्कृती असते. काळानुरूप ती संस्कृती बदलत जाते. म्हणजेच राजकीय संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. सामाजिक आणि राजकीय गतिमानतेतला दुसरा बदल हा राजकीय सामाजिकरणाच्या माध्यमातून होते. राजकीय सामाजिकरणाच्या माध्यमातून लोकांच्या राजकीय प्रवृत्ती व राजकीय ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्याचे काम राजकीय  सामाजीकरण करते. राजकीय

munotes.in

सामाजिकरणाची व्याप्ती वाढविण्यासाठी मोठया प्रमाणात राजकीय सहभाग हा वाढविणे गरजेचे आहे.

## ४.१.३. विषय विवेचन :

'राजकीय संस्कृती' ही संकल्पना समाजशास्त्रातील 'संस्कृती' या संकल्पनेचाच एक भाग आहे. दोन्ही शास्त्रात समान अर्थानेच **'संस्कृती'** ही संकल्पना वापरली जाते. समाजशास्त्रात संस्कृतीची जी व्याख्या करण्यात आली आहे. तिचा आशय लक्षात घेऊनच राज्यशास्त्रानी राजकीय संस्कृतीची व्याखा करयाचा प्रयत्न् केला आहे. त्यासाठी आधी समाजशास्त्रात संस्कृतीची जी व्याखा करण्यात आली आहे ती लक्षात घेणे महत्वाचे ठरेल. यासंदर्भात दोन व्याखा पुढीलप्रमाणे आहेत.

प्रत्येक समाजाची स्वत:ची अशी एक राजकीय संस्कृती असते. समाजानुरुप ती वेगवेगळी असते. राजकीय संस्कृती हा राजकीय व्यवस्थेच्या वर्गीकरणाचा एक महत्वाचा आधार असतो, राजकीय संस्कृतीत विशिष्ट समाजात तत्कालीन रूढ असलेल्या प्रवृत्ती, श्रद्धा, मुल्ये व कौशल्ये यांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे राजकीय संस्था व व्यवहार राबविण्याची शैली यासारख्या गोष्टी, लोकशाही मुल्ये, धर्मालीतता या गोष्टीशी राजकीय संस्कृतीच्या आधारभुत असतात.

राजकीय संस्कृती हा राजकीय व्यवस्थेचा एक भाग असतो आणि राजकीय व्यवस्था ही संपूर्ण समाज व्यवस्थेचा (Total Social System) एक घटकभाग असतो. म्हणजेच ती समाज व्यवस्थेची उपव्यवस्था (Subsystem) असते. तसेच प्रत्येक राजकीय व्यवस्थेत राजकीय संस्कृती महत्वाची असते. ल्युसियन पाय यानीही नवीन उदयास येणाऱ्या राजकीय व्यवस्थांच्या संदर्भात राजकीय संस्कृतीच्या अध्ययनास बरेच महत्व दिले आहे. 'राजकीय विरोधाचे स्वरूप हे तेथील राजकीय संस्कृतीवरी अवलंबुन असते.' असे रॉबर्ट ढाल यांनी म्हटले आहे.

### ४.१.३.१. राजकीय संस्कृती : व्याख्या :-

राज्य शास्त्रज्ञांनी या आधारावर राजकीय संस्कृतीची जी व्याखा केली आहे ती पुढीलप्रमाणे लक्षात घेता येते.

१) **सिडने व्हर्बा :**

"राजकीय संस्कृती म्हणजे अशी व्यवस्था की जिच्यात अनुभवजन्य श्रद्धा, व्यक्त् प्रतिके व मुल्ये यांचा अंर्तभाव होतो व ज्या परिस्थितीत अगद संदर्भात राजकीय कृती घडत असते तिचाही बोध होतो."

(Political culture consists of the system of empirical beliefs, expressive symbols and values which defines the situation in which political action takes place :- Sidney Verba)

२) **आल्मंड आणि पॉवेल :**

"राजकारणासंबंधीच्या विशिष्ट् राजकीय व्यवस्थेतील व्यक्तींच्या प्रवृत्ती, स्थितीज्ञान व आकलन यांचा आकृतीबंध म्हणजे संस्कृती होय."

(Political culture is the pattern of individual attitudes and orientations towards politics among the members of a political system: Almond and Powell)

३) **मॅक्रिडिस :**

"राजकीय संस्कृती म्हणजे समाजातील घटकात राजकीय उदिष्टांच्या व नियमांच्या बाबतीत असणारी एकवाक्यात होय."

(Political culture means commonly shared goals and commonly accepted rules Macridis)

राजकीय व्यवस्था, राजकीय घटना किंवा राजकीय वस्तु (Object) इत्यादीकडे पाहण्याची लोकांची प्रवृत्ती किंवा दृष्टिकोन व मुल्ये यांचा समुच्च म्हणुन राजकीय संस्कृतींचा विचार शास्त्रज्ञानी केला आहे.

**४.१.३.२. राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण :**

या संदर्भात राजकीय संस्कृतीच्या स्वरूपाचे वर्गीकरण आल्मंड व पॉवेल यांनी तीन प्रकारे केले आहे.

१) **ज्ञानावर आधारित (Cognitive) :**

तंतोतंत माहिती व तर्क बुद्धीवर आधारित असा प्रकार आहे. श्रद्धा, राजकीय, व्यवस्था, नेते, धोरणे, समस्या इत्यादीची माहिती हा अशा संस्कृतीचा आधार असतो.

२) **मनोभारित (Affective)**

आत्मियता, ओढ, आकर्षण, सहभागाची भावना, विरोध, नकार, यावर आधारित राजकीय संस्कृती.

३) **मुल्यमापनात्मक (Evaluative)**

राजकीय विचार सरणी, मुल्ये व त्यावर आधारित निर्णय हा राजकीय संस्कृतीचा आधार असतो. उदा. नैतिक मुल्ये, लोकशाही मुल्ये, धर्मनिरपेक्षता इ.

राजकीय व्यवस्थेतील घटक व्यक्ती राजकीय व्यवस्थांच्या उद्देशांकडे आणि कार्याकडे कशा व कोणत्या दृष्टीने पाहतात या संबंधी तीन प्रकार आल्मंड व व्हर्बा यांनी त्यांच्या The Civic Culture या पुस्तकात तीन प्रकार पाडले आहेत.

१) **संकुचित (Parochial) :**

लोकांनी राजकीय व्यवस्थेबद्दल एकतर जाणीव नसते किंवा असली तरी अगदी अल्प स्वरूपाची असते.

२) **आज्ञांकित (Subjects) :**

राजकीय जाणीव असते पण ती कारणापुरतीचा किंवा औपचारिकता म्हणुन राजकीय व्यस्थेत उत्स्फूर्तपणे आपण सहभागी व्हावे असे त्यांना वाटत नसते.

३) **सहभागांकित (Participant)**

या व्यवस्थेतील लोक आपण राजकीय संस्कृतीचा भाग आहोत. आपल्याला त्यासाठी योगदान दिले पाहिजे या भावनेचे असतात. आपला त्यातील सहभाग आवश्यक आहे. अशी यांची भावना असते.

राजकीय संस्कृतीच्या पातळीचे निकष स्पष्ट् करुन त्यात वैविध्य् असते असे फायनरनी स्पष्ट् केले आणि राजकीय संस्कृतीचे चार प्रकार स्पष्ट केले.

१) **परिपक्व राजकीय संस्कृती : (Matured Political Culture)**

या संस्कृतीत लष्करी हस्तक्षेप हा "अयोग्य् आक्रमण" मानला जातो. त्याचा तिटकारा केला जातो. अशा हस्तक्षेपांस लोक अनुमती देत नाहीत. उदा.ब्रिटन, अमेरिका इत्यादी.

२) **विकसित राजकीय संस्कृती (Developed Political Culture)**

या व्यवस्थेत प्रभावी अशा संघटनात लोक एकत्रित आलेले असतात व शासकीय कार्यपद्धती आणि अधिकारी संघटना लोकांत रुजलेल्या असतात. परंतु अशा व्यवस्थेत सार्वभौम कोण व ते कशात असावे या विषयी वाद असतात. या व्यवस्थेत लष्करी हस्तक्षेपास लोकांचा प्रखर विरोध असतो. उदा.जर्मनी, जपान, फ्रान्स.

३) **कनिष्ट राजकीय संस्कृती (Low Political Culture) :**

या व्यवस्थेत लोक कमी संघटित असतात व राज्यांतर्गत संस्था व कार्यपद्धती वादग्रस्त असतात. लष्करी हस्तक्षेपांस लोकमत प्रतिकुल नसते. उदा. तुर्कस्थान, इजिप्त्, पाकिस्तान, इराण, सुदान इ.

४) **दुर्बल राजकीय संस्कृती ( Minimal Political Culture) :**

या व्यवस्थेत लोक राजकीय दृष्टया जागरुकही नसतात व संघटितही नसतात. कोणतेही सरकार लोकमताकडे दुर्लक्ष करू शकते. उदा. मेक्सिको, अर्जेटिंना.

**४.१.३.३. राजकीय संस्कृतीचे मुलाधार :-**

राजकीय संस्कृती म्हणजे अनेक वर्षांच्या सामाजिक राजकीय परंपरांचा पारिपाक असतो. ती काही एकदम किंवा अचानक निर्माण झालेली नसते. धर्म, सामाजिक संस्था, लोकसाहित्य, मुल्ये श्रद्धा, तत्वज्ञान, समाजाचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन समस्या निवारण, युद्ध, व्यक्तींच्या प्रवृत्ती इ. सर्वांचा राजकीय संस्कृती विकसित होण्यावर परिणाम होत असतो. संस्कृतीवर अधिक प्रभाव टाकणारे जे घटक आहेत, त्यांचा आपण विचार करणार आहोत.

**१) भौगोलिक परिस्थिती :**

ब्रिटन हा देश चारही बाजूनी समुद्राने वेढलेला असल्यामुळे अनेक शतके परचक्रापासून सुरक्षित राहिला व त्यामुळे अंतर्गत प्रश्नांकडे तेथील राज्यकर्त्यांना लक्ष केंद्रीत करता आले. त्यामुळे लोकशाहीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती लाभली. तसेच अमर्याद भूमी, साधन संपत्तीची विपुलता यामुळे अमेरिकेत व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारसरणी रूजण्यास मदत झाली.

**२) इतिहास :**

इतिहासकालीन घटनांचा मानवी मनावर जबरदस्त प्रभाव असतो. त्यातुन त्यांच्या अंत:प्रवृत्ती निश्चित होत असतात. लोकांची मुल्ये, दृष्टिकोन, प्रवृत्ती, निश्चित होण्यात त्यांना मिळालेला ऐतिहासिक वारसा महत्वाचा ठरत असतो. फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रीसुत्रींचा प्रभाव केवळ फ्रान्सवरच नव्हे तर सर्व जगभर दिसुन येतो. अमेरिकेतील यादवी, युद्ध, मेक्सिकोतील क्रांती, इटलीतील मुसोलोनीची राजवट या ऐतिहासिक घटनांचा प्रभाव त्या त्या देशाच्या राजकीय संस्कृतीवर झालेला दिसतो. वसाहतवादी राजवटीचा प्रभाव आशिया, आफ्रिका खंडातील देशाच्या बाबतीत झालेला दिसतो. भारतातही ज्या प्रांताचा कारभार प्रत्यक्षपणे ब्रिटीश पहात होते, ते प्रांत इतर प्रांताच्या तुलनेत सुधारले असल्याचे जाणवते. भारतीय नेत्यांना संसदीय शासनपद्धतीचा दिर्घकालीन अनुभव आल्याने भारतात ती रूजु शकली पण पाकिस्तानात मात्र ती रूजु शकली नाही.

**३) वांशिक-धार्मिक भेद :**

धार्मिक भेदही राजकीय संस्कृतीत महत्वाचे ठरतात. स्वतंत्र भारतात हिंदु-मुसलमान धार्मिक भेदाचा प्रभाव धर्मनिरपेक्ष अशी राजकीय संस्कृती निर्माण होण्यात अडथळे आणू शकते. समान नागरी कायदयाची निर्मिती करणे, गोवधबंदी बाबत निश्चित भुमिका घेणे याबाबत शासनापुढे धार्मिक भेदामुळे अडचणी निर्माण होतात. राजकीय पक्षांची निर्मितीही विशिष्ट धर्माच्या विचारसरणीनुसार होत असते. भारतात हिंदु महासभा, मुस्लीम लीग हे त्यातुनच निर्माण झाले. भारतातील राजकीय संस्कृतीवर हिंदु-मुस्लीम,ख्रिश्चन अशा तीनही धर्माच्या विचारसरणीचा आणि त्या त्या कालखंडातील ऐतिहासिक गोष्टींचा प्रभाव पडलेला आहे. हिंदूस्थानच्या फाळणीचा परिणामही भारतातील राजकीय संस्कृतीवर झालेला दिसतो.

सांस्कृतिक विविधतेचे दोन घटक आहेत. वंशभेदामुळे ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिकेत राजकीय संस्कृतीतही विविधता आली. कॅनडा व दक्षिण आफ्रीकेतील वांशिक

munotes.in

समुहांनी स्वत्:ची भाषा टिकवून ठेवून भाषा आणि धर्माच्या सहाय्याने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्वही जोपासले. ब्रिटन आणि अमेरिकेत मात्र वांशिक गटात मोठया प्रमाणात समन्व्य साधला.

सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा प्रभाव प्रचलित मुल्ये व दृष्टिकोन यावरही पडत असतो. औदयोगिक समाजात राष्ट्रीय निष्ठा अधिक प्रभावी असतात. राष्ट्रीय उत्पन्न, त्याचे वाटप, दरडोई उत्पन्न, राहणीमान या गोष्टींचा प्रभाव कृषी प्रधान देशाच्या राजकीय व्यवस्थेवर पडत असते. अर्थ व्यवस्था बदलेल (समाजवादी, लोकशाही, भांडवलशाही) त्याप्रमाणे राजकीय संस्कृती बदलत असते. समाजातील वर्गभेद राजकीय दृष्टया महत्वाचे असतात. गरीब वर्गाची प्रवृत्ती डाव्या विचारसरणीला पाठिंबा देणारी असते. तर श्रीमंत, मध्य्म वर्ग उजव्या विचारसरणीला पाठिंबा देतात. आर्थिक विषमता अधिक वाढत चालली व ती कमी करण्यात शासन असमर्थ ठरू लागले तर क्रांती किंवा आर्थिक विषमता अधिक वाढत चालली व ती कमी करण्यात शासन असमर्थ ठरु लागले तर क्रांती किंवा अतिरेकी प्रवृत्ती निर्माण होते.भारतातील नक्षलवाद अशा आत्यंतिक आर्थिक विपन्नतेतुन निर्माण झाला आहे.

वर्गरचना ही लवचिकच आहे. असते. पण जाती रचना मात्र ताठर असते. पण दोन्हीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता किंवा श्रेणीरचना असते आणि त्याचा परिणाम राजकीय संस्कृतीवर होत असतो. तसेच सामाजिक दर्जा, प्रतिष्ठा, वंचित-शोषित-अन्यायित आणि त्याचबरोबर श्रेष्ठीजनांचे वर्चस्व अशा सामाजिक गोष्टीही राजकीय संस्कृतीचे निर्धारण करीत असतात. त्याचप्रमाणे शिक्षित, अशिक्षित, साक्षर, निरक्षरांचे प्रतिबिंबही राजकीय संस्कृतीवर पडत असते. तसेच शिक्षणाचे व्यवस्थीत नियोजन व नियमन करून सामाजिक, आर्थिक घटकांचे योगदान लक्षणीय असते.

### ४.१.३.४. राजकीय संस्कृतीमधील बदल व विकास :

एकुणच विचार करता राजकीय संस्कृती ही संमिश्र स्वरूपाची व गतिमान असलेली दिसते. ती स्थिर नसते. तिच्यात सातत्याने बदल होत असतो. राजकीय प्रक्रिया समजुन घेण्याच्या दृष्टिने राजकीय संस्कृतीतील बदल किंवा विकास लक्षात घेणे महत्वाचे ठरते.

**बदलाची कारणे :**

**१ ) आर्थिक कारणे :**

राजकीय संस्कृतीत मुलभुत बदल घडवुन आणण्यास बऱ्याच राजवटी क्रियाशील असतात. त्यासाठी बराच पैसाही खर्च केला जातो. आर्थिक विषमता व वाढत गेल्यास किंवा युद्धामुळे अर्थ व्यवस्था कोलमडल्यास साम्यवादी विचारसरणी महत्वाची बनू लागते व लोकशाहीला धोका निर्माण होतो.

**२) सांस्कृतिक राजकारण :**

क्रांतीपुर्व किंवा स्वातंत्र्यपुर्व काळातील संस्कृतीचा प्रभाव कमी करणे आवश्यक मानले जाते व नवीन व्यवस्थेस अनुकूल अशी मुल्ये व दृष्टिकोन यांची निर्मिती महत्वाची

मानण्यात येते. तसेच नवीन व्यवस्थेला सनदशीरता प्राप्त करायची असते. तिला स्थिर करायचे असते. तसेच समाज व राज्य यात एकवाक्यता निर्माण करावयची असते.

**३) समाजीकरण :**

राजकीय संस्कृती ही शिक्षित वर्तनप्रकारावर अवलंबून असते. बिगर राजकीय क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवातून व्यक्तीचे विचार व दृष्टिकोन विकसित होत असतात. या माध्यमांच्या कार्यपद्धतीत बदल झाल्यास राजकीय संस्कृतीत बदल होतो.

**४) सामाजिक व संरचनात्मक् :**

राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणण्याचे कार्य विविध पातळयावर हाती घेतले जाते. त्यासाठी निरनिराळे मार्ग अनुसरलेले जातात. पारंपारिक जातिभेदामुळे विषमतेला खतपाणी मिळते आणि त्याचा परिणाम लोकशाही, धर्मनिरपेक्षता निर्माण होण्यास अडथळे येतात. त्यामुळे जातिभेदा विरुद्ध जनमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो

## ४.१.३.५. बदलन घडवुन आणणारी माध्यमे :

पुढील माध्यमाद्वारे राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणला जातो.

**१ ) संसुचन (जनसंज्ञापन) माध्यमे :**

यामध्ये मुद्रित माध्यम् व इलेक्ट्रॉनिक माध्यम् अशा दोन्हींचा समावेश असतो. म्हणजे वर्तमानपत्रे, रेडिओ, टेलिव्हीजन यांचा यात समावेश होतो. राजकीय अभिजन या माध्यमाद्वारे जनतेशी संपर्क साधतात. तसेच जनतेचे राजकीय समाजीकरण करण्यासाठी अशा माध्यमांचा शासन संस्थेमार्फत उपयोग केला जातो. शासन या माध्यमांवर नियंत्रण ठेवुन विशिष्ट् विचारसरणीच लोकांपर्यत पोचविण्याचा प्रयत्न करते. ही माध्यमे राजकारणाविषयी लोकांचे ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करतात. रेडिओ, दुरदर्शनवरुन निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षाना त्यांची मते मांडण्यासाठी भारतात याचा वापर अलिकडे केला जात आहे. सामाजिक जाणीवांची लोकामध्ये निर्मिती करणे, एकात्मता वाढीस लावणे, लोकांना नवीन राजकीय संरचनांची माहिती करून देण्यासाठी या माध्यमांचा वापर केला जातो. या माध्यमावर फक्त शासनाचेच नियंत्रण असेल तर किंवा शासनाची मक्तेदारी असेल तर एकजिनसी राजकीय संस्कृती निर्माण करणे, नवीन व्यवस्थेला सनदशिरता प्राप्त् करुन घेणे सोपे जाते. भारतात आकाशवाणीवर शासनाचेच नियंत्रण आहे. पण असे नियंत्रण नसेल तर विविध मतांची जोपासन होते. अनेक दुरदर्शनच्या वाहिन्यामुळे लोकांच्या विविध मतप्रवाहाना समजुन घेणे लोकशाही प्रक्रियेत शक्य होते.

**२) विचारप्रणाली :**

आधुनिक काळात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी विचारप्रणालीचा खुप वापर केला जातो. मागास समाजातील पारंपारिक अलगता व संकुचित गटनिष्ठा नाहीशी करण्यासाठी व लोकांना आकृष्ट करण्यासाठी एखादी नवीन विचारसरणी

स्वीकारली जाते. ॲप्टर यांनी अशा विचार प्रणालीत 'राजकीय धर्म' असे म्हटले जाते. ही नवीन विचारसरणी समाजातील सर्व स्तरापर्यत पोचविण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रम, वर्तमानपत्र, रेडिओ यांचा वापर केला जातो. लोकांमध्ये परिश्रम व त्यागाची भावना वाढीस लावणे, लोकांत सामुदायिकता निर्माण करणे, समानता निर्माण करणे, राजकीय संरचना निर्माण करणे, नैतिकता निर्माण करणे, असे अनेक उपयोग ॲप्टर यांनी राजकीय धर्माच्या बाबतीत सांगितले आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, भारतात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवादी समाजरचना यासारख्या प्रचलित राज्य व्यवस्थेत उपयुक्त अशा विचारप्रणाली शासनाकडून सादर करण्यात आल्या. तसेच परराष्ट्रधोरणाच्या बाबतीत अलिप्तता किंवा तटस्थता यांचा अवलंब करण्यात आला.

३) **राजकीय संघटन :**

विशिष्ट राजकीय जाणीव निर्माण करण्यासाठी, राजकीय संस्कृती जोपासण्यासाठी लोकांना संघटित करणे आवश्यक असते. त्यासाठी महत्वाचे माध्यम म्हणुन निवडणुकांचा विचार केला जातो. संघटनामुळे राजकीय संस्कृतीच्या बदल प्रक्रियेस गती मिळते. भारतात १९५२ नंतर समुदायविकास योजनेसारखे देशव्यापी कार्यक्रम, १९६० नंतर स्वीकारलेली पंचायत राज्य पद्धती, कालबद्ध होणाऱ्या निवडणुका इ.मुळे लोकांचे राजकीय संघटन मोठया प्रमाणात झाले.

पारंपारिक किंवा जुन्या सांस्कृतिक चौकटी मोडून टाकण्यासाठी लोकांच्या राजकीय सहभागास साम्यवादी देशात महत्व दिले जाते. राजकीय क्रांतीचा लोकानी अनुभव घेतल्यास त्यांची विचारसरणी बदलेल हा विचार त्यामागे असतो. फॅगेन याने या संदर्भात क्युबाचे उदाहरण दिले आहे. तिथे क्रांती घडवून आणण्यासाठी लोकांची निदर्शने, समारंभ आयोजित केले जातात. दुर्मिळ साधन संपत्तीचे वाटप केले. लोकांना क्रांतीचा अर्थ समजावून दिला. केवळ नेतृत्व बदल नाही तर लोकांची वर्तणुक बदलण्याचाही त्यामागे हेतू होता.

४) **राजकीय पक्ष :**

राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे हे महत्वाचे माध्यम् आहे. नवीन विचारप्रणाली राजकीय धर्म म्हणुन पुढे मांडणाऱ्या राजकीय ॲप्टर यानी Parties of Solidarity असे नाव दिले आहे. विचारांचे दलाल म्हणुन राजकीय पक्ष कार्यच करतातच पण त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक, राजकीय उदिद्ष्टये निश्चित करुन त्याद्वारे नवीन मुल्ये व नियमन व्यवस्था निर्माण करतात. राजकीय संघटनाचेच हे एक प्रकारे कार्य असते. विशेषत: साम्यवादी देशात व नवीन राज्यात असे पक्ष आढळतात. भारतात जवळवजळ सर्वच पक्ष निवडणुकीच्या काळात निवडणुकीनंतरही विशिष्ट प्रश्नांवर लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतात. तसेच स्वत:ची विचारप्रणाली समाजात रूजवण्याचा प्रयत्न करतात.

५) **बाह्य प्रभावशक्ती :**

दळणवळण साधनातील व वाहतूक साधनातील प्रचंड वाढी मुळे व सुविधामुळे बाहेरील घटनांचा प्रभाव एखाद्या देशावर त्वरीत होऊ शकतो. वर्तमानपत्रे, दुरदर्शन वृत्तवाहिन्या, फेसबुक, इंटरनेट अशा माध्यमामुळे बाह्यप्रभाव कमालीचा गतिमान झाला आहे. बाहेरील देशातील चांगल्या वाईट गोष्टींचा परिणाम लगेचच आपल्या देशातील घटनांवर जाणवतो. तसेच लोकांच्या होणाऱ्या मोठया प्रमाणातील स्थलांतरामुळेही मोठे सांस्कृतिक बदल घडून येऊ शकतात. ब्रिटीशांचा प्रभाव भारतावर तसेच अमेरिकेवरही मोठया प्रमाणात झाला तो यामुळेच नवीन ज्ञान व जाणीव अशा बाह्यशक्तीच्या प्रभावामुळेच होत असतात. तसेच यामुळे मुळच्या संसकृतीतही बदल घडून येऊ शकतो.

६) **प्राथमिक समुह :**

कुटुंब, शाळा या सारख्या प्राथमिक समुहांचा राजकीय संस्कृतिविषयक बदलावर मोठा प्रभाव पडत असतो. राजकीय संस्कृतीचे लोकशाहीकरण करण्यासाठी प्रथम सामाजिक जीवनाचे लोकशाहीकरण करणे महत्वाचे असते असे आल्मंड यांनी म्हटले आहे. त्यांनी हे विधान जर्मनीतील प्रशियन प्रवृत्तीनुसार म्हणजेच अरेरावी वृत्ती-केले आहे. भारतातही 'सामाजिक समता' व 'सामाजिक न्याय' प्रस्थापित करण्यासाठी, लोकसंख्यावाढीच्या दुष्परिणामांची जाणीव करुन देयासाठी शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश करण्यात आला व तेथूनच राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले.

तेंव्हा विविध माध्यमांद्वारे राजकीय सस्कृतीत बदल घडवून आणला जात असतो. आपण सतत लष्कर सज्य व सतर्क असले पाहिजे याची जाणीव १९६२ च्या चीन आक्रमणानंतरच आपल्याला झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणात अण्स्त्रबंदी व नि:शस्त्रीकरणाची जाणीव किंवा त्यासबंधी नवीन मुल्ये ही हिरोशिमा, नागासाकी वरील अणुबॉबच्या हल्यातील प्रचंडजीवित हानीतुनच निर्माण झाली.

## ४.१.४ सारांश :

**आपण** राजकीय संस्कृतीच्या व्याख्या व त्या आधारे अर्थ याचा अभ्यास केला आहे. राजकीय संस्कृतीचे प्रमुख आधारभुत घटक म्हणून ऐतिहासिक विकास, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक परिसिथती, सामाजिक परिस्थीती, शिक्षण व्यवस्था, राजकीय पक्ष व प्रतीके याबाबतचा अभ्यास केला आहे. तसेच राजकीय संस्कृतीचे प्रकारही अभ्यासले आहे. राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्व जाणून घेताना तर्कशुद्धता व प्रगल्भता, परिवर्तनाचे विश्लेषण, आधुनिकीकरण, नवीन आव्हाने तसेच व्यक्ती व राजकीय व्यवस्था यातील समन्वय् अशा अनेक मुद्यांचा परामर्श घेतला आहे.

## ४.१.५ आपली प्रगती तपासा :

१. राजकीय संस्कृतीचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करा ?

२. राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण लिहा ?

३. राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणारे माध्यमे लिहा ?

## ४.१.६ संदर्भ ग्रंथ सूची :

१. कुलकर्णी बी.वाय -राजकीय समाजशास्त्र, विदयाप्रकाशन, नागपूर

२. बी.बी.पाटील- राजकीय संकल्पना, फडके प्रकाशन, पूणे

३. ढोबळे रमेश – प्रमुख राजकीय विचारप्रणाली,विदयाबुक पब्लिकेशन, औरंगाबाद

४. इनामदार पुराणीक- राजकीय समाजशास्त्र कार्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

munotes.in

# ४ (२)

# राजकीय सामाजीकरण

**घटक रचना :**

४.२.१. उद्दिष्टये

४.२.२. प्रास्ताविक

४.२.३. विषय विवेचन

४.२.३.१. राजकीय सामाजीकरणाची व्याखा व अर्थ

४.२.३.२ राजकीय सामाजीकरणाचे महत्व

४.२.३.३. राजकीय सामाजीकरणाचे साधने

## ४.२.१. उद्दिष्टये

**राजकीय सामाजीकरण या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबी स्पष्ट् होतील.**

१ ) राजकीय समाजीकरणाचा अर्थ आणि साधन स्पष्ट करता येतील.

२) राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाचे महत्व जाणून घेता येईल.

## ४.२.२. प्रास्ताविक

राजकीय समाजीकरणाचा अर्थ, महत्व, साधने माध्यमे यांचे विश्लेषण केले आहे. त्याची थोडक्यात माहिती घेऊया.

## ४.२.३.विषय विवेचन :



munotes.in

प्रत्येक समाजाला स्वत:ची अशी वेगळी व वैशिष्टयपुर्ण संस्कृती असते. ज्ञान, श्रद्धा, मूल्ये व नियमने भाषा, प्रतीके असे संस्कृतीचे घटक असतात. त्या त्या काळात समाजाने आदर्श मानलेले वर्तन प्रकार ही संस्कृतीचे भाग मानले जातात; मात्र संस्कृतीतल्या सर्व बाबी व्यक्तीला आनुवंशिकतेनुसार प्राप्त होत नाहीत, तर व्यक्तीला त्या शिकुन घ्यावा लागतात. ज्ञान, कौशल्ये, प्रवृत्ती या सर्व बाबी शिकुन घेऊन त्या आत्मसात करण्याच्या प्रक्रियेला समाजीकरण म्हणतात. या प्रक्रियेत व्यक्तीला ज्या समाजात, व्यक्तींच्या वर्तनावरील नियंत्रण संस्कृतीचे संक्रमण या संपूर्ण समाजाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टी समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळेच साध्य होतात.

आधुनिक काळात सर्वच समाजात राजकीय व्यवस्थेला महत्व प्राप्त झाले असून या व्यवस्थेच्या विश्लेषणात राजकीय समाजीकरणाचा अभ्यास महत्वाचा मानला आहे. राजकीय संस्कृतीचे स्वरुप ठरविण्यासाठी आणि राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करुन देण्यासाठी राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया आवश्यक असते. राजकीय संस्कृतीची मूल्ये, श्रद्धा, दृष्टिकोन नवीन पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी राजकीय समाजीकरणाची गरज असते.

राजकीय समाजीकरण या संकल्पनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करताना असे आढळून येते की, ग्रीक विचारवंत प्लेटोने आपल्या रिपब्लिक या ग्रंथात आदर्श राज्य निर्माण करण्यासाठी नागरिकांना राजकीय शिक्षण देण्यासंबंधी विचार व्यक्त केले आहेत. प्राचीन काळात कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात राजपुत्राचे शिक्षा, राजाची व प्रजेची कर्तव्ये याबाबतचे विचार मांडले आहेत. मध्ययुगीन काळात मॅकियाव्हेलीने 'प्रिन्स' या ग्रंथात राजा व प्रजा यांची नीती व कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. रुसोने आपल्या 'सामाजिक करार' या ग्रंथात सामूहिक इच्छा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा यांचे विवेचन केले. आधुनिक काळात मार्टिन ल्युथर किंग, महात्मा गांधी यांनी जनतेत राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान या भावना जागृत केल्या.

### ४.२.३.१. राजकीय सामाजीकरणाची व्याख्या व अर्थ (Political Socialization-Defination and Meaking) :

आधुनिक राजकीय विचारवंतांनी राजकीय समाजीकरणाच्या व्याख्या व अर्थ स्पष्ट केला आहे.

१) ईस्टन व डेव्हिस : राजकीय समाजीकरण म्हणजे अशा विकासात्मक प्रक्रिया की, ज्याद्वारे व्यक्ती राजकीय प्रवृत्ती आणि राजकीय वर्तन याबाबतचे ज्ञान प्राप्त करतात.

२) ॲडलर आणि हॅरिंग्टन : राजकीय समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा राज्यातील मुलांना राजकीय घटना, संस्था पद्धती या बाबतची समाजाची मूल्ये, भावना व दृष्टिकोन यांचे ज्ञान होऊन ती त्यांचा स्वीकार करतात.

३) आल्मंड व पॉवेल : ज्या प्रक्रियेद्वारे राजकीय संस्कृतीची अंगभूत मूल्ये, श्रध्दा, संकेत व दृष्टिकोन भावी पिढयाकडे संक्रमित होतात, तिला राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया म्हणतात.

४) सिगल : राजकीय व्यवस्थेला पूरक व्यक्ती पुरविणारी व तयार करणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय समाजीकरण होय.



munotes.in

**अर्थ :**

वरील व्याख्यांच्या अभ्यासावरुन राजकीय समाजीकरणाचा अर्थ स्पष्ट् होतो. याबाबत असे म्हणता येईल की, सर्वच समाजात राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया सातत्याने सुरु असते. राजकीय समाजीकरणाद्वारे लोकमताची जडणघडण केली जाते. समाजाचा ऐतिहासिक, सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केला जातो. औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही पद्धतीने ही प्रक्रिया सुरु ठेवता येते. राजकीय समाजीकरणाच्या साहाय्याने नवी राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे नवीन पिढी काही नवीन राजकीय मूल्ये स्वीकारीत असते.

### ४.२.३.२. राजकीय सामाजीकरणाचे महत्व (Significance of Political Socialization) :

विसाव्या शतकातील राजकीय विश्लेषणात राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाला महत्व दिले आहे. राजकीय स्थैर्य आणि विकास याचा अभ्यास करताना जे दृष्टिकोन महत्वाचे मानले जातात. त्यापैकी राजकीय समाजीकरण हा एक दृष्टिकोन आहे. राजकीय विचारवंत प्रगत राष्ट्रातील स्थैर्य आणि विकास यांचा जसा अभ्यास करतात तसाच अप्रगत व विकसनशील राष्ट्रातील राजकीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन होते. राजकीय संस्कृतीची मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा, प्रवृत्ती यांचे हस्तांतर नवीन पिढीकडे राजकीय समाजीकरणाद्वारेच होते. राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाचे पुढील मुद्यावरुन स्पष्ट होईल.

१ ) **राजकीय वर्तनाचे अध्ययन :** व्यक्तीच्या मनावर काही राजकीय मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा निष्ठा यांचा प्रभाव असतो. व्यक्तीवर जे राजकीय संस्कार झालेले असतात. त्यानुसार व्यक्तीचे राजकीय वर्तन होत असते. मतदारांचे वर्तन, सत्ताधार्यांचे वर्तन यामध्ये जो फरक दिसुन येतो त्याबाबतचे विश्लेषण राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाच्या साहाय्याने करता येते.

२) **व्यक्तीचा राजकीय सहभाग :** समाजातील प्रत्येक व्यक्तीचा राजकारणाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येतो. राजकीय व्यवस्था आणि शासनाकडून व्यक्तीच्या संरक्षणाचे व कल्याणाचे कार्य केले जाते. राजकीय व्यवस्थांचा महत्वाचा घटक म्हणजे व्यक्ती होय. व्यक्ती राजकारणात सहभागी होतात, त्याचप्रमाणे व्यक्ती प्रचलित राजकारणाच्या विरोधी भूमिकाही घेतात. त्यामुळे व्यक्तीचे राजकीय व्यवस्थेतील वर्तन समजून घेण्यासाठी राजकीय समाजीकरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

३) **सामाजिक व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था :** सामाजिक व्यवस्थेचा एक भाग म्हणजे राजकीय व्यवस्था होय. या राजकीय व्यवस्थेवर सामाजिक, धार्मिक व आर्थिक दृष्टिकोनाचा प्रभाव निर्माण होतो.राजकीय समाजीकरणातून व्यक्तीची राजकीय भूमिका बनत असते. राजकीय व्यवस्थेबाबतचा व्यक्तीचा दृष्टिकोन, श्रद्धा, निष्ठा यावर राजकीय व्यवस्थेची स्थिरता अवलंबून असते. थोडक्यात राजकीय व्यवस्था व सामाजिक व्यवस्था यांच्यातील परस्पर संबंधांची माहिती राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासातून मिळते.

munotes.in

४) **लोकमताची जडणघडण** : आधुनिक काळात सर्वच राज्ये प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करीत आहेत. त्यासाठी लोकांमध्ये राजकीय जागृती करुन त्यांचे सहकार्य मिळविणे गरजेचे असते आणि त्या दृष्टीने लोकमताची जडणघडण करावी लागते. राजकीय समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे अपेक्षित लोकमत घडविता येते. आपल्या राजकीय तत्वज्ञानाचा प्रभाव लोकांवर पाडण्यासाठी अनेक देशांनी राजकीय समाजीकरणाचा मार्ग स्वीकारला आहे. लोकात राजकीय जागृत करुन त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा तो एक चांगला मार्ग सर्वत्र मान्य झाला आहे.

५) **विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीसाठी साहाय्य :** आर्थिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या देशात राजकीय समाजीकरणाची गरज असते. विकसनशील देशात उद्योगधंद्यांचा विकास होऊन नागरीकरण आणि आधुनिकीकरणाचा अनुभव येत असला तरी तेथे राजकीय परिवर्तन गतीशील नसते. कारण तेथे लोक धार्मिक व परंपराप्रिय वृत्तीचे असतात, त्यामुळे तेथे परिवर्तनाचा स्वीकार करण्याची गती मंद अशीच असते. त्यामुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पंडित नेहरुनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करुन आधुनिक भारताची जडणघडण करण्यासाठी कष्ट घेतले आणि आता मात्र भारतीय राजकारणात धर्म आणि जात यांचा प्रभाव वाढत चालला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात लोकांचा धार्मिक दृष्टिकोन बदलून त्यांनी वैज्ञानिक व तर्कशुद्ध दृष्टिकोनाचा स्वीकार करावा यासाठी राजकीय समाजीकरणाची आवश्यकता आहे.

६) **सामाजिक शास्त्रातील परस्पर संबंधांचा अभ्यास :** विविध सामाजिक शस्त्रांचा एकमेकांशी जवळचा संबंध असतो. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व मानसशास्त्र या शास्त्रांचा अभ्यास आणि व्यक्तींचे राजकीय समाजीकरण यांचा परस्पर सबंध असतो. ऐतिहासिक घटना, स्वातंत्र्याच्या चळवळी, कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती, शिक्षण यांच्या प्रभावातूनच लोकांचे राजकीय व्यक्तीमत्व घडते. विविध सामाजिक शास्त्रे, त्यांच्या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचे विश्लेषण करतात म्हणून सामाजिक शास्त्रातील आंतरसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी राजकीय समाजीकरणाचा अभ्यास महत्वाचा मानला जातो.

### ४.२.३.३. राजकीय सामाजीकरणाचे साधने (Agencies of Political Socializzation) :

राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष स्वरुपात व्यक्तीच्या बालपणापासून आयुष्यभ्र चालू असते. व्यक्ती ज्या समाजात राहतो तो संपूर्ण समाजच समाजीकरणाचे माध्यम असते. समाजातील विविध संस्था, कुटुंब, शाळा महाविद्यालये, राजकीय पक्ष, व्यवसाय क्षेत्र, ऐच्छिक संघटना, जनसंपर्क साधने या सर्वांद्वारे समाजीकरण होत असते. त्याबाबतचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :

१ ) **कुटुंबसंस्था** : कुटुंबसंस्था हे राजकीय समाजीकरणाचे सर्वात मूळचे, महत्वाचे आणि सामर्थ्यवान असे माध्यम आहे. श्रद्धा आणि मूल्ये यांचे अधिष्ठान कुटुंबातच तयार होते. सत्ता, अधिकार आणि कर्तव्ये याबाबतची जाणीव मुलांच्या मनात कुटुंबामार्फत होते. कोणत्याही पिढीतील बहुसंख्य मुलांचा राजकीय दृष्टिकोन त्यांच्या

आईवडीलांच्या भूमिकेशी सुसंगत असाच दिसून येतो. राजकीय समाजीकरणात कुटुंबाचा प्रभाव अनेक कारणामुळे निर्माण होतो. एकतर मुले तरुण वयापर्यत सर्व गरजांच्या पूर्ततेसाठी कुटुंबावरच अवलंबून असतात आणि आईवडिल हेच मुलांचे आदर्श असतात. त्यामुळे त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती मुलांमध्ये दिसते. कुटुंबातील सर्व सदस्य् एकाच आर्थिक व सामाजिक वातावरणात वाढतात, त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारात साम्य् आढळते; मात्र विशिष्ट् कौटुंबिक परिस्थितीमुळे मुलीमध्ये राजकीय उदासीनता आढळते. कुटुंबाचा प्रभाव मुलावर साधारण वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत दिसून येतो. तरुणपणी क्वचितप्रसंगी मुलांचा राजकीय दृष्टिकोन आपल्या कुटुंबीयांच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळे बनल्याची उदाहरो आढळतात.

२) **शिक्षणसंस्था** : शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन व प्रशिक्षण केंद्रे यासारख्या शिक्षण संस्थांचे व्यक्तींच्या राजकीय समाजीकरणात महत्वपूर्ण योगदान दिसून येते. कुटुंबात होणाऱ्या समाजीकरणाला काही मर्यादा असतात. शेती व्यवसायावर आधारलेल्या ग्रामीण समाजात साक्षरतेचे प्रमाण जेव्हा फार कमी होते. तेव्हा तर या मर्यादा ठळकपणे दिसून येत होत्या. शाळेतच मुलांना विविध विषयांचे ज्ञान मिळते. गणित, विज्ञान देशाचा इतिहास आणि भूगोल, थोर विचारवंत व नेते यांची चरित्रे यांच्या अभ्यासामुळे मुलांचे अनुभव विश्व व्यापक बनते. शाळा ही आदर्श समाजाची प्रतिकृती मानली जाते. शिक्षण संस्थातून मिळणार्या ज्ञानातून आणि माहितीतून मुलांचा वैचारिक विकास होतो. देशात सुशिक्षित व जबाबदार नागरिक शिक्षणातूनच तयार होतात आणि तेच देशाच्या राजकीय स्थैर्याला आिा राजकीय विकासाला सहाय्य करतात.

३) **राजकीय पक्ष** : सत्ता मिळविणे हे सर्वच राजकीय पक्षांचे उद्दिष्टये असते. राजकीय पक्ष व त्यांच्या संघटना आणि शाखा राजकीय समाजीकरणाचे प्रभावी माध्यम मानल्या जातात. महिला, विद्यार्थी, शेतकरी, कामगार यांच्या आघाडया राजकीय पक्षाशी संलग्न असतात. त्यांच्या माध्यमातून आपल्या समर्थकांची संख्या वाढविण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात. सर्वच देशातील सत्ताधारी पक्ष त्यांनी केलेल्या कामाबाबतची माहिती प्रसिद्धी माध्यमाद्वारे लोकापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी राजकीय समाजीकरण हाच उद्देश दिसून येतो. राजकीय पक्ष आपल्या पक्षाची तत्वे लोकांमध्ये बिंबविण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकांच्या काळात तर मोठया प्रमाणात असे समाजीकरण घडवून आणले जाते. भित्तीपत्रके, घोषणा, मिरवणुका, प्रचारयंत्रणा, जाहीर सभा याद्वारेही समाजीकरण होत असते. राजकीय पक्षाशी संबंधित संघटनातूनच पक्षाला समर्थक आणि कार्यकर्ते मिळतात. भारतात सेवादलासारख्या संघटना संदस्यांचे चारित्र्य संवर्धन आदर्शवाद व संघटनात्मक प्रशिक्षण यावर भर देतात. व्याख्याने, नियमित बैठका, चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे सदस्यांचे राजकीय समाजीकरण अशा संघटनामार्फत सुरु असते. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांत लोकशाही रुजविण्यासाठी लोकशाही मुल्यांचे समाजीकरण राजकीय पक्ष करतात. राजेशाही आणि पारतंत्र्याचा अनुभव घेतलेल्या आपल्या देशात लोकशाही पद्धतीचे महत्व लोकांना समजले आहे. त्यामागे राजकीय पक्षांनी केलेले समाजीकरण हे महत्वाचे कारण आहे.

४) **जनसंपर्क व प्रसारमाध्यमे** : राजकीय समाजीकरणाचे अत्याधुनिक, प्रभावी आणि व्यापक माध्यम म्हणजे प्रसारमाध्यम होय. यात वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ व दूरदर्शन या माध्यमांचा समावेश होतो. प्रसारमाध्यमात झालेल्या अभूतपूर्व तांत्रिक विकासामुळे अलीकडे त्याचे महत्व फारच वाढले आहे. अर्थात या माध्यमांचा प्रभाव त्या त्या समाजाचे स्वरुप आणि त्यातील स्तर यावर अवलंबून असतो. या माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या काही कल्पना आणि मूल्ये त्या समाजातील सदस्यांशी संबंधित नसतात, तर बाहेरुन आलेली असतात. अनेक देशात प्रसारमाध्यमावर सरकारचे नियंत्रण असते. त्यामुळे ही माध्यमे सरकारला अनुकूल असतात किंबहुना सरकारच्या विरोधी नसतात. त्यामुळे प्रसारमाध्यम म्हणजे राजकीय समाजीकरणाचे माध्यम असले तरी ते एक हत्यारही आहे असे म्हटले जाते. प्रसारमाध्यमांचा लोकांवर प्रत्यक्ष परिणाम होत नसला तरी त्यांच्याद्वारे व्यक्त केली जाणारी मते, कल्पना व मूल्ये यांचा प्रेक्षकांवर व वाचकांवर प्रभाव टाकतात.

## ४.२.४ सारांश :

एकंदरीतपणे राजकीय सामाजिकरणाची प्रक्रिया सातत्याने सुरू असते; त्यातून लोकमताची घडण होतांना दिसते. या प्रकियेद्वारे नवीन राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाते. त्यामुळे तिचे महत्व अनन्य् साधारण आहे. आधुनिक काळात सर्वच समाजात राजकीय व्यवस्थेला महत्व् प्राप्त झालेले आहे. या व्यवस्थेच्या विश्लेषणात राजकीय सामाजिकरणाचा अभ्यास महत्वाचा मानला जातो. राजकीय सामाजिकरणात वरील साधनाद्वारे सामाजीकरण होतांना दिसते. त्यामुळे त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे.

## ४.२.५ आपली प्रगती तपासा :

१. राजकीय सामाजिकरणाची संकल्पना स्पष्ट् करा ?

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

२. राजकीय सामाजिकरणाचे महत्व स्पष्ट् करा ?

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

३. राजकीय सामाजिकरणाची प्रमुख साधने कोणती ?

______________________________________________
______________________________________________

munotes.in

## ४.२.६ संदर्भ ग्रंथ सूची :

१. कुलकर्णी बी.वाय. -राजकीय समाजशास्त्र, विदयाप्रकाशन, नागपूर

२. बी.बी.पाटील- राजकीय संकल्पना, फडके प्रकाशन, पूणे

३. ढोबळे रमेश – प्रमुख राजकीय विचारप्रणाली,विदयाबुक पब्लिकेशन, औरंगाबाद

४. इनामदार पुराणीक- राजकीय समाजशास्त्र कार्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

munotes.in

# ४ (३)

# राजकीय सहभाग – अर्थ व स्तर

**घटक रचना :**

४.३.१. उद्दिष्टये

४.३.२. प्रास्ताविक

४.३.३. विषय विवेचन

४.३.३.१. राजकीय सहभागाचा अर्थ

४.३.३.२. राजकीय सहभागाची व्याखा

४.३.३.३. राजकीय सहभागाची आवश्यकता

४.३.३.४. राजकीय सहभागाचा स्त्र

४.३.३.४.१. महिलाचा राजकारणातील सहभाग.

४.३.३.४.२. स्वातंत्र्योत्तर काळातील महिलाचा राजकीय सहभाग.

## ४.३.१. उद्दिष्टये

'राजकीय सहभाग' या घटकाच्या अभ्यासातून पुढील बाबी स्पष्ट् होतील.

१ . राजकीय सहभागाचा अर्थ समजुन घेणे.

२. राजकीय सहभागाचे काळानूरुप बदलते स्तर समजून घेणे.

३. राजकीय सहभागाचा नागरिकत्वावर कसा परिणाम होतो; याचे विश्लेषण करणे.

## ४.३.२ प्रास्ताविक :

' राजकीय सहभाग' या घटकात सर्वप्रथम जनतेचा लोकशाहीतील 'राजकीय सहभाग' ही संकल्पना समजून घेणार आहोत तसेच या राजकीय सहभागाचा अर्थ, स्वरुप, आवश्यकता महिला राजकीय सहभाग इ बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## ४.३.३ विषय विवेचन :

राजकीय व्यवस्थेमध्ये अनेक मार्गांनी जनता आपला सहभाग नोंदवत असतो. लोकशाही राज्य् व्यवस्थेतील शासन जनइच्छा व जन सहभागावरच आधारित असते. मतदान करणे, निवडणुका लढवणे, उमेदवाराचा प्रचार करणे, लोकप्रतिनीधीच्या संपर्कात राहणे संबंधित विषयावर चर्चा करणे, अशा अनेक कृतीचा अंर्तभाव राजकीय सहभागामध्ये होतो. अनेक देशांमध्ये पाश्चात्य् जगासहीत अनेक वर्ष स्त्रियांनी केलेल्या संघर्षामुळे त्यांना तो प्राप्त झाला. थोडक्यात आधूनिक काळात सर्व प्रकारच्या शासन व्यवस्थेमध्ये राजकीय सहभागाचे महत्व वाढले आहे.

### ४.३.३.१. राजकीय सहभागाचा अर्थ :

सर्वच राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय सहभाग महत्वाचा असतो. आज जगातील बहुसंख्य् देशानी लोकशाही शासनपद्धतीचा स्विकार केलेला आहे. "लोकांनी लोकाचे लोकाकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय." अब्राम्ह्म लिंकन यांच्या व्याख्यामधून लोकशाहीतील लोकाच्या राजकीय सहभागाची कल्पना आपणास येते. लोकशाहीत चालक, पालक व मालकदेखील लोकच असतात. साहजिकच दैनंदिन जीवनात, लोकांचा सहभाग असणारी लोकशाही टिकून राहणे आत्यंतिक महत्वाची ठरते. लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाहीची कल्पनाही करणे शक्य नाही. कोणत्याही प्रकारच्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सहभाग हा नागरिकाचा असंतोष पसरवत असतो. त्याशिवाय राजकीय व्यवस्थेला आकार व स्थिरा प्राप्त होऊ शकत नाही.

प्राचीन ग्रीक नगर राज्यात देखील लोकशाही अस्तित्वात होती. त्यामुळे तत्कालीन लोकशाहीत देखील लोकांचा राजकीय सहभाग होता; परंतू तो राजकीय सहभाग प्रतिनिधीलक लोकशाही स्विकारल्यामुळे जास्तीत जास्त लोकांचा सहभाग लोकशाहीमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. लोकशाहीत सत्ता लोकांचया हाती असते; हे एकदा मान्य केले की, लोकांचा राजकारणात प्रत्यक्ष सहभाग सुरू होतो. मतदान केंद्रावर मतदान करून प्रतिनीधी सभा संमेलनातून भाषण करणे, सरकार विषयी अनुकूल किंवा प्रतिकूल बोलणे म्हणजे देखील लोकांच्या राजकीय सहभागाचा एक भाग आहे. अनेकदा तर लोक हेतू परस्परपणे राजकारणात सहभागी होत नाही; परंतू हा देखील लोकांचा नकारात्मक सहभागच आहे.

### ४.३.३.२. राजकीय सहभागाची व्याख्या :- काही निवडक विचारवंताच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

१. **ॲरिस्टॉटल :** या राजकीय विचारवंताने नागरिकत्वाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "जो राज्यकारभात सहभागी होतो, तोच नागरिक त्यांच्या या व्याखेवरुन नागरिक होण्यासाठी राज्यकारभारात सहभाग घेणे महत्वाचे आहे, हे स्पष्ट होते; म्हणून या अर्थाने सहभागी लोकशाही नागरिकाचा सक्रिय राजकीय सहभाग अत्यंत महत्वपूर्ण ठरतो.

२. **रॉबर्ट डहालच्यया मते** – "सत्ताधारी वर्गाशिवाय समाजात इतर तीन प्रकारचे लोक कार्यरत असतात. यातील पहिला प्रकार म्हणजे सत्तेसाठी प्रयत्न करणारे दूसरा प्रकार म्हणजे राजकारणात स्वारस्य नसणारे.

३. एकंदरीत पणे वरील व्याखेवरुन आपणास म्हणतात येईल की, लोकशाही व्यवस्थेला जीवंत ठेवणारी ज्योत म्हणून राजकीय सहभागाकडे पाहिले जाते.

### ४.३.३.३. राजकीय सहभागाची आवश्यकता :-

लोकशाहीत राजकीय सहभाग महत्वपूर्ण असतो, म्हणून लोकशाहीतील लोकांच्या सहभागाची आवश्यकता खालील मुद्दयाच्या माध्यमातून स्पष्ट होते.

१. लोकशाहीमध्ये सहभागातून लोकाच्या सुस्पष्ट जाणीवा निर्माण होतात तसेच आत्मीयतेची भावनाही वाढीस लागते.

२. सत्ताधारी अभिजन मार्गावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनेही लोकशाहीत लोकांच्या सहभागाला अत्यंत महत्व असते.

३. जनतेच्या मागण्या अधिक सुस्पष्ट स्वरूपात मांडण्यासाठी देखील लोकांचा सहभागा महत्वाचा ठरतो; म्हणूनच जनता चळवळी, निदर्शने, मोर्चा, घेराव संप इ. द्वारे आपल्या मागण्यास लोकशाहीमध्ये प्रतिपादन करीत असते.

४. लोकशाहीमध्ये आधुनीकीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी जनतेचा सहभाग महत्वाचा असतो. जनतेचा सहभागा मिळाला नाही तर शासनाने कितीही उदार योजना राबविण्याचा प्रयत्न केला; तरी त्या यशस्वी होऊ शकत नाहीत.

### ४.३.३.४. राजकीय सहभागाचा स्तर :-

भारतात संसदीय शासन व्यवस्था आहे; या व्यवस्थेत जनता सत्तेत काळानूरुप बदल घडत असतो. भारतात पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्याकारणामुळे राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग अत्यल्प आहे.

### ४.३.३.४.१. महिलांचा राजकारणातील सहभाग :-

इंग्लंड ही लोकशाहीची जननी मानले जाते. भारतावर याच ब्रिटीशाचे १५० वर्ष राज्य होते; परंतु तरीही लोकशाहीवादी ब्रिटीशाचा भारतातील स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यास विरोध होता. ब्रिटीशकालीन भारतात निवडणुका मर्यादीत स्वरूपात होत्या. ज्यात धार्मिक, सामुदायिक व व्यावसायिक बाबींना आधारभूत समजून वर्गीकरण केलेल्या जागावर उमेदवार उभे केले जात असत त्यासाठी निवडक लोकांना मतदान करण्याची परवानगी असे. भारतातील महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी संघटित लढा दिला. १९२१ साली मुंबई व मद्रास या प्रांतातील महिलांना प्रथम मतदानाचा अधिकार देण्यात आला. त्यानंतर १९२३ ते १९३० ची दरम्यान सात प्रांतामध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. १९३५ च्या कायदयाने या अधिकाराचा विस्तार करण्यात आला. १९३७ च्या प्रांतिक निवडणुकामध्ये विविध प्रांतातून ५६ महिला निवडल्या गेल्या तर केंद्रीय कायदेमंडळात ३० महिलाची निवड झाली.

### ४.३.३.४.२. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात महिलाचा सहभाग :-

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार भारताच्या प्रत्येक नागरिकाला समतेचा अधिकार दिला आहे. त्यानूसार जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, लिंग इ. कारणावरून व्यक्ती व्यक्तीत भेदभाव करता येणार राज्यघटनेने महिलांना समान अधिकार दिला असला तरी पूरुषप्रधान संस्कृती व पुरुषप्रसत्ताक व्यवस्था इ. मुळे राजकारणात महिलाचा अपेक्षित सहभाग वाढला नाही. १९५९ मध्ये बलवंतराय मेहता यांच्या शिफारशीवरुन लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज व्यवस्था लागू करण्यात आली. जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तीनही स्तरावर प्रत्यक्ष निवडणुका घेण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात १९६१ पासून 'पंचायतराज' अंमलात आले आणि स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाला चालना मिळाली; परंतु सुरुवातीच्या महिलाचा सहभाग वाढावा म्हणून महाराष्ट्रात ०५ एप्रिल १९९० रोजी मा.शरद पवार यांच्या शासनाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना ३० टक्के जागा राखीव देण्यात आल्या व महाराष्ट्रात १९९२ च्या स्थानिक स्वराज्य. संस्थांच्या निवडणुकीत ३० टक्के महिला स्थानिक सत्तेत सहभागी झाल्या.

त्यानंतर अशाच प्रकारच्या निर्णय केंद्रीय पातळीवर १९९२ मध्ये घेण्यात आला. भारतीय संसदेने २२ डिसेंबर १९९२ रोजी ७३ वी घ्टनादुरूस्ती मंजूर करुन संपूर्ण भारतात एकसमान पंचायत राज व्यवस्था लागु संस्थामध्ये महिलासाठी १/३ जागा राखीव ठेवल्या. त्यामध्ये जागाचाही जाती व जमातीच्या महिलासाठी राखीव असलेल्या जागाचाही समावेश केला आहे. या घटनादुरनुस्तीने जाती धर्मातील महिलांना राजकारणाचा वारसा नसलेल्या कुटुंबातील व सर्व जाती धर्मातील महिलांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे; त्यामुळे राजकीय क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत महिलांना सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे. पंचायत राज्यात ३३ टक्केपेक्षा अधीक महिलांचा सहभाग वाढावा यासाठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी संसदेला सुचविले; त्यानूसार २७ ऑगस्ट २००९ रोजी पंचायतराज संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक लोकसभेत मांडले; परंतू ते आजही मंजूर झालेले नाही. तरी अनेक राज्यांनी पुढाकार घेऊन आपल्या राज्यात स्थानिक स्वराज्य् संस्थामध्ये महिलांना राखीव जागा दिलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था प्रमाणेच लोकसभेत व राज्याच्या विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे यासाठी लोकसभेत विधेयक मांडून ते मंजूर करण्यात आले, परंतू या विधेयकाप्रमाणे महिलांना मिळणाऱ्या राखीव जागामध्ये अनूसुचित जाती व जमाती व अन्य जाती प्रवर्गातील महिलांनाही राखीव जागा मिळाव्यात, अशा अनेक पक्षाच्या सदस्यांनी मागणी केल्याने आजही हे विधेयक मंजूर झालेले नाही. अशा प्रकारे भारत शासनाने व राज्य शासनानी राजकारणातील महिलाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले आहेत, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात पुरुषाच्या तुलनेत आज महिलाचा राजकीय सहभाग अपेक्षित प्रमाणात वाढलेला नाही.

## ४.३.४ सारांश :

लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेच्या सहभागाला महत्वपूर्ण स्थान आहे. लोकशाही व्यवस्थेचा विकास होत गेला तसे राजकीय सहभागाचे प्रमाण वाढले. सहभागी लोकशाहीत लोकांचा राजकीय सहभाग हा केवळ मतदाना पूरताच न राहता सभा, संमेलने, चर्चा, चळवळी, वाद-

विवाद, निदर्शने इ. सारख्या विविध माध्यमातून वाढत गेला. त्यामुळे राजकीय सहभागाला लोकशाहीत महत्वपूर्ण आहे. प्रगत राष्ट्राच्या तुलनेत भारतीय महिलांचा राजकीय सहभाग पाहिजे; त्या प्रमाणात वाढला नाही. समता हे तत्व आम्ही स्विकारलेले असले तरी भारतात परंपरागत विचारांचा पगडा जनमानसावर असल्याने स्त्रीयाचे सक्षम राजकारण या प्रक्रियेला चालना मिळत नाही, म्हणुन आज तरी पुरूषाप्रमाणेच ग्रामपंचायती पासून तर लोकसभेपर्यत जास्तीत जास्त महिलाचा सहभाग वाढणे महत्वाचे आहे.

## ४.३.४ आपली प्रगती तपासा :

१. राजकीय सहभाग या संकल्पनेचा थोडक्यात अर्थ स्पष्ट करा ?

२. राजकीय सहभागाची व्याख्या स्पष्ट करून त्यांची आवश्यकता उदाहरणासह सांगा ?

३. ब्रिटीश कालीन भारतार्गत राजकीय सहभाग यावर थोडक्यात माहिती दया ?

४. भारतात स्वातंत्र्योत्त्र काळातील राजकारणात 'महिलांचा वाढता सहभाग' यावर सविस्तर लिहा ?

## ४.३.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रथं सुची :

१. Norman Barry, Modern Political Theory, Palgrave (२०००)

२. Jain M.P., Political Theory, Guild Pub (१९८७)

३. वर्मा शामलाल, आधुनिक राजनीतीक सिद्धांत, मीनाक्षी प्रकाशन, नवी दिल्ली (१९७७)

४. भा.ल. भोळे, राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषण पिंपळापूरे, प्रकाशन, नागपूर (१९८८)

५. प्रा.मुठाळ राम, राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषण अंशुल पब्लि. नागपूर (१९७७)

६. बी.वाय. कुलकर्णी राजकीय समाजशास्त्र, आवृत्ती-१ विदया प्रकाशन, नागपूर-२००३

❄❄❄❄❄❄❄

munotes.in